सत्यमेव जयते

मराठी भाषा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

समितीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई तसेच सातारा जिल्ह्यातील पुस्तकांचे गाव-भिलार व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई येथील कार्यालयांना दिलेल्या भेटी व बैठकींसंदर्भातील

पहिला अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस

दिनांक जुलै, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
जुलै, २०१८

मराठी भाषा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

समितीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई तसेच सातारा जिल्ह्यातील पुस्तकांचे गाव-भिलार व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई येथील कार्यालयांना दिलेल्या भेटी व बैठकींसंदर्भातील

पहिला अहवाल

मराठी भाषा समिती
२०१७-२०१८

समिती प्रमुख :

(१) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स

सदस्य :

(२) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(४) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(५) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.
(६) श्री. रमेश लटके, वि.स.स.
(७) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(८) ॲड. गौतम चाबुकस्वार, वि.स.स.
(९) श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.
(१०) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.
(११) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स.
(१२) प्रा. अनिल सोले, वि.प.स.
(१३) ॲड. अनिल परब, वि.प.स.
(१४) श्री. हेमंत टकले, वि.प.स.
(१५) आर्कि. अनंतराव गाडगीळ, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती)
(५) श्रीमती. अलका पराडकर, कक्ष अधिकारी.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
(१)	**प्रस्तावना**	(सात)
(२)	अहवाल	१
(३)	(१) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ	१
	(२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ . .	१
(४)	(१) सातारा जिल्ह्यातील पुस्तकांचे गाव - भिलार	२५
	(२) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई, जि. सातारा	३५
	(३) शासकीय मुद्रणालय, वाई, जि. सातारा	३५
	(४) प्राज्ञपाठ शाळा मंडळ, वाई, जि. सातारा . .	३६
	(५) महाराष्ट्र बालशिक्षण परिषद कार्यालय (आनंदघर शास्त्रीय बाल शिक्षणाचे केंद्र) वाई, जि.सातारा	३७
	(६) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ग्रंथालय, वाई, जि. सातारा	४५
(५)	परिशिष्ट - “एक” (मराठी भाषा विभागांकडून प्राप्त झालेली माहिती)	५३
(६)	परिशिष्ट- “दोन” (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त). . .	१२९

प्रस्तावना

मी, मराठी भाषा समितीची समिती प्रमुख, या नात्याने समितीने अधिकार दिल्याप्रमाणे समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सातारा जिल्ह्यातील पुस्तकांचे गाव-भिलार व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई येथे भेटी देऊन संबंधित अधिका-यांसमवेत बैठकी घेतल्या. उपरोक्त बैठकींमध्ये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व त्यांच्याशी संबंधित शासनस्तरावरील सर्व कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व पुस्तकांचे गाव - भिलार (जि. सातारा) तसेच वाई (जि. सातारा) येथील महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, शासकीय मुद्रणालय, प्राज्ञपाठ शाळा मंडळ, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद कार्यालय (आनंदघर शास्त्रीय बाल शिक्षणाचे केंद्र) आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे ग्रंथालय या ठिकाणी दिलेल्या भेटींच्या अनुषंगाने चर्चा केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्या वेळी समितीला आढळून आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ९ मे, २०१८ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारविनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

साक्षीच्या वेळी प्रधान सचिव व सह सचिव मराठी भाषा विभाग ; सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ; उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित अधिका-यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन [केलेल्या सहाय्याबद्दल] समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक ९ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन : **प्रा. मेधा कुलकर्णी,**
नागपूर : समिती प्रमुख,
दिनांक : जुलै, २०१८. मराठी भाषा समिती.

अहवाल

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या मराठी भाषा समितीने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रविंद्र नाट्य मंदीर, प्रभादेवी, मुंबई यांच्या कार्यालयास भेटी देऊन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व त्यांच्याशी संबंधित शासनस्तरावरील सर्व कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय तसेच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मंडळांतर्फे राबविण्यात येणा-या विविध योजना तसेच मंडळांना येणा-या अडचणी याबाबत माहिती घेतली.

मराठी भाषा समितीने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ कार्यालयास भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने विश्वकोशांची पाहणी केली त्यावेळी समितीला खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली :—

मंडळाच्या माध्यमातून मराठी विश्वकोशाच्या १ ते २० खंडांची निर्मिती मराठी वर्णमालेप्रमाणे अकारविल्हे अ ते ज्ञ अशी रचली आहे. त्यात अंक ते श्रेयवाद अशा सर्व विषयांच्या नोदींचा समावेश आहे. अंध व्यक्तींकरिता ब्रेललिपीमध्ये देखील विश्वकोश निर्मिती करण्यात आली आहे. सदरहू खंड अद्ययावत ठेवण्याचे काम सातत्याने करण्यात येत आहे. सर्व खंड दृकश्राव्यसह (ऑडिओसह) संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोणताही शब्द टंकलिखित करून संकेतस्थळावरून त्याबाबतची माहिती घेता येते. तसेच लघुसंचिकेच्या (पेन ड्राईव्हच्या) स्वरूपामध्ये विश्वकोशाची माहिती शुल्क आकारून ज्यांना आवश्यक असेल त्यांना उपलब्ध करून देण्यात येते. कुमार विश्वकोशाचे दोन भाग प्रकाशित करण्यात आले असून ते दृकश्राव्य (ऑडिओ) स्वरूपामध्ये उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार करून विश्वकोश मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे. विज्ञान व तंत्रज्ञान आणि मानव्य शाखा यांचे मिळून ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याची मंडळाची योजना आहे. त्यापैकी ४६ ज्ञानमंडळे राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये, शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमध्ये कार्यरत आहेत. मंडळाने ५२४ पुस्तके प्रकाशित केली असून त्यापैकी ४३४ ई-बुक स्वरूपात संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या आरक्षणाच्या संदर्भात माननीय न्यायालयाकडे प्रकरण प्रलंबित असल्याने शासनाने भरती प्रक्रियेस स्थगिती दिल्यामुळे मंडळातील काही पदे रिक्त आहेत. तसेच मंडळाच्या कार्यालयासाठी १९४४ चौरस फूट एवढी अतिशय कमी जागा उपलब्ध असल्याने त्यांना प्रशस्त जागेची आवश्यकता असल्याचे नमूद केले.

त्यानंतर समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या कार्यालयाच्या केलेल्या पहाणीच्या अनुंषगाने संबंधित अधिका-यांशी चर्चा केली.

सर्व प्रथम सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी भाषेतील साहित्य आणि संस्कृतीविषयक कार्य करणारे संपूर्ण भारत देशामध्ये राज्य पातळीवर पहिले मंडळ म्हणून या मंडळाची ख्याती असून या मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. महाराष्ट्रातील साहित्य, संस्कृती व इतिहास या विषयांबरोबरच विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान व समाजविद्या या क्षेत्रातील विषयांची ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, हे या मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मंडळामध्ये सचिवांपासून शिपाई यांची मिळून एकूण २१ पदे मंजूर असून त्यापैकी ८ पदे रिक्त आहेत अशी माहिती समितीला दिली व मंडळाच्या कामकाजाचे सादरीकरण केले.

यानंतर समितीने महाराष्ट्राशिवाय देशाच्या इतर राज्यांमध्ये जे मराठी भाषिक वास्तव्यास आहेत त्यांच्यासाठी आपल्या मंडळाकडून कोणत्या योजना राबविण्यात येतात असा प्रश्न केला. त्यावर मंडळाकडून १४ प्रमुख योजना राबविण्यात येत असून या योजनांतर्गत एक प्रकल्प सुरू केला आहे आणि तो म्हणजे इतर राज्यांच्या भाषांमधील पुस्तके आपल्या मराठी भाषेमध्ये प्रकाशित करणे. सध्या मंडळाने ओडिसामधील एक पुस्तक तयार केले असून ते लवकरच मराठी जनतेला उपलब्ध होईल अशी माहिती सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी समितीला दिली. त्यावर आणखी माहिती देताना विभागीय प्रतिनिधी यांनी समितीला सांगितले की, केंद्र शासनाने ही योजना अलिकडेच सुरू केली असून आपणही या वर्षापासून ही योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. ओडिसानंतर आता झारखंड राज्याच्या भाषेसंबंधी पुस्तक निर्माण करणार आहोत. आपण जरी ओडिसामधील भाषेचे मराठीत पुस्तक प्रकाशित केले असले तरी ओडिसाने अद्यापही मराठी भाषेचे पुस्तक त्यांच्या भाषेत छापलेले नाही.

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी मागच्या तीन वर्षांपूर्वी आमचे विविध योजनांवरील अर्थसंकल्पीय (बजेट) तरतूद केवळ १५ लाख रुपये होती. मात्र गेल्या तीन वर्षांमध्ये त्यात सातत्याने वाढ होत आहे. चालू वर्षामध्ये आम्ही २ कोटी रुपयांची मागणी

प्रस्तावित केली होती व ती मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे आमच्या मंडळाच्या कामाला गती आली आहे. आम्ही या खर्चाचे स्पष्टीकरण देताना नवलेखकांना उत्तेजन देणे, त्यांच्या कार्यशाळा भरविणे यावर भर दिला असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. दरवर्षी आम्ही दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी या एक महिन्याच्या कालावधीत जाहिरात काढून राज्यातील नवलेखकांकडून विविध पुस्तकांची माहिती मागवित असतो. यंदा दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१७ या कालावधीत आम्ही नवलेखकांकडून पुस्तके मागविली असून ९० पुस्तके आमच्याकडे आली आहेत. त्यातून आम्ही १५ पुस्तके निवडून त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देतो अशी माहिती समितीला दिली.

त्यानंतर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निमिर्ती मंडळास सादरीकरणास सुरुवात करण्याबाबत सांगितले असता सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निमिर्ती मंडळ यांनी सादरीकरण केले. त्यानंतर मंडळाचे अध्यक्ष यांनी समितीला मंडळाच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती विशद केली :—

मंडळाने आतापर्यंत मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंड प्रकाशित केले आहेत. मंडळाच्या संकेतस्थळावरून कोणतीही नोंद खंडानुसार, शब्द टंकलिखित करून शोधानुसार व विज्ञान, तंत्रज्ञान या विषयानुसार अशाप्रकारे दोन ते तीन प्रकारे शोधता येऊ शकते. विश्वकोशाचे सर्व खंड लघुसंचिकेवर (पेन ड्राईव्हवर) देखील उपलब्ध करून देण्यात येतात. जीवसृष्टी व पर्यावरण हे कुमार विश्वकोशाचे भाग १ व २ प्रकाशित करण्यात आले आहेत. त्यामधील नोंदी लिखित व दृकश्राव्य (ऑडिओ) स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मराठी विश्वकोशाचे २० खंड प्रकाशित करण्याकरिता सन १९६० ते २०१५ एवढा कालावधी लागला. पहिल्या खंडामध्ये आतापर्यंत प्रकाशित करण्यात आलेल्या माहितीमध्ये काही विषयांचा समावेश झाला आहे तर काही विषय बाद झालेले आहेत. आता जग झपाट्याने बदलत असून आधुनिक तंत्रज्ञानही आता उपलब्ध आहे. याबाबींचा विचार करून विश्वकोश मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. ६० ज्ञानमंडळांच्या माध्यमातून मंडळाचे काम विकेंद्रीत करण्यात आले असून उक्त ज्ञानमंडळे शैक्षणिक संस्था व विद्यापीठांमध्ये सुरू करण्यात आली आहेत. प्रत्येक ज्ञानमंडळ त्या-त्या क्षेत्रातील मुक्त विद्यापीठ म्हणून हळूहळू काम करेल. प्रत्येक ज्ञानमंडळामध्ये विश्वकोश मंडळाच्या सदस्यांना त्यांना ज्या विषयामध्ये रस आहे त्या विषयाच्या ज्ञानमंडळाचे पालक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक ज्ञानमंडळातील समन्वयक हे त्या

विषयातील माहितगार असतात व त्यांच्यावर अंमलबजावणीची (एक्झीक्यूशनची) जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

सचिव म्हणून या मंडळावर काम करताना आता जवळपास अडीच वर्षे झाली आहेत. त्यातील पहिले एक वर्ष या मंडळाची प्रशासकीय पुनर्रचना करण्यामध्ये गेले आणि त्यानंतर आम्ही या ज्ञानमंडळाची रचना करायला सुरुवात केली आहे. राज्यातील विविध विद्यापीठे, संशोधन व शैक्षणिक संस्था यांच्याशी समन्वय साधून ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे आम्ही ठरविले असून प्रत्येक ज्ञानमंडळाला वार्षिक २ लाख ४० हजार रुपयांचा निधी देण्याचे ठरविले आहे. यामध्ये समन्वयक म्हणून काम करणा-या व्यक्तीला दरमहा १५ हजार रुपयांचे मानधन देण्यात येते. आजमितीस अशी ४६ ज्ञानमंडळे स्थापन झाली आहेत. या संस्था, पालक संस्था म्हणून काम करीत असून त्यांचा तपशील माहिती पुस्तिकेमध्ये दिलेला आहे. असे असले तरी काही ज्ञान मंडळांनी काहीच काम केलेले नाही.

साधारणपणे मंडळाला १८ हजार नोंदणी करण्याकरिता ५० वर्षांचा कालावधी लागला आहे, कारण लेखी पत्र व्यवहाराशिवाय काही सुविधा उपलब्ध नव्हती. आता संगणकीकरणामुळे, ई-मेल व इंटरनेटद्वारे जलदगतीने संपर्क साधता येतो. आमच्या मंडळाच्या जुन्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) मराठी विश्वकोशाचे २० खंड जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. तथापि, आता आम्ही नवीन संकेतस्थळ सुरू करीत आहोत. परंतु आम्हाला काही तांत्रिक अडचणी येत आहेत. त्या दूर झाल्यावर थोड्याच दिवसात म्हणजे पुढील दोन तीन महिन्यांमध्ये हे नवीन संकेतस्थळ (वेबसाईट) सुरू होईल. ब-याच अद्ययावत गोष्टींसह या संकेतस्थळावर शुद्ध भाषा लेखन सुद्धा उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर आम्ही आणखी अब्जांश नावाचे एक तंत्रज्ञान विकसित करीत आहोत.

त्यानंतर समितीने सदर संकेतस्थळावर (वेबसाईटवर) आणखी एक सुविधा ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे जर एखाद्या व्यक्तीला काही आक्षेप वा त्याचे अभिप्राय नोंदवावयाचे असतील किंवा त्या संबंधित विषयासंबंधी वेगळी अधिकची माहिती द्यावयाची असेल तर ती नोंदविण्याची सुविधा असायला पाहिजे. प्रत्येक नोंदीला वाव (स्कोप) ठेवावा. कारण ब-याच ठिकाणी सूचना (सजेशन) व आक्षेपासाठी (ऑब्जेक्शनसाठी) संकेतस्थळावर (वेबसाईटवर) खिडक्या (विंडो) ठेवलेल्या असतात. तसे आपणही केले पाहिजे. कारण त्यातून आपल्या संकेतस्थळावर (वेबसाईटला) किती लोकांनी भेटी दिल्या ते सुद्धा समजू शकते, अशी सूचना केली.

त्यावर अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी समितीला सांगितले की, ज्ञानमंडळाच्या लोकांना विषय वाटून दिलेले आहेत. त्यांच्याकडून विषयवार माहिती लिहून घेणे हे सुद्धा आव्हानात्मक काम आहे. त्यांच्याकडून जे काम करून घेतले जाते त्यामध्ये त्यांना काय वाटते यापेक्षा आम्हाला काय लिखाण हवे आहे यावर आमचा कटाक्ष असल्यामुळे सूचना (सजेशन) आणि आक्षेप (ऑब्जेक्शन) आम्ही ठेवलेले नाहीत.

समितीने शब्दकोश तयार करण्याचे काम कोण करते याबाबत प्रश्न केला असता, शब्दकोश तयार करण्याचे काम भाषा संचालनालयामार्फत केले जाते. विश्वकोशाने एक परिभाषा कोश दिलेला आहे. त्यामध्ये मराठी भाषा संचालनालयाचे वेगवेगळे ४६ विषय आहेत अशी माहिती अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी समितीला दिली.

त्यावर अधिक माहितीसाठी समितीने ऑक्सफर्ड शब्दकोशाचे (डिक्शनरीचे) अमुक इतके शब्द मराठीमध्ये समाविष्ट झाले आहेत याबाबत निश्चित संख्या सांगता येईल का असा प्रश्न केला. त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी समितीला सांगितले की, आपल्याला हे ऑनलाईन करता आले तर ब-याच अडचणी दूर होतील. कारण सदर संकेतस्थळ (वेबसाईट) ऑनलाईन करण्यासाठी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून काही अडचणी येत आहेत त्या दूर झाल्या पाहिजेत. सी-डॅक आणि माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये बरेच वाद होते परंतु आता त्यांचे निराकरण झाले आहे. त्यामुळे हे संकेतस्थळ (वेबसाईट) प्रसिद्ध करण्यापूर्वी विभागाला माहिती व तंत्रज्ञान (आयटी) विभागाशी समन्वय साधावा लागतो.

त्यावर अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी प्रतिपादन केले की, संकेतस्थळाची (वेबसाईटची) तांत्रिक सुधारणा (टेक्निकल अपग्रेडेशन) करावयाची असल्यामुळे आपल्याला माहिती व तंत्रज्ञान (आयटी) विभागाची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. राज्य माहिती केंद्राने (स्टेट डाटा सेंटरने) जागा उपलब्ध करून दिली नसल्याबाबतचे पत्र सी-डॅकने मंडळाला दिले आहे.सी-डॅककडून जुन्या संकेतस्थळावर मुद्रितशोधन (प्रुफ करेक्शन) करण्याचे राहून गेले आहे त्यासंदर्भात आम्ही कार्यवाही सुरू केल्यानंतर सदरहू पत्र मंडळाला प्राप्त झाले व त्यामुळे त्यांना काम बंद करावे लागले. राज्य माहिती केंद्राला (स्टेट डाटा सेंटरला) सी-डॅकने पत्र लिहिले होते त्याचे उत्तर त्यांनी दिले नाही. नवीन संकेतस्थळ (वेबसाईट) तयार करताना माहिती व तंत्रज्ञान (आयटी) विभागासमवेत धोरणासंदर्भात (पॉलिसी) बैठक घेण्यात आली होती.आता नवीन संकेतस्थळ (वेबसाईट) तयार करताना ३-३ लाख रुपयांची निविदा काढून प्रक्रिया पार पाडावी लागते. त्यामधून होणारे काम समाधानकारक नसते. तीन लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च करावयाचा असेल तर

ई-टेंडरींग व इतर कार्यवाही कोण करणार हा प्रश्न निर्माण होतो यामध्ये तांत्रिक अडचणी खूप आहेत.

त्यावर सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी समितीला माहिती दिली की, माहिती व तंत्रज्ञान (आय.टी.) विभागाच्या नियमानुसार सल्लागार (कन्सल्टंट) उपलब्ध करून दिल्यानंतर त्याला ७५ हजार रुपये मानधन द्यावे लागते. विभागाने थोड्या कालावधीसाठी सल्लागाराची (कन्सल्टंटची) मागणी आय.टी.विभागाकडे केली होती. परंतु कमी कालावधीसाठी त्यांच्याकडून सल्लागार (कन्सल्टंट) किंवा विकासक (डेव्हलपर) ६ महिन्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येत नाही.

त्यावर समितीने मंडळाला संकेतस्थळ (वेबसाईट) संबंधी कार्यवाही करण्याकरिता पूर्णपणे स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले. यावर सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी माहिती व तंत्रज्ञान (आय.टी.) विभागाने आपले अधिकार केंद्रीयकृत (सेंट्रलाईज) करून ठेवले आहेत.माहिती व तंत्रज्ञान (आय.टी.) विभागाकडे नस्ती गेल्यानंतर त्याचा खूप पाठपुरावा करावा लागतो.सी-डॅककडून राज्य माहिती केंद्राला(स्टेट डाटा सेंटरला) माहिती हस्तांतरीत (डाटा ट्रान्स्फर) करण्यासाठी स्त्रोतसंकेतांकाची (सोर्सकोडची) आवश्यकता होती, ती माहिती व तंत्रज्ञान (आय.टी.) विभागाकडून मिळवण्याकरिता विभागाला खूप त्रास झाला. मागील २ महिन्यांपासून त्यांनी विभागाला स्त्रोतसंकेतांक (सोर्सकोड) उपलब्ध करून दिला नाही. माहिती व तंत्रज्ञान (आय.टी.) विभाग व सी-डॅक यांच्यामधील संबंध ताणले गेले असून त्याचा त्रास विभागाला होत आहे असे समितीला सांगितले त्यावर समितीच्या माध्यमातून जेवढी मदत करणे शक्य होईल ती करण्यात येईल असे समितीने आश्वासन दिले.

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी वाई येथील मंडळाच्या कार्यालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली असून ती पडायला आली आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम सन १९६० साली करण्यात आले होते व ती प्राज्ञपाठ शाळेची इमारत होती, ती जुनी झाल्याने नवीन इमारत बांधण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मंडळाने वाई येथील कार्यालयास भेट देण्याबाबत समितीला विनंती केली. त्यावर समितीने सदरहू प्रकरणी निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले व मंडळाच्या इतर काही समस्या असतील तर त्या समितीला सांगण्याबाबत सूचना केली.

त्यावर सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी विशद केले की, मंडळांच्या कार्यालयांसाठी जागेची समस्या आहे. मराठी भाषा विभागाच्या अखत्यारीतील ४ कार्यालयांमार्फत वेगवेगळ्या प्रकारची प्रकाशने (पब्लिकेशन) काढण्यात येतात. विश्वकोशाची माहिती कोठे पहावी याची माहिती अनेकांना नसल्याने शालेय शिक्षण विभागाबरोबर समन्वयाची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या संदर्भातील माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवता येणे शक्य होईल. मंडळाच्या माध्यमातून विश्वकोशातील माहिती लघुसंचिकेच्या (पेन ड्राईव्हच्या) माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येते. सदरहू लघुसंचिका (पेनड्राईव्ह) ७०० रुपये किमतीस विक्री करण्यात येते.

तसेच त्यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये केवळ स्मरणशक्तीची चाचणी परीक्षा घेण्यात येते. मुलांना एक निबंध ३ ते ४ पद्धतीने कसा लिहावा हे समजावून सांगण्याकरिता मंडळाच्या ऑनलाईन पद्धतीचा वापर संगणकीकरण (डिजिटलाईज) झालेल्या शाळांमधून करता येणे शक्य आहे.

समितीने मंडळाचा अर्थसंकल्प (बजेट) किती आहे? याबाबत विचारणा केली त्यावर सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी समितीला सांगितले की, मंडळाला सन २०१७-१८ मध्ये १ कोटी ९५ लाख २० हजार रुपये योजनांतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. कार्यालय चालविण्याकरिता येणारा सर्व खर्च उक्त अनुदानातून भागविण्यात येतो. ज्ञानमंडळ चालविण्याकरिता सन २०१६ मध्ये योजना मंजूर करण्यात आली असून त्याकरिता दरवर्षी १ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान प्राप्त होते व सदरहू अनुदान पुढील वर्षीदेखील मिळणार आहे. ज्ञानमंडळाचे काम उक्त निधीतून चांगल्या प्रकारे करण्यात येते, अनुदानाची कोणत्याही प्रकारची कमतरता नसून विषयनिहाय बाबींवर सर्व निधी खर्च होतो. माहिती व तंत्रज्ञानाशी (आय.टी.) संबधित तज्ञ नसल्याने खूप अडचणी येतात, सदरहू अडचण दूर झाल्यास मोठ्या प्रमाणात प्रसार करणे शक्य होईल.

याबाबत अधिक माहिती देताना अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी प्रतिपादन केले की, शासनाने पद भरती करण्यास सद्यःस्थितीत बंदी घातलेली आहे. वरिष्ठ सह संपादक यांची नेमणूक करणे गरजेचे आहे, त्या पदाकरिता ६० ते ७० हजारांपर्यंत वेतन देय आहे. ज्ञानमंडळांची संख्या वाढल्यानंतर नोंदींची संख्या वाढणार आहे त्यावेळी निर्णय घेण्याकरिता सदरहू पदावर उच्च गुणवत्तेचा व्यक्ती नसेल तर पुढील काळात अडचण उद्‌भवू शकते.

तसेच सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी मंडळामध्ये ५१ पदांमध्ये विभाग संपादक, सहसंपादक या पदांचा समावेश आहे. विभाग संपादक व सहसंपादक यांच्या माध्यमातून नोंदी अंतिम करण्यात येतात. ५१ पदांपैकी १० पदे मानधन तत्त्वावर भरण्यात आलेली आहेत. सदरहू पदे केवळ ११ महिन्यांच्या कालावधीकरिता भरण्यात येतात. त्याकरिता दरवर्षी शासनाची मान्यता घेऊन जाहिरातीद्वारे अर्ज मागवून पदे भरण्याची प्रक्रिया पार पाडावी लागते. ११ महिन्यांच्या करारावर काम करण्याकरिता दर्जेदार व गुणवत्ताधारक व्यक्ती मिळणे कठीण असून त्यांच्याकडे आवश्यक अनुभव व त्या पदाकरिताचे आवश्यक ज्ञान नसते.सदरहू प्रकरणी मराठी भाषा विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे अशी माहिती समितीला दिली.

त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी मराठी भाषा विभागाने सदरहू पदे नियमित वेतनश्रेणीमध्ये भरण्यास मान्यता मिळणेबाबत वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे समितीला सांगितले.

सदरहू पदे नियमित भरण्याबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी असे सांगितले की, काही दिवासांपूर्वी "महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाचे अज्ञान" या मथळ्याखाली कल्पना चावलाची जन्म तारीख विश्वकोश ज्ञानमंडळाने चुकीची दिली असल्याची बातमी लोकसत्ता दैनिकाने त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली होती. कल्पना चावला यांची जन्माची तारीख व शाळेमध्ये प्रवेश घेतलेली अशा त्यांच्या दोन वेगवेगळ्या जन्म तारखा आहेत. त्यांनी शाळेमध्ये प्रवेश घेताना नोंदविलेली जन्म तारीख त्यांच्या प्रमाणपत्रावर व नासाकडे देखील नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरहू तारीख विश्वकोशामध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यासंदर्भात त्यावेळी एक तासाच्या आत आम्ही खुलासा सादर केला होता. लोकसत्ता कार्यालयाने गुगलवर एक सर्च करून कल्पना चावला यांची जन्म तारीख शोधली असती तर त्यांना दोन जन्म तारखा आढळून आल्या असत्या, सदरहू अज्ञान विश्वकोश ज्ञानमंडळाचे नसून लोकसत्ता दैनिकाचे होते. अशा प्रकारे सार्वजनिक माहिती कोशामध्ये (पब्लिक डोमेनमध्ये) कोणत्याही प्रकारचे प्रश्न निर्माण होऊ शकतात त्यांना सोडविण्याकरिता वरिष्ठ, अनुभवी, ज्ञानी संपादकाची आवश्यकता असते.

समितीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयाशी संबंधित काही अडचणी असल्यास त्या मांडण्याबाबत सूचना केली, त्यावर सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी मंडळासाठी जागेची अडचण आहे, मंडळाचे कार्यालय सध्या पु.ल. देशपांडे अकादमीच्या

वास्तुमध्ये भाडेतत्त्वावर स्थापित झाले आहे आणि कार्यालयासाठी जागासुद्धा अपुरी आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयासाठी १९४४ चौ.फूट एवढी जागा भाडे करारावर उपलब्ध करून देण्यात आली आहे, दोन्ही कार्यालयांसाठी आता केवळ २५०० चौ.फूट एवढी जागा उपलब्ध असून उक्त कार्यालयांसाठी प्रशस्त जागेची आवश्यकता आहे. पु.ल.देशपांडे अकादमीला जागेच्या भाड्याची मागील ६ वर्षांपासून थकीत रक्कम १ कोटी ९६ लाख रुपये द्यावयाची आहे. पूर्वी हा विभाग पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अखत्यारीत होता असे समितीला सांगितले.

त्यावर विभागीय प्रतिनिधी यांनी पूर्वी रंगभवनच्या परिसरात हे कार्यालय हलविण्याचा विचार होता. मात्र त्यावेळी पुरातन वास्तू (हेरिटेज) समितीने हरकत घेतल्यामुळे ते करता येण्यासारखे नाही. मंडळाच्या कार्यालयाच्या भाड्याची रक्कम देऊ नये किंवा ती माफ करण्याबाबत बैठका घेण्यामध्ये मागील ४ वर्षांचा कालावधी गेला आहे. पु.ल.देशपांडे अकादमीला आपण प्रोत्साहन दिले पाहिजे, त्याकरिता उक्त भाड्याची रक्कम अदा करण्यात यावी, असे सांस्कृतिक कार्य विभागाने नमूद केल्यानंतर त्यासंदर्भातील पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये (बजेटमध्ये) उक्त कार्यालयाचे भाडे अदा करण्याकरिता तरतूद होईल, अशी अपेक्षा असल्याचे समितीला सांगितले. समितीने त्यावर सदरहू प्रकरणाचा पाठपुरावा करण्याबाबत विभागाला सूचना केली.

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ९ मे २०१८ रोजी विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

समितीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळात एकूण मंजूर पदे किती आहेत व त्यापैकी किती पदे भरण्यात आली आहेत व किती पदे रिक्त आहेत, पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत व ही रिक्त पदे भरण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत वा येत आहेत? याबाबत विचारणा केली असता, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या आस्थापनेवर एकूण २१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ पदांवर सध्या कर्मचारी कार्यरत असून ८ पदे रिक्त आहेत. या ८ रिक्त पदांमध्ये अधीक्षक १, वरिष्ठ लिपिक ३, लिपिक-टंकलेखक ३ व वाहन चालक १ या पदांचा समावेश आहे.ठराविक वेतनश्रेणीची पदे भरण्यासाठी राज्य शासनाने महापरिक्षा नावाचे संकेतस्थळ (पोर्टल) सुरू केलेले आहे. त्यामध्ये ही सर्व पदे देण्यात यावीत, असे आदेश

काढलेले आहेत. अधीक्षक पद त्या संवर्गात येत असल्यामुळे महापरिक्षा पोर्टलकडे सदर पद भरण्याबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे. इतर लिपिकवर्गीय पदे भरण्यास सध्या शासनाने बंदी घातलेली आहे. अशा प्रकारची कोणतीही पदे भरायची असतील तर त्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घ्यावी लागते. सचिव, वित्त विभाग हे या समितीचे सदस्य आहेत. सदर समितीच्या मान्यतेसाठी इतर पदे ठेवण्यात आली आहेत. लिपिकवर्गीय पदे कायमस्वरूपी भरण्यासाठी सदर समिती आहे, परंतु ही पदे कायमस्वरूपी न भरता तात्पुरती व्यवस्था करायची असेल तर बाह्य यंत्रणेद्वारे पदभरतीस शासनाने मंजुरी दिलेली आहे. यासाठी देखील याच समितीची मान्यता घ्यावी लागते, परंतु त्यामध्ये जास्त अडचणी येत नाहीत. यासाठी शासनाने काही ठराविक खाजगी संस्थादेखील नेमलेल्या आहेत. लिपिक-टंकलेखकांची पदे या संस्थांमार्फत भरणार आहोत, परंतु ही पदे तात्पुरत्या स्वरूपाची असतील. कायमस्वरूपीची पदे समितीच्या मान्यतेनंतर जाहिरात काढून भरावी लागतील. सध्या कायमस्वरूपी पदे भरता येणार नाहीत. अधीक्षक १ व लिपिक टंकलेखकांची ३ पदे साधारणतः पुढील दोन महिन्यांमध्ये भरली जातील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. **परिशिष्ट एक (क)**

सचिव व सहायक सचिव यांच्यानंतर प्रशासनाचा प्रमुख म्हणून अधीक्षक हे अत्यंत महत्त्वाचे पद आहे. या ठिकाणी अधीक्षक हे पद किती वर्षांपासून रिक्त आहे? अधीक्षक पद रिक्त असताना अधीक्षकांना नेमून दिलेली कार्ये करण्याची सध्या कोणाची जबाबदारी आहे व ज्यांना ही जबाबदारी दिली आहे त्यांची पात्रता निकषाप्रमाणे आहे काय? याबाबत समितीने प्रश्न उपस्थित केला, त्यावर साहित्य संस्कृती मंडळामध्ये गेल्या दोन वर्षांपासून अधीक्षक पद रिक्त आहे. तेथील ग्रंथालय सहायकांकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

समितीने वाहनचालक, लिपिक-टंकलेखक यांच्या पदांच्या सद्यःस्थितीबाबत विचारणा केली, त्यावर वाहनचालकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यास शासनाची मंजुरी आहे. त्यानुसार सदर पद भरण्यात आलेले आहे. परंतु वाहनचालकाचे कायमस्वरूपी पद रिक्त आहे, उर्वरित पदे भरण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागेल. त्यापैकी लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदे बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त करावयाची आहेत. कायमस्वरूपी पदे भरण्यास शासनाची बंदी असल्यामुळे ही पदे कायमस्वरूपी भरता येणार नाहीत. लिपिक-टंकलेखकांची ३ पदे व वाहनचालकाचे १ पद आम्ही कंत्राटी पद्धतीने भरणार आहोत तसेच अधीक्षकाचे १ पद भरण्यासाठीचा प्रस्ताव महापरिक्षा पोर्टलकडे पाठविण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

समितीने आपल्या विभागामध्ये मंजूर असलेल्या २१ पदांना कोणत्या वर्षी मंजुरी मिळालेली आहे? त्यानंतर आपल्या विभागाचे काम वाढले आहे की कमी झाले आहे, आताचे काम अधिक वेगाने व परिणामकारकरित्या करण्यासाठी आता उपलब्ध असलेले मनुष्यबळ पुरेसे आहे किंवा त्याचा फेरविचार करावा लागेल, याबाबत विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले की, साहित्य संस्कृती मंडळासाठी एकूण २१ पदे मंजूर आहेत. त्यांच्यामार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या एकूण १४ योजना राबविल्या जातात. तसेच नवीन काही योजना राबवावयाच्या असतील तर त्याबाबत देखील मंडळाला स्वायत्तता देण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीमध्ये मंजूर पदे पुरेशी असल्याचे मंडळाचे म्हणणे असून त्यांनी कोणत्याही वाढीव पदांची मागणी केलेली नाही. पदांच्या आढाव्याबाबतचा अहवाल शासनास सादर करताना या २१ पदांचाच अहवाल आम्ही सादर केलेला आहे त्यापैकी केवळ रिक्त पदे भरावी लागतील.

ग्रंथांचे ई-बुक ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेची सुरुवात केव्हा झाली असा प्रश्न समितीने केला तेव्हा सन २०१३ पासून सदर योजना सुरू आहे. याअंतर्गत ग्रंथांचे संगणकीकरण करून ते संकेतस्थळावर टाकण्याचे काम सातत्याने सुरू आहे. सी-डॅककडून आपण ही सर्व कामे करून घेतो. भाषा विभागाचा सी-डॅकशी जुना संबंध आहे. ही कामे करून घेण्यासाठी कार्यालयीन यंत्रणा लागते. प्रत्यक्ष संगणकीकरणाचे काम सी-डॅककडून केले जाते. पुस्तकांची निवड करणे, संकेतस्थळ उपलब्ध करून देणे व इतर कामे साहित्य संस्कृती मंडळामार्फत केली जातात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत कोणकोणत्या योजना / उपक्रम राबविले जातात व त्याचे स्वरूप काय आहे? याची माहिती देण्याबाबत समितीने सांगितले, त्यावर विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळामार्फत आता प्रामुख्याने १४ योजना राबविल्या जातात. साहित्य संस्कृती मंडळ स्वतः काही पुस्तकांचे प्रकाशन करते. उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर केले जाते. ललित व ललितेतर वाङमयाच्या प्रकाशनासाठी अनुदान योजना आहे. नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना ही मंडळाची लोकप्रिय योजना आहे. नवलेखकांची चर्चासत्रे घेणे, ज्येष्ठ साहित्यिकांमार्फत मार्गदर्शन करणे, कार्यशाळांना अनुदान देणे, अशा प्रकारची एक योजना आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद व तिच्या ७ घटक संस्थांना अनुदान देण्याची योजनादेखील साहित्य संस्कृती मंडळाकडून राबविली जाते. राज्य शासनाकडून दिले जाणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठीचे अनुदानदेखील साहित्य संस्कृती मंडळामार्फतच दिले जाते. यामध्ये वाढ करण्याबाबत आम्ही वित्त विभागास सूचना केली असून सन्माननीय वित्त

मंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सदर बाब मान्य केली आहे. तसेच नियतकालिकांना अनुदान दिले जाते. मंडळामार्फत काही पुरस्कार दिले जातात. त्यामध्ये स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, श्री.पु.भागवत पुरस्कारांचा यामध्ये समावेश आहे. तसेच ई-बुक योजना व याव्यतिरिक्त साहित्य संस्कृती मंडळाला कोणत्या योजना घ्यावयाच्या असतील ते स्वत: योजना तयार करून सादर करू शकतात. वेळोवेळी शासनाकडूनदेखील काही योजना पाठविल्या जातात. उदाहरणार्थ, 'एक भारत-श्रेष्ठ भारत' ही योजना केंद्र शासनाने सुरू केली आहे. यामध्ये उडिया भाषेतील काही पुस्तकांचे भाषांतर साहित्य संस्कृती मंडळाने करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. अशा प्रकारे वेळोवेळी सोपविण्यात येणारी अतिरिक्त कामेदेखील साहित्य संस्कृती मंडळाकडून केली जातात.

समितीने विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, श्री.पु. भागवत पुरस्कार, स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार, या पुरस्कारांच्या स्वरूपाविषयी माहिती देण्याबाबत सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारामध्ये ५ लाख रुपये, शाल, श्रीफळ व मानपत्र दिले जाते. यावर्षीचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना देण्यात आला आहे. नामवंत प्रकाशन संस्थेला श्री.पु.भागवत पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी वरदा प्रकाशन संस्थेस सदर पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराची रक्कम रुपये ३ लाख एवढी आहे. स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार पुस्तकाला देण्यात येतो. यामध्ये एकूण ३५ पुरस्कारांचा समावेश आहे.प्रत्येक पुरस्काराचे स्वरूप व निकष वेगवेगळे आहेत. ५० हजार रुपयांपासून १ लाख रुपयांपर्यंत याप्रमाणे ३५ पुरस्कार देण्यात येतात. कथा, कादंबरी, ललित साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य व इतर अशा एकूण ३५ प्रकारच्या साहित्यांना दिल्या जाणा-या पुरस्कारांना एकत्रित मिळून स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार हे नाव आहे.

समितीने नवलेखकांसाठी चर्चासत्रे कोण आयोजित करते? याबाबत विचारणा केली असता, मंडळामार्फतच कार्यशाळांचे आयोजन केले जाते. चर्चासत्रांच्या आयोजनाबाबत वेगवेगळ्या संस्थांकडून प्रस्ताव येतात व त्यानुसार त्यांना अनुदान दिले जाते याबाबत ज्या संस्थांकडून प्रस्ताव येतात त्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. याबाबत मंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेतला जातो. चार महिन्यांतून एकदा मंडळाची बैठक होते अशी माहिती समितीला देण्यात आली.

यावर नवीन लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन केले जाते. चांगले लेखक निर्माण व्हावेत म्हणून नव लेखकांसाठीच्या कार्यशाळांचे आपण आयोजन करतो. साहित्याशी संबंधित वेगवेगळ्या ६ मंडळांकडून प्रस्ताव आल्यानंतर आपण त्यांना अनुदान देतो. अनुदान दिल्यानंतर प्रशिक्षण वर्ग घेण्याचे काम कोणाचे आहे, मंडळाचे आहे की संबंधित संस्थेचे आहे, आपण केवळ अर्थसहाय्य देणारी संस्था आहात की आपल्याकडे असे मनुष्यबळ आहे जे या नवलेखकांना काही तरी देऊ शकेल, नवलेखकांची कार्यशाळा घेण्यासाठी आपण नेमकी काणती कार्यवाही केली याबाबत माहिती देण्यास सांगितले असता, साहित्य संस्कृती मंडळामध्ये अशासकीय सदस्य असतात. त्यामध्ये नामवंत साहित्यिक आहेत. या मंडळाची बैठक आवश्यकतेनुसार किंवा दर तीन ते चार महिन्यांनी होत असते. अशा प्रकारची बैठक घेण्याचे अधिकार हे अध्यक्षांना असतात. ज्येष्ठ साहित्यिक श्री. बाबा भांड हे सध्या साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत. दिनांक ९ जानेवारी २०१८ रोजी या मंडळाची एक बैठक घेण्यात आलेली होती. नव लेखकांच्या अनुदान योजनेच्यासंबंधी ज्यावेळी संस्थांकडून यासाठी प्रस्ताव येतात ते प्रस्ताव हे साहित्य परिषदेच्या घटक संस्थांचेच असावेत असे नसून यासाठी इतर साहित्य संस्थांचेही प्रस्ताव प्राप्त होत असतात. अशा प्रकारचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संचालक सदस्य याबाबत चर्चा करीत असतात. ज्यावेळी यासाठी शिबिरांचे आयोजन केले जाते, त्यावेळी साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष त्यांच्या एकूण सदस्यांपैकी एक ते दोन सदस्यांना त्या शिबिरामध्ये हजर राहून प्रशिक्षण शिबिरामध्ये भाग घेतील अशा प्रकारची जबाबदारी सोपवीत असतात. त्याप्रमाणे सदस्य हजर असतात. यासाठी ज्येष्ठ साहित्यिकांना बोलविण्यात येते. परंतु याबाबतचे सर्व अधिकार हे संबंधित संस्थेला देण्यात आलेले आहेत, त्यामध्ये शासन हस्तक्षेप करीत नाही. साहित्य संस्कृती मंडळ याबाबतचे सर्व आयोजन, जसे की कोणाला निमंत्रण द्यावयाचे हे ठरवीत असते. अशासकीय सदस्यांपैकी कोणतेही एक ते दोन सदस्य यासाठीच्या शिबिरामध्ये उपस्थित राहत असतात. या सर्व गोष्टींमध्ये राज्य शासनाचा हस्तक्षेप असावा असे विभागाला वाटत नाही. कारण प्रस्ताव प्राप्त होऊन आवश्यक ती मदत दिल्यानंतर मंडळांनी त्यांच्या स्तरावर आयोजन केले पाहिजे. परंतु अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन निश्चितपणे झाले पाहिजे, याची खात्री विभागाने केली पाहिजे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, चर्चासत्र आणि परिसंवादाच्या आयोजनासाठी राज्य शासनाकडून निधी देण्यात येत असतो. त्यामुळे या निधीचा योग्य विनियोग झाला किंवा नाही, हे पाहण्याची जबाबदारी आणि अधिकार या दृष्टीकोनातून राज्य शासनाने हस्तक्षेप केला पाहिजे. तसेच या वर्षी किती चर्चासत्रे आयोजित करण्यात आली, त्या चर्चासत्रांमधून काय निष्पन्न झाले, त्यासाठी किती निधी खर्च करण्यात आला, या चर्चासत्रांमध्ये किती लोकांनी सहभाग घेतला या सर्वांचा गोषवारा समितीला सादर करण्याबाबत सूचना केली असता, जो निधी उपलब्ध करून देण्यात येत असतो, तो योग्य पद्धतीने झालेला आहे किंवा नाही याची खात्री करण्याची जबाबदारी आणि अधिकार हे राज्य शासनाकडे आहेत. संबंधित संस्थांकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात येते. जसे की साहित्य संमेलनाला राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येते. त्यामध्ये आयोजक संस्थांना साहित्य संस्थेमार्फत उपयोगिता प्रमाणपत्र देण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

समितीने नव लेखकांना प्रोत्साहनपर अनुदान विभागाकडून देण्यात येते काय? मागील आर्थिक वर्षामध्ये किती नव लेखकांना अनुदान देण्यात आले? याबाबत विचारणा केली, त्यावर नव लेखकांना प्रोत्साहनपर अनुदान देणे आणि त्यांच्या कार्यशाळा आयोजित करणे अशा प्रकारच्या दोन योजना आहेत. मागील वर्षी या योजनेसाठी चार लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. हे अनुदान नव लेखकांच्या पुस्तक छपाईसाठी देण्यात येत होते. त्यासाठी विभागाकडे तीन लाख अठ्यांऐंशी हजार अनुदान प्राप्त झाले असून तेवढे अनुदान खर्च करण्यात आले आहे.

त्यावर सदर अनुदान कमी आहे, यासाठी राज्य शासन अपुरी तरतूद करीत आहे. मराठी राजभाषा अधिकाधिक लोकांनी बोलली, लिहिली पाहिजे, मराठी भाषा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचली पाहिजे, यासाठी विभागाने पुढाकार घेतला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले व तीन लाख अठ्यांऐंशी हजार रुपये किती लेखकांना देण्यात आले व यासाठीची निवड साहित्य संस्कृती मंडळामार्फत करण्यात येते काय? अशी विचारणा केली. त्यावर या योजनेचे स्वरूप अशाच प्रकारचे आहे. प्रोत्साहन आणि छपाईसाठी हा निधी देण्यात येत असतो असे समितीला सांगितले.

समितीने ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये मराठी भाषेची कार्यशाळा आणि चर्चासत्रे आतापर्यंत आयोजित करण्यात आली नव्हती त्या त्या जिल्ह्यांमध्ये यापुढील काळात प्राधान्याने कार्यशाळा आणि चर्चासत्रे अशा जिल्ह्यांमध्ये घेतली पाहिजेत, अशी सूचना केली तसेच साहित्य संस्कृती मंडळांना जिल्हा शासकीय ग्रंथालयांची सांगड घालून या मंडळांची चर्चासत्रे आणि इतर कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी सांगड घातली तर भविष्यामध्ये अशा प्रकारचे सर्व

कार्यक्रम जिल्हा स्तरावर राबविण्यास मदत होईल. तसेच नव लेखकांची नोंदणी कमी झालेली असल्याने परंतु अशा प्रकारची जर सांगड घातली तर जिल्हा शासकीय ग्रंथालयाच्या माध्यमातून त्या त्या जिल्ह्यातील नव लेखक शोधण्यास मदत होईल आणि शासकीय ग्रंथालय नव लेखकांची यादी मुख्य कार्यालयामध्ये पाठवू शकेल. त्यामुळे जिल्हा शासकीय ग्रंथालयांनाही या यंत्रणेमध्ये सामावून घेण्यात यावे असेही समितीने मत व्यक्त केले.

साहित्य संस्कृती मंडळाच्या संकेतस्थळावर सर्व योजनांची माहिती उपलब्ध व्हावयास पाहिजे. राज्य शासनाचा सर्व कारभार पूर्णपणे मराठीतून चालला पाहिजे, यासाठी नुकताच मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे.असे असताना मराठी साहित्य संस्कृती मंडळाने त्यांच्याकडे असलेल्या सर्व योजना, इतर कार्यक्रम यांसाठी प्रयत्न केले पाहिजेत. मराठी भाषा संस्कृती महामंडळाच्या योजना, चर्चासत्रे, परिसंवाद जिल्ह्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.ज्यावेळी रविंद्र नाट्य मंदिर येथे समिती भेट देण्यासाठी गेली होती त्यावेळी असा मुद्दा उपस्थित झाला होता की, अशा प्रकारचे प्रयत्न करण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञान विभागाची आवश्यकता लागते. परंतु त्या विभागाचे पाहिजे तसे सहकार्य मिळत नाही. त्यामुळे याबाबत काय सद्यःस्थिती आहे अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून आवश्यक असे सहकार्य मिळत नाही. कारण हे संकेतस्थळ शासनाचे असल्यामुळे ते शासनाच्या संकेतस्थळावर माहिती ठेवावी लागते. सदर संकेतस्थळ खाजगी सर्व्हरवर घेता येत नाही. त्यामुळे कोणत्या विभागाला खाजगी सर्व्हर घेण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून परवानगी मिळत नाही. महामंडळे ही स्वतःच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करू शकतात. शासनाच्या सर्व्हरचे प्रश्न अद्यापपर्यंत पूर्णपणे सुटलेले नाहीत. त्यामुळे मराठी भाषेच्या संकेतस्थळाला अद्ययावतीकरण करण्यासाठी प्राधान्य दिले जात नाही असे समितीला सांगितले.

प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत "नागरिकांची सनद" अशा प्रकारचे पुस्तक तयार करण्यात आलेले आहे. याप्रमाणेच "मराठी भाषेची सनद" अशा प्रकारचे पुस्तक तयार करता येऊ शकेल. त्या पुस्तकामध्ये मराठी भाषा विभाग काय कार्यक्रम, योजना घेते त्याबाबतची माहिती प्रसिद्ध करता येऊ शकेल. अशा प्रकारे मराठी नागरिकांच्या हक्काची सनद तयार करता येऊ शकेल. त्या सनद पुस्तिकेमध्ये संपर्काचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल अशा प्रकारची माहिती दिली आणि त्याला प्रसिद्धी दिली तर नागरिकांचा चांगला प्रतिसाद मराठी भाषेसाठी मिळू शकतो. त्यामुळे याबाबत विभागाने निश्चितपणे विचार केला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ज्याठिकाणी लोकांचा जास्त संपर्क येऊ शकतो त्या ठिकाणी जर अशा प्रकारची पुस्तके ठेवली तर त्या

पुस्तिकेची मागणी वाढेल, याबाबत समितीने सूचना केली त्यावर समितीने जी सूचना केली आहे, ती योग्य असून त्याबाबत नोंद घेण्यात येईल. साहित्य संस्कृती विश्वकोश यांची स्वतःची माहिती प्रसिद्ध होत असते. त्यामुळे त्यांचेही एकत्रिकरण करून लोकांपर्यत पोहचविण्यासाठी त्याचा प्रसार करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल असे प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांनी समितीला सांगितले.

समितीने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ कार्यालयास प्रशस्त जागेची आवश्यकता असल्याने त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय व त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबतची सद्यःस्थिती विचारली असता, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे कार्यालय हे सध्या पु. ल. देशपांडे अकादमीच्या १४८१ चौ. फूट जागेमध्ये कार्यरत आहे. याव्यतिरिक्त अकादमीमध्ये जे बैठकीचे दालन आहे किंवा जी राहण्याची व्यवस्था आहे, ती सर्वांसाठी सामाईक आहे. तिचाही ते वापर करीत असतात. फक्त कार्यालयीन काम पाहिले तर १४०० ते १५०० स्क्वेअर फूट जागा पुरेशी आहे. अर्थात त्यांना स्वतंत्र बैठक व्यवस्था नाही किंवा राहण्यासाठी जर ज्येष्ठ साहित्यिक आले तर, त्यांच्यासाठी ही व्यवस्था नाही. त्यांना आता सध्या सामाईक सुविधा वापरावी लागते. शासनाचा मराठी भाषा भवन करण्याचा एक जुना प्रस्ताव ब-याच दिवसांपासून चर्चेमध्ये होता. कामा हॉस्पिटलच्या मागे असलेल्या रंगभवनाच्या ठिकाणची जागा शासनाने मराठी भाषा भवनासाठी वितरित केली होती. परंतु, या बांधकामाला महापालिकेची परवानगी मिळाली नाही कारण तेथे दोन अडचणी होत्या. एक तर ती पुरातन वास्तु (हेरिटेज) असल्याने त्या ठिकाणी कोणतेही बांधकाम करता येणार नाही. दुसरे म्हणजे उच्च न्यायालयाचे असे आदेश होते की, ते रुग्णालय व विद्यापीठ यांच्यामध्ये असल्यामुळे तेथे आवाज करतील असे कोणतेही कार्यक्रम घेता येणार नाहीत. या दोन्ही कारणांमुळे मराठी भाषा भवन त्या ठिकाणी करण्याचा प्रस्ताव मागे पडला. त्यानंतर राज्यमंत्री मंडळाने मार्च महिन्यामध्ये असा निर्णय घेतलेला आहे की, मराठी भाषा भवन हे बांद्रा-कुर्ला संकुल येथे ज्या ठिकाणी पुराभिलेख कार्यालय होणार आहे, त्या ठिकाणी सुरू करावे. परंतु, त्याचे एक दुसरे केंद्र ऐरोली येथे सुरू करावे. कारण ऐरोली येथे सिडकोने जागा उपलब्ध करून दिलेली आहे. त्या ठिकाणी जवळपास ३२ हजार चौ. फूट इतक्या बांधकामाचा प्रस्ताव आता तयार झालेला आहे. त्याकरिता अर्थसंकल्पामध्येही तरतूद झालेली आहे. ती जागा मराठी भाषा विभागाने आता ताब्यात घेतलेली आहे. त्या ठिकाणी आपण मराठी भाषा भवन हे जर व्यवस्थितपणे मोठ्या प्रमाणावर केले तर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था व

भाषा संचालनालय ही सर्व कार्यालये त्या ठिकाणी येतील व त्या ठिकाणी चांगले सभागृह देखील होऊ शकेल. तसेच, जर तेथे ८-१० ज्येष्ठ साहित्यिक आले तर त्यांच्या राहण्याची व्यवस्थाही त्या ठिकाणी करता येईल. आता प्राप्त परिस्थितीमध्ये हे कार्यालय या ठिकाणी सुरू आहे. पुढच्या २ ते ३ वर्षांमध्ये ते कार्यालय चांगल्या ठिकाणी एकत्रितरित्या सुरू होऊ शकेल असे प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांनी समितीला सांगितले.

त्यावर समितीने आपले मत व्यक्त करताना सांगितले की, मोठे मराठी भाषा भवन करणार हे चित्र खूप छान आहे. परंतु, दरम्यान ३-४ वर्षांचा कालावधी जावयाचा आहे. मराठी भाषा भवन ऐरोली येथे सुरू होण्याबाबत आपण सन २०१८ मध्ये बोलत आहोत मात्र ते सन २०२३ पर्यंत सुरू होत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे आता उपलब्ध असलेल्या जागेवर ते करण्याची आवश्यकता आहे. मराठी भाषा संस्कृतीचा मूळ गाभा कोठे असेल तर तो धोबी तलाव परिसरातील आहे. हे मराठी भाषेचे हृदय आहे. तो मराठी भाग आहे. या ३ वर्षांच्या कालावधीसाठी या परिसरात आपल्याला मराठी भाषा भवनाचे काम तात्पुरत्या स्वरुपात सुरू करण्यासाठी जर जागा मिळाली तर, शासन ती घेणार असेल तर ती जागा मुंबई मराठी साहित्य संघाची आहे. तेथे सध्या महिन्यातून १ किंवा २ प्रयोग होतात, तेथे आज सर्व सुविधा उपलब्ध आहेत. त्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मधु मंगेश कर्णिक आहेत. विभागाने मराठी साहित्य संघाला जर काही स्वरुपात मोबदला दिला तर, ते त्यांचे उत्पन्न होऊ शकेल. त्यातून त्यांचे उपक्रम चालतील व मंडळाच्या जागेचा प्रश्न सुटेल. त्यासाठी जागेची पाहणी करून त्याची उपयुक्तता आहे किंवा नाही हे प्रथम तपासावे लागेल. त्यामुळे मंडळाचे कार्यालय गिरगावात म्हणजे मराठी भागात राहील.

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व त्याचे नियोजन कशाप्रकारे करण्यात येते याबाबत विचारणा केली असता, या ज्ञानमंडळासाठी प्रत्येक वर्षी १ कोटी ५० लाख ८० हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रत्येक ज्ञानमंडळास दरवर्षी २ लाख ४० हजार रुपये देण्यात येतात. ४७ ज्ञानमंडळाची स्थापना झालेली आहेत. त्यातील काहींचे काम पूर्ण झाले नव्हते किंवा समन्वयकांनी असमर्थता दर्शविली असल्यामुळे ३ ज्ञानमंडळे रद्द झालेली आहेत. सध्या ४४ ज्ञानमंडळे कार्यरत आहेत. प्रत्येक वर्षी त्यांना १ कोटी ५० लाख ८० हजार रुपये दिले जातात असे समितीला सांगितले व ज्ञानमंडळाची कामे विशद करताना त्यांनी सांगितले की, ज्ञानमंडळांनी सुरुवातीला विश्वकोशाचे जे खंड झालेले आहेत, त्यातील बरीच माहिती अद्ययावत करण्याची आवश्यकता होती, ती माहिती आता अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे.

यातून जुन्या नोंदी अद्ययावत करणे, त्यांचे लेखन, समीक्षण करणे तसेच समीक्षकांचे मानधन, ज्ञानमंडळाच्या बैठका, प्रशिक्षणाचा खर्च, हा सर्व खर्च भागविला जाणार आहे. १ कोटी ५० लाख रुपये ४४ ज्ञानमंडळांमध्ये विभागले गेले आहेत. उरलेल्या ज्ञानमंडळांची जेव्हा स्थापना होईल तेव्हा त्यांनाही तो निधी वितरित केला जाईल. **परिशिष्ट एक (ब)**

त्यावर समितीने सदर निधी पुरेसा आहे काय तसेच सदर निधीमध्ये मंडळाचे काम समाधानकारकरित्या होत आहे काय? याबाबत प्रश्न केला त्यावर विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, आतापर्यंत आपण एकंदर २० खंड प्रकाशित केले. परंतु, या सर्वांचे अद्ययावतीकरण करणे ही जबाबदारी जर आपण फक्त विश्वकोश संपादक मंडळावरच टाकली तर ते काम पुढील २०-२५ वर्षे सुरू राहील व त्यानंतर पुन्हा अद्ययावतीकरण करावे लागेल. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात पेपर अद्ययावतीकरण हा प्रकार सुसंगत राहिलेला नाही. त्यामुळे या विश्वकोश मंडळाने अशी कल्पना समोर आणली की, अद्ययावतीकरण हे फक्त संपादक मंडळापुरते मर्यादित न ठेवता महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी विद्यापीठे असतील किंवा त्या त्या क्षेत्रामध्ये उदाहरणार्थ पुणे विद्यापीठाचे भूशास्त्र विभाग फार चांगले आहे. कृषी विद्यापीठेही आहेत त्यांनी त्या सर्वांचे अद्ययावतीकरण करावे. त्यासाठी ती ज्ञानमंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. त्यांना त्या २० खंडातील नोंदी अद्ययावतीकरण करण्यास दिल्या आहेत. ते त्या नोंदींचे अद्ययावतीकरण करतात परंतु, त्यांना ते परस्पर टाकण्याचे अधिकार नाहीत. ते संपादक मंडळामार्फतच टाकावे लागतात. कारण त्यांच्यावर संस्करण करण्याची जबाबदारी संपादक मंडळाची आहे. त्याचा एक शिष्टाचार आहे. त्या शिष्टाचार प्रमाणेच ते विश्वकोशामध्ये आले पाहिजेत. त्यासाठीच ज्ञानमंडळे स्थापन करण्यात आली आहेत. त्यामुळे त्यांचे काम हे प्रामुख्याने पूरक काम आहे. ते नोंदी अद्ययावत करून संपादक मंडळाला सादर करतात. त्यामुळे ते काम लवकर होते. ४४ ज्ञानमंडळे स्थापन झाली असून आवश्यकतेप्रमाणे आपण त्यांना ५० ज्ञानमंडळे स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. परंतु, त्यांना जर आवश्यकता भासली तर ते आणखी ज्ञानमंडळे स्थापन करू शकतात किंवा कमी करू शकतात कारण आपण त्यामध्ये परिवर्तनशीलता ठेवली आहे. त्या त्या ठिकाणच्या ज्ञानमंडळांना त्या त्या विषयाचे प्राविण्य लक्षात घेऊन त्यांनी काम करावयाचे आहे.

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाला भेट दिली, त्यावेळेस समितीला असे सांगण्यात आले की, विश्वकोशाचे २० खंड जनतेला पाहण्यासाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबत तांत्रिक अडचणी उद्‌भवत आहेत. सदरहू अडचणींचे निराकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली? अशी समितीने विचारणा केली, त्यावर साहित्याच्या बाबतीत

जी अडचण येत होती तीच अडचण या विश्वकोशाच्या बाबतीत व मराठीच्या सर्वच संकेतस्थळाच्या बाबतीत येत आहे. त्यामुळे याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे असे सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई यांनी सांगितले.

समितीने एकाच तज्ज्ञावर आपण किती भार टाकणार आहात? श्री. बाळ फोंडके यांच्याकडे तुम्ही १८ ज्ञानमंडळे दिली आहेत. आपण इतर तज्ज्ञांचा शोध का घेत नाही असा प्रश्न केला असता, ज्ञानमंडळाचे पालकत्व घ्यायचे हे मंडळाच्या बैठकीतच ठरले आहे. विश्वकोश निर्मिती मंडळाचे २२ सदस्य आहेत. त्यातील ज्यांच्याकडे ज्या विषयाची तज्ज्ञता आहे जसे की, मानव्य शाखेच्या लोकांना मानव्य विषयाचे पालकत्व दिलेले आहे. श्री. बाळ फोंडके हे वैज्ञानिक असल्यामुळे त्यांना विज्ञान विषयाचे पालकत्व दिले आहे आणि हे स्वेच्छेने दिलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

परंतु त्यावर समितीने आक्षेप घेतला की, आता इतक्या सुधारणा झाल्या आहेत, इतके लोक उपलब्ध आहेत तरीसुद्धा एकाच व्यक्तीकडे किती काम द्यावयाचे याबाबत काही तरी विचार करणे आवश्यक आहे. त्यावर स्पष्टीकरण देताना प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांनी सांगितले की, आपण शासन म्हणून हस्तक्षेप करायचा का याबाबत प्रश्न उपस्थित होतो. कारण विभागाने जर असे म्हटले की, तुम्ही यांना न घेता दुस-यांना घ्या तर यामध्ये त्यांच्या स्वायतत्तेचा प्रश्न निर्माण होतो. हा पूर्णपणे त्यांनी घेतलेला निर्णय आहे. त्यामध्ये विभागाचा कोणताही हस्तक्षेप नाही. आपण फक्त त्यांना अनुदान उपलब्ध करून देतो. ते किती द्यायचे हे देखील त्यांनीच ठरविले आहे. त्यामुळे हे त्यांचेच लोक आहेत, त्यांनीच त्यांची नियुक्ती करावयाची आहे व त्यांनीच त्या नोंदी अद्ययावत करून घ्यावयाच्या आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळावर, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावर शासनामार्फत अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाते. परंतु, त्यांना त्यांच्या कामकाजासाठी जर आणखी कोणाला घ्यावयाचे असेल तर त्यांना ती स्वायतत्ता देण्यात आली आहे.

समितीने ४४ मंडळांची स्थापना करुन किती वर्षे झाली व त्या मंडळांमार्फत आतापर्यंत कोणते काम करण्यात आले, नवीन ज्ञानमंडळे स्थापन करावी लागतील का याबाबत माहिती देण्यास सांगितले, तेव्हा सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ यांनी ज्ञानमंडळे स्थापन झाल्यानंतर पहिल्यांदा विषय असा होता की, अद्ययावतीकरण करायचे आधी १८ हजार नोंदी २० खंडांमध्ये आलेल्या आहेत किंवा आता विषय वाढले त्यामुळे प्रथम नोंद यादी तयार करणे. ही नोंद यादी तयार करीत असताना विषयाची व्याप्ती, त्यांची नोंद यादी व मग त्यासाठी प्राप्त लेखक या

सर्व गोष्टी ज्ञानमंडळाने अनेक बैठका घेऊन तयार केलेल्या आहेत. गेल्या दीड वर्षांपासून प्रत्यक्ष नोंद लेखनाचे काम सुरू झालेले आहे. आतापर्यंत सर्व ज्ञानमंडळांनी १०७१ नोंदी लिहिलेल्या आहेत आणि त्यांचे संपादनही झालेले आहे. सर्व ४४ ज्ञानमंडळे कार्यरत आहेत. लेखक लिहित आहेत, संपादक नोंदीचे समीक्षण करीत आहेत व हे काम या पद्धतीने सुरू आहे. समन्वयकांना ज्ञानमंडळ त्यांच्या तज्ज्ञतेनुसार दिलेले आहे. परंतु, प्रत्यक्ष काम करताना काही समन्वयकांनी ते काम केले नाही किंवा टाळाटाळ केली म्हणून मंडळाने असा निर्णय घेतला की, ते काम दुस-यांना देण्यात यावे म्हणून करार रद्द करण्यात आला. तशा पद्धतीने दुसरीकडे काही ज्ञानमंडळे स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे असे समितीला सांगितले.

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामध्ये ५१ पदांमधील विभाग संपादक, सह संपादक ही पदे नियमित वेतनश्रेणीमध्ये भरण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत वित्त विभागास सादर केलेल्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे? याबाबत विचारणा केली, त्यावर सध्या विभागाच्या आकृतीबंधाचा एकत्रित प्रस्ताव वित्त विभागाला सादर केलेला आहे. विभाग संपादक ही पदे मानधनावर न ठेवता नियमित वेतनश्रेणीवर ठेवावीत असा विभागाने प्रस्ताव सादर केलेला आहे. सचिव समितीची मान्यता झाल्यानंतर पदे आकृतीबंधात मंजूर झाली की ती नियमित आस्थापनेवर येतील असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले त्यावर समितीने ५१ मान्य पदांपैकी किती पदे रिक्त आहे व ती केव्हापासून रिक्त आहेत असा उप प्रश्न केला असता, ५१ पदांपैकी १० पदे मानधनावरील होती तर ४१ पदे ही नियमित वेतनश्रेणीतील असून त्यातील १५ पदे रिक्त आहेत तर २६ पदे कार्यरत आहेत. सदरहू पदे साधारणतः २ वर्षांपासून रिक्त आहेत. त्यातील सचिव हे पद फेब्रुवारी महिन्यापासून रिक्त झालेले आहे. १५ पदे रिक्त असून सचिव व सह सचिव या दोन पदांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मुलाखत घेण्यात आली आहे. सहायक सचिव पदाचे आदेश आलेले आहेत. सचिव पदाकरिता मुलाखत झालेली आहे. तसेच लिपिक टंकलेखक यां सारखी काही पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येणार आहेत. मंजूर पदांच्या व्यतिरिक्त आवश्यक अशी जादाची ६ पदे आहेत. ही पदे आकृतीबंधामध्ये येत नाहीत, ही पदे रिक्त आहेत मात्र त्यामुळे कामावर फार विपरित परिणाम झालेला नाही. कमी-अधिक प्रमाणात आवश्यकतेनुसार पदे नियुक्त करण्यात येतात. सचिवांचे पद महत्त्वाचे असून ते लवकरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येईल असे समितीला सांगण्यात आले. **परिशिष्ट एक (अ)**

अभिप्राय व शिफारशी :

- मराठी विश्वकोश या सर्व विषयक संग्राहक ज्ञानकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची तसेच मराठी भाषा, साहित्य, इतिहास, सांस्कृतिक व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला वारसा जतन / संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाचे कार्यालय सध्या मुंबई येथील पु. ल. देशपांडे अकादमीच्या १४८१ चौरस फूट वास्तुमध्ये भाडेतत्वावर स्थापित आहे. दोन्ही कार्यालयांसाठी केवळ २५०० चौ. फूट एवढीच जागा उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त अकादमीमध्ये जे बैठकीचे दालन आहेत ते सर्वांसाठी सामाईक असल्यामुळे मंडळांना बैठक घेण्यासाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नाही. जर त्या कार्यालयामध्ये साहित्यिक, लेखक, प्रकाशक वा इतर मान्यवर व्यक्ती आल्यास त्यांच्यासाठी बैठकीची कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे उक्त कार्यालयांसाठी स्वमालकीच्या प्रशस्त व स्वतंत्र जागेची आवश्यकता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या कार्यालयांसाठी स्वमालकीची प्रशस्त व स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याबाबत मराठी भाषा विभागाने शासनाच्या संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करून त्याचा पाठपुरावा करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या कालावधीत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामध्ये एकूण ५१ पदे असून विभाग संपादक व सह संपादक या पदांचा त्यात समावेश आहे. विभाग संपादक व सह संपादक यांच्या माध्यमातून विश्वकोशांच्या नोंदी अंतिम करण्यात येतात. सध्या विभाग संपादक व सह संपादक ही पदे मानधन तत्त्वावर भरण्यात आलेली आहेत. तसेच सदर ५१ पदांपैकी १० पदे देखील मानधन तत्त्वावर भरण्यात आलेली असून ४१ पदे ही नियमित वेतनश्रेणीतील असून त्यातील १५ पदे रिक्त आहेत तर २६ पदे कार्यरत आहेत. मानधन तत्त्वावरील पदे केवळ ११ महिन्यांच्या तात्पुरत्या कालावधीकरिता भरण्यात येतात व त्याकरिता दरवर्षी शासनाची मान्यता घेऊन जाहिरातीद्वारे अर्ज मागवून पदे भरण्याची प्रक्रिया पार पाडावी लागते. त्यामुळे ११ महिन्यांच्या करारावर काम करण्याकरिता अनुभवी व गुणवत्ताधारक व्यक्तींना काम करण्यात स्वारस्य निर्माण होत नाही. तसेच ११ महिन्यांच्या कालावधीनंतर नोकरी संपुष्टात येणार असल्याची भावना त्यांच्यात दिसून येते. त्याचा विपरीत परिणाम

त्यांच्या कामकाजावर होतो. अतः मराठी भाषा विभागाने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामध्ये ५१ पदांमधील विभाग संपादक व सह संपादक ही पदे नियमित वेतनश्रेणीमध्ये भरण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत वित्त विभागास दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी प्रस्ताव सादर केला आहे. **मराठी भाषा विभागाने वित्त विभागास सादर केलेल्या सदर प्रस्तावास वित्त विभागाने लवकरात लवकर मान्यता द्यावी जेणेकरून मंडळाला अनुभवी व गुणवत्ताधारक व्यक्तींच्या ज्ञानाचा लाभ मिळेल अशी समिती शिफारस करीत आहे.**

- विश्वकोशाची व मराठी भाषेची सर्व संकेतस्थळे सद्यःस्थितीत बंद असून याबाबतीत मराठी भाषा विभागास विविध तांत्रिक व प्रशासकीय अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू संकेतस्थळे दुरुस्त करण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून आवश्यक असे सहकार्य मिळत नसल्यामुळे मराठी भाषा विभागास शासनाच्या संकेतस्थळावरच माहिती ठेवावी लागते. सदर संकेतस्थळ खाजगी सर्व्हरवर घेता येत नाही त्यामुळे कोणत्याही विभागाला खाजगी सर्व्हर घेण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून परवानगी मिळत नाही. परिणामी राज्यातील जनतेला मराठी भाषेच्या माहितीपासून वंचित रहावे लागत आहे. महामंडळे ही स्वतःच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करू शकतात. परंतु विभागाच्या सर्व्हरच्या समस्येबाबत अद्यापपर्यंत पूर्णपणे निराकरण झालेले नसल्यामुळे मराठी भाषेच्या संकेतस्थळावरून पाहिजे तशा माहितीचे सादरीकरण (अपलोड) करता येत नाही.

  मराठी भाषा विभागाला ऑक्सफर्ड शब्दकोश (डिक्शनरी) ऑनलाईन करण्यामध्ये शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने ब-याच अडचणी येत आहेत. त्या दूर करण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागाने मराठी भाषा विभागाला संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करण्यासाठी पूर्णपणे स्वातंत्र्य देण्याबाबत तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या कालावधीत कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

- राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ज्याप्रमाणे महसूल विभागाचे कार्यालय कार्यरत असते, त्याच धर्तीवर प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मराठी भाषा विभागाचे कार्यालय मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार व संवर्धनासाठी राबवावयाच्या विविध योजनांची जनतेस माहिती

होण्यासाठी सुरू करणे आवश्यक असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. **याबाबत मराठी भाषा विभागाने तसा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी तात्काळ सादर करावा व वित्त विभागाने त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

- मराठी भाषा विभागाच्या कार्यालयांमध्ये एकूण १७२ पदांना मंजुरी असताना सद्य:स्थितीत केवळ १३२ पदेच कार्यरत असून सुमारे ४० पदांचा अनुशेष बाकी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच उक्त पदांपैकी अनुवादकांच्या ४२ मंजूर पदांपैकी सद्य:स्थितीत १० पदे रिक्त असल्याने अनुवादाची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **मराठी भाषा विभागाच्या कार्यालयांमधील सदर रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याबाबत तसेच अनुवादकांच्या पदांच्या संख्येत वाढ करण्याबाबत वित्त विभागाने तात्काळ कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

- मराठी भाषेचा सर्वांगीण विकास होण्यासाठी राज्यातील नाशिक व अमरावती येथील मराठी भाषा विभागाच्या प्रादेशिक कार्यालयांना शासनाने दिनांक २ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्त्वत: मान्यता दिलेली आहे. मात्र अद्यापपर्यंत ही कार्यालये कार्यान्वित झालेली नाहीत. यामुळे तेथील स्थानिक जनतेला माहिती प्राप्त होऊ शकत नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

  नाशिक व अमरावती येथील कार्यालये तातडीने सुरू करण्याबाबत वित्त विभागाने तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

- मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली चार कार्यालये कार्यरत असून त्यांची उद्दिष्टे स्वतंत्र आहेत. मराठी भाषा विभागांची जिल्हापातळीवर कोणतीही कार्यालये कार्यरत नाहीत, त्यामुळे मराठी भाषा विभागाला उपक्रम राबविताना विविध अडचणी येतात. तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धनाबाबतचे उपक्रम राबविण्याकरीता विभागाला शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाची मदत घ्यावी लागते. त्यामुळे संचालक, ग्रंथालय कार्यालय हे मराठी भाषा विभागाला जोडण्याबाबतचा प्रस्ताव मराठी भाषा विभागाने दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला सादर केला आहे असे समितीच्या निदर्शनास आले.

मराठी भाषा विभागाला जिल्हास्तरावर उपक्रम राबविण्याकरिता शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाची मदत घ्यावी लागते. त्यामुळे संचालक, ग्रंथालय कार्यालय हे मराठी भाषा विभागाला जोडण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाला सादर करण्यात आला आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करावी जेणेकरून मराठी भाषा विभागाला मराठी भाषेच्या संवर्धनाबाबत विविध उपक्रम राबविण्याकरिता अडचणी येणार नाहीत, अशी समिती शिफारस करीत आहे.

- ज्याप्रमाणे राज्य शासनाच्या इतर विभागात पूर्णकालीन दर्जाचे सचिव/प्रधान सचिव यांची नियुक्ती केली जाते त्याच धर्तीवर मराठी भाषा विभागास पूर्णकालीन सचिव/प्रधान सचिव वा संचालक दर्जाचा एखादा अधिकारी असल्यास मराठी भाषेच्या संवर्धनासाठी त्यांना पूर्ण वेळ देता येऊ शकेल असे समितीस आढळून आले.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाचा कारभार ज्याप्रमाणे चालतो त्याप्रमाणे मराठी भाषा विभागामध्ये प्रधान सचिव दर्जाच्या पदानंतर विभागाचे कामकाज अधिक सक्षमपणे चालविण्यासाठी प्रधान सचिवानंतर एखादे संचालक दर्जाचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात यावे जेणेकरून मराठी भाषेला जास्तीत जास्त न्याय देता येईल अशी समिती शिफारस करीत आहे.

- मराठी भाषा भवन हे मुंबई येथील बांद्रा-कुर्ला संकुलात ज्या ठिकाणी पुराभिलेख कार्यालय होणार आहे त्या ठिकाणी सुरू करण्याचा निर्णय राज्यमंत्री मंडळाने दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी घेतला आहे व त्याचे दुसरे केंद्र ऐरोली येथे सुरू करण्यात येणार आहे. ऐरोली येथे सिडकोने जागा उपलब्ध करून दिलेली आहे त्या ठिकाणी जवळपास ३२ हजार चौरस फूट इतक्या बांधकामाचा प्रस्ताव तयार झालेला आहे आणि ती जागा मराठी भाषा विभागाच्या ताब्यात आहे. त्या ठिकाणी मराठी भाषा भवन सुरू करण्याचे काम प्रस्तावित आहे असे समितीच्या निदर्शनास आले.

मुंबईतील मराठी साहित्य संघाची जागा गिरगावमध्ये मध्यवर्ती ठिकाणी आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत मुंबई मराठी साहित्य संघाच्या जागेमध्ये सर्व सुविधा उपलब्ध असल्याने मराठी भाषा विभागाने मराठी साहित्य संघाला जर काही स्वरूपात मोबदला दिला तर, त्यांना उत्पन्न मिळेल व त्यातून त्यांचे उपक्रम चालतील व

मराठी भाषा भवनाची संपूर्ण उभारणी होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात दोन्ही मंडळांच्या जागेची व्यवस्था होईल. याबाबत मराठी भाषा विभागाने मराठी साहित्य संघाशी समन्वय साधून योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला लवकरात लवकर द्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

पुस्तकांचे गाव – भिलार (जि. सातारा) :

समितीने दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी सातारा जिल्ह्यातील "पुस्तकांचे गाव-भिलार" येथे भेट देऊन पाहणी केली.

समितीने प्रथम प्रकल्प कार्यालय, पुस्तकांचे गाव – भिलार येथे भेट दिली असता पर्यटक श्री. पवार यांनी "पुस्तकांचे गाव" हा अत्यंत चांगला उपक्रम आहे. मी माझ्या कुटुंबियांसमवेत पुस्तकांच्या गावाला भेट दिलेली आहे. पुस्तकांचे गाव हा स्तुत्य उपक्रम असून हा उपक्रम मला खूप आवडलेला आहे, असे समितीला सांगितले.

यानंतर पुणे येथून आलेले वाचक, श्री. मराठे यांनी महाबळेश्वर, पाचगणी व भिलार परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. जुलै महिन्यात येथे खूप आर्द्रता असते. त्यामुळे पुस्तके दोन वर्षांपेक्षा जास्त काळ टिकतील असे वाटत नाही असे समितीला सांगितले. याबाबत श्री. आनंद काटीकर, संचालक, मराठी भाषा विभाग, पुणे यांनी असे सांगितले की, पुस्तकांची बांधणी करून प्लास्टिकचे वेष्टण घातले जाते. तसेच, पावसाळ्यात सर्व पुस्तके कपाटात ठेवली जातात व पुस्तकांच्या खोलीमध्ये कोळशाची शेकोटी पेटवून तापमान सुस्थितीत ठेवले जाते. त्यामुळे पुस्तकांची पाने खराब होत नाहीत, पुस्तके चांगली राहतात. यावर्षी या परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस झालेला असतानासुद्धा सर्व पुस्तके सुस्थितीत आहेत.

श्री. अतुल म्हेत्रे, तहसीलदार यांनी समितीला अशीही माहिती दिली की, महाबळेश्वर परिसरात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे या भागातील सर्व शासकीय कार्यालयांना कोळसा खरेदी करण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळते. राज्यातील इतर तालुक्यातील शासकीय कार्यालयांना अशा प्रकारचे अनुदान मिळत नाही. या परिसरात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे पावसाळ्यात कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये कोळशाची शेकोटी पेटवून तापमान सुस्थितीत ठेवले जाते. त्यामुळे कार्यालयातील कागदपत्रे खराब होत नाहीत. तसेच, आता नवीन स्वयंचलित लोखंडी कपाटाचा (कॉम्पॅक्टर्स सिस्टीमचा) वापर करून तापमान संतुलित केले जाते.

यानंतर माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी समितीला अशी माहिती दिली की, दिनांक ४ मे, २०१७ रोजी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस आणि माननीय सांस्कृतिक कार्य व मराठी भाषा मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या हस्ते सदर प्रकल्पाचे उद्‌घाटन झाले. त्यानंतर दिनांक ५ मे, २०१७ रोजी माननीय श्री.शरद पवार यांनी सदर प्रकल्पाला भेट दिली. माननीय श्री. शरद पवार हे पहिले वाचक आहेत. भिलार गावाची लोकसंख्या २८०० आहे. सदर गाव माननीय सांस्कृतिक कार्य व मराठी भाषा मंत्री श्री. विनोद तावडे यांनी दत्तक घेतले आहे.

पुस्तकांच्या गावातील कोणत्या घरामध्ये कोणत्या विषयाची पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत याबाबतचा फलक प्रत्येक घरासमोर लावण्यात आलेला आहे. उदा. इतिहास, दिवाळी अंक, परिवर्तन चळवळ, कथा, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, ललित गद्य, वैचारिक, लोक साहित्य, बाल साहित्य, विनोदी साहित्य, शिवकालीन इतिहास(गडकिल्ले), चरित्रे, कादंबरी, विज्ञान अशा प्रकारे फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच, बाहेरून आलेल्या वाचकांची राहण्याची व्यवस्था व्हावी यासाठी गावात १२ ठिकाणी निवासाची घरगुती व्यवस्था करण्यात आली असून वाचकांकडून नाममात्र भाडे आकारले जाते. ग्रामपंचायतीने ठराव करून सदर प्रकल्पासाठी ३.५ एकर जागा दिलेली आहे. भिलार गावात अनेक शाळांच्या सहली येतात. तसेच, अनेक हौशी पर्यटक येथे तास-न्-तास पुस्तके वाचतात. पुस्तकांच्या प्रत्येक घरात वाचकांना आपले अभिप्राय नोंदविण्यासाठी "अभिप्राय नोंदवही" ठेवण्यात आलेली असल्याचे समितीला सांगण्यात आले व समितीला अभिप्राय नोंदवही दाखविण्यात आली.

समितीने अभिप्राय नोंदवही बघितली असता अनेक वाचकांनी चांगले अभिप्राय नोंदविले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अभिप्राय नोंदवहीतील अभिप्राय वाचून पुस्तकांचे गाव हा खरोखर स्तुत्य उपक्रम असल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच, वाचकांनी दिलेल्या प्रतिक्रियांचे छायाचित्रण करून ते संकेतस्थळावर किंवा फेसबुकवर अपलोड करावे. जेणेकरून ते वाचकांना किंवा इतर लोकांना बघता येईल, अशीही समितीने सूचना केली.

प्रांत अधिकारी, वाई यांनी माननीय न्यायमूर्ती श्री. चंद्रचूडसाहेब प्रत्येक वर्षी आवर्जून पुस्तकांच्या गावाला भेट देतात. त्यांनी नुकतीच पुस्तकांच्या गावाला भेट दिली असल्याचे समितीला सांगितले.

विविध शाळांमध्ये "लेखक तुमच्या भेटीला" हा कार्यक्रम आयोजित करून लेखक किंवा कवींना त्या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले जाते. आपण कोणत्या कविता वाचणार आहोत, कवी कोण आहेत, त्यांनी कोणत्या अर्थाने कविता लिहिलेली आहे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली

जाते. प्रकल्प कार्यालयाच्या वतीने कवी संम्मेलन किंवा इतर कार्यक्रम आयोजित केले जातात काय अशी समितीने विचारणा केली असता, राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक महिन्याला कार्यक्रम आयोजित केला जातो. मागील महिन्यात कवी संम्मेलन आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात सन १९०९ पासून सन २०१७ पर्यंतचे दिवाळी अंक ठेवले होते. त्यावेळी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार देखील करण्यात आला होता, असेही समितीला सांगण्यात आले. यानंतर समितीला माहितीपट दाखविण्यात आला.

समितीला माहितीपट दाखवून अशी माहिती देण्यात आली की, भिलार गाव पाचगणीपासून साधारणपणे ५ किलोमीटर व महाबळेश्वरपासून १४ किलोमीटर अंतरावर आहे. गावामध्ये जवळपास १५ हजार पुस्तके आहेत. पुस्तकांच्या गावाला वाचक मोठ्या संख्येने भेट देतात व येथे तास-न्-तास पुस्तके वाचतात. माननीय शिक्षण मंत्री, श्री. विनोद तावडे यांच्या कल्पनेतून पुस्तकांचे गाव ही संकल्पना साकार झालेली आहे.

भिलार गाव पुस्तकांचे गाव म्हणून ओळखले जाते. आपल्याला पुस्तकांच्या गावात जगातील कोणतेही पुस्तक मिळते. देशातून व जगातून पर्यटक येथे पुस्तके वाचण्यासाठी येतात. पुस्तकांचे गाव हे विनामूल्य वाचनालय आहे. गावात २५ घरे व सार्वजनिक ठिकाणी पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. बालसाहित्य, कादंबरी, महाराष्ट्र प्रदेश, मराठी भाषा संस्कृती, दिवाळी अंक, इतिहास, चरित्र, आत्मचरित्र, वर्तमानपत्र, साप्ताहिके, छत्रपती शिवाजी महाराज (गडकिल्ले), परिवर्तन चळवळ, कथा, स्त्री साहित्य, लोक साहित्य, ललित गद्य, संत साहित्य, कविता, वैचारिक पुस्तके अशा प्रकारे पुस्तकांची विभागणी करण्यात आली असून ती पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

भिलार गाव नैसर्गिक सौंदर्याने नटलेले आहे. वाचक शनिवार व रविवारी मोठ्या संख्येने पुस्तकांच्या गावाला भेट देतात. पुस्तकांच्या गावात वाचकांसाठी विविध विषयांची पुस्तके उपलब्ध आहेत. ज्या घरामध्ये वाचकांसाठी पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत त्या घराला दरवाजे नाहीत. प्रकल्पाची वेळ सकाळी १०-०० ते सायंकाळी ७-०० वाजेपर्यंत आहे. पुस्तकांचे गाव हजारो वाचकप्रेमी, पर्यटक, शाळांच्या सहलीने फुलून गेलेले आहे, असे समितीला सांगण्यात आले.

संचालक, मराठी भाषा विभाग, पुणे यांनी समितीला अशी माहिती दिली की, आम्ही दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ पूर्वी कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र विषयाचे दोन भाग करणार आहोत. तसेच, वाचकांसाठी गुजराथी भाषेची पुस्तके देखील ठेवण्यात येणार आहेत.

यानंतर समितीला अशी माहिती देण्यात आली की, पुस्तकांच्या गावात पर्यटक, वाचक व शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहली येतात. रोज ५ ते ६ शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहली येतात. गावामध्ये सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. सहलीसाठी आलेल्या मुली एखाद्या पुस्तकांच्या घरात गेल्या आणि त्यांना बाथरुमला जायचे असेल तर त्यांना तेथे रांग लावावी लागते. म्हणून गावात सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. तसेच, भिलार येथे सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था होत नसल्यामुळे त्यांना वाई, सातारा येथे मुक्कामासाठी जावे लागते. म्हणून भिलार येथे राहण्याची व्यवस्था (डॉर्मिटरी) असणे आवश्यक आहे. हनुमान मंदिर येथील ८ खोल्या शासनाला दिलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितच्या (MSRDC) माध्यमातून त्या खोल्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर त्या खोल्या वापरात आणता येतील असे समितीला सांगण्यात आले. समितीने गावात वाहनतळाची व्यवस्था आहे काय अशी विचारणा केली असता वाहनतळाची व्यवस्था असल्याचे समितीला सांगण्यात आले.

यानंतर समितीला अशी माहिती देण्यात आली की, भिलार पुस्तकांचे गाव म्हणून ओळखले जाते. पुस्तकांच्या गावाला भेट देणा-या पर्यटक व वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भिलार गाव ठळकपणे निदर्शनास येत असल्यामुळे गावात त्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. शासनाने मुख्य रस्त्याच्या कामाचा अर्थसंकल्पामध्ये समावेश करावा. गावात अंतर्गत रस्ते, पथ दिवे इत्यादी सुविधा निर्माण होणे गरजेचे आहे. **परिशिष्ट एक (ड)**

तसेच, गावातील ग्रामस्थ यांनी समितीला अशी माहिती दिली की, प्रकल्प कार्यालयात कर्मचारी वृंदांची संख्या खूप कमी आहे. एक प्रकल्प सहायक व एक मार्गदर्शक यांना प्रकल्प कार्यालयाचे कामकाज बघावे लागते. कर्मचारी वृंद कमी असल्यामुळे त्यांनी कार्यालयाचे कामकाज बघावे की वाचकांना पुस्तकांचे घर दाखवावे असा प्रश्न निर्माण होतो. गावातील दोन्ही मंदिरे व शाळा येथील पुस्तकांविषयी सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी कर्मचारी नसल्यामुळे गावातील स्वयंसेवकांना माहिती देण्यास सांगितले जाते. ज्या घरात ज्या विषयाची पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत त्याबाबत घरातील लोक वाचकांना माहिती देतात. आम्हाला ८-९ लोकांची आवश्यकता आहे. शासनाकडे तशी मागणी देखील केलेली आहे असे समितीला सांगितले असता समितीने सदर पत्राची छायांकित प्रत समितीला द्यावी असे सांगितले तसेच आम्ही यासंदर्भात पाठपुरावा करु असेही सांगितले. शासनाने भरती करताना स्थानिक मुलांना नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, असे तेथील ग्रामस्थांनी समितीला सांगितले.

आम्ही पुस्तकांचे गाव या नावाने फेसबुक खाते तयार केलेले आहे. प्रत्येक पुस्तकांच्या घरात वाचकांसाठी अभिप्राय नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. त्यातील काही अभिप्राय फेसबुकवर अपलोडे केले जातात असेही समितीला सांगण्यात आले. त्यानंतर समितीने पुस्तकांच्या घरांची पाहणी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व गडकिल्ले

समितीने माजी सन्माननीय सदस्य कै.भि.दा.भिलारे (गुरुजी) यांच्या घरी भेट दिली असता समितीला फिरत्या मांडणीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज इतिहास व गडकिल्ले या विषयाची विविध पुस्तके ठेवण्यात आलेली असल्याचे आढळून आले.

वाचक पुस्तके वाचण्यासाठी घरी आल्यानंतर आपल्याला त्रास होत नाही काय अशी समितीने घर मालकाला विचारणा केली असता आम्हाला वाचकांकडून कोणताही त्रास होत नसल्याचे त्यांनी समितीला सांगितले.

समितीला भेटीच्या वेळी प्रत्येक घराच्या भिंतीवर त्या घरात ठेवण्यात आलेल्या पुस्तकांची माहिती दर्शविणारे चित्र काढलेले असल्याचे आढळून आले. समितीने याबाबत विचारणा केली असता समितीला अशी माहिती देण्यात आली की, मध्यंतरी जे.जे.स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या गावाला भेट दिली होती. त्यांनी प्रत्येक घराच्या भिंतीवर त्या घरात ठेवण्यात आलेल्या पुस्तकांची माहिती दर्शविणारे चित्र काढलेले असल्याचे समितीला सांगण्यात आले. प्रत्येक पुस्तकांच्या घरात ३८ पुस्तके व बाल साहित्य ठेवण्यात आलेले आहे असेही समितीला सांगितले.

घरात कोणती पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत याची वाचकांना माहिती व्हावी यासाठी पुस्तकांची यादी तयार करण्यात आलेली आहे. समितीने सदर घरातील पुस्तकांची यादी बघितली असता अ. क्र. २० वर "कालातील व्यवस्थापन तत्त्वे" असे पुस्तकाचे नाव टंकित केलेले असल्याचे आढळून आले. समितीने सदर पुस्तकाचे नाव "कालातीत व्यवस्थापन तत्त्वे" असल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले व यादीमध्ये दुरुस्ती करून घ्यावी असेही सांगितले. प्रत्येक घरातील पुस्तकाची बांधणी करून पुस्तकांवर क्रमांक टाकण्याचे काम सुरू असल्याचे समितीला सांगण्यात आले.

समितीने स्व.इंदिरा गांधी यांचे आत्मचरित्र, मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कविता अशी राजकारणी लोकांची पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत काय अशी विचारणा केली असता समितीला नाही असे उत्तर देण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, लोकमान्य

टिळकांची पुस्तके ठेवलेली असून शिवकालीन पुस्तक विभागातील अभिप्राय नोंदवही दोन वेळा भरलेली आहे, असे समितीला सांगण्यात आले. जनतेमध्ये राजकारणाविषयी जागरुकता, आवड निर्माण झाली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक हे देखील राजकारणी होते.

आपल्याला स्व. इंदिरा गांधीजींचे आत्मचरित्र, माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कविता, स्व. प्रमोद महाजन यांच्या भाषणांची पुस्तके ठेवता येतील. "शब्द जैसा कल्लोळ" या पुस्तकात स्व. प्रमोद महाजन यांची खूप वाचनिय भाषणे आहेत अशा पुस्तकांचा वेगळा विभाग करण्याबाबत समितीने संबंधिताना सूचना दिल्या.

ग्रंथसखा पुस्तकालय

समितीने पुस्तकांची पाहणी केली असता समितीला मृत्युंजय, महानायक, युगंधर, छावा, किमयागार, कॉर्पोरेट चाणक्य, लज्जा, आठवणीतल्या कविता इत्यादी पुस्तके ठेवण्यात आलेली असल्याचे आढळून आले.

परिवर्तन चळवळ

समितीने श्री. भिकू तुकाराम भिलारे यांच्या घरी भेट देऊन पुस्तकांची पाहणी केली असता त्यांनी समितीला अशी माहिती दिली की, परिवर्तन चळवळीसंदर्भातील दुर्मिळ ग्रंथ एकाच ठिकाणी ठेवण्यात आलेले आहेत. त्यामुळे वाचकांना परिवर्तन चळवळीसंदभातील सर्व दुर्मिळ पुस्तके एकाच ठिकाणी वाचावयास मिळतात. मी सन १९९२ मध्ये वरिष्ठ मुख्याध्यापक पदावरुन सेवानिवृत्त झालेलो आहे. वाचक पुस्तके वाचण्यासाठी घरी आल्यानंतर त्यांना पुस्तकांविषयी माहिती दिली जाते. आम्हाला येथे पुस्तके वाचण्यासाठी वेळ नसल्यामुळे पुस्तके विकत द्यावीत, अशी काही वाचकांची मागणी असल्याचेही त्यांनी समितीला सांगितले.

यानंतर श्री. गौरव धर्माधिकारी, मार्गदर्शक, प्रकल्प कार्यालय यांनी ब-याच दुर्मिळ पुस्तकांच्या प्रती पुन्हा छापण्यात आलेल्या नाहीत असे समितीला सांगितले असता पुस्तकांच्या प्रती पुन्हा छापण्याबाबत समितीच्या वतीने साहित्य निर्मिती मंडळाला किंवा इतर संबंधित अधिका-यांना सूचना देण्यात येतील असे सांगितले.

समितीने पुस्तकांची पाहणी केली असता महान भारतीय क्रांतिकारक, गोपाळ गणेश आगरकर, गणेश वासुदेव जोशी, भारतातील सामाजिक चळवळी, बलुतं, जागर, शूद्र पूर्वी कोण होते? शोध लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सचित्र इत्यादी पुस्तके ठेवण्यात आलेली असल्याचे समितीला आढळून आले.

कथा

समितीने सौ. वंदना प्रविण भिलारे (सरपंच) यांच्या घरी भेट देऊन पुस्तकांची पाहणी केली असता फिरत्या मांडणीमध्ये व कपाटात विविध पुस्तके ठेवण्यात आलेली असल्याचे आढळून आले. पावसाळ्यात हवेतील आर्द्रता जास्त असल्यामुळे पुस्तके फिरत्या मांडणीमध्ये न ठेवता बंद कपाटात ठेवली जातात व पुस्तकांच्या खोलीमध्ये कोळशाची शेकोटी पेटवून तापमान सुस्थितीत ठेवले जाते. त्यामुळे पुस्तके खराब होत नाहीत. तसेच, वाचकांना मुक्काम करावयाचा असेल तर त्यांच्यासाठी एका खोलीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वाचकांकडून प्रती दिन १ हजार रुपये नाममात्र भाडे घेतले जाते. प्रत्येक शनिवार व रविवारी वाचक मुक्कामी असतात, असे समितीला सांगण्यात आले.

"कृपया वाचकांनी गरजेनुसार पंखा व दिव्यांचा वापर करावा, हे घर आपलेच आहे," अशी सूचना भिंतीवर लिहिलेली आहे. पहिल्या मजल्यावर पुस्तकांचे दालन आहे. पुस्तकांच्या दालनाला दरवाजा नाही. वाचकांसाठी चहाची मशिन ठेवण्यात आलेली असल्याचे समितीला आढळून आले.

यानंतर श्री. प्रविण भिलारे यांनी मध्यंतरी नागपूर येथील एक हॉटेल मालक पुस्तकांच्या गावाला भेट देण्यासाठी आले होते. त्यांनी हॉटेलचे नाव बदलून "पुस्तकांचे हॉटेल" असे नाव दिलेले आहे. त्यांनी बरीच पुस्तके खरेदी करून हॉटेलमध्ये येणा-या लोकांना वाचनासाठी उपलब्ध करून दिलेली आहेत, असे समितीला सांगितले.

जिल्हा परिषद केंद्र शाळा, भिलार

समितीने शाळेला भेट देऊन बाल साहित्य कक्षाची पाहणी केली असता सदर कक्षात जगप्रसिद्ध गोष्टी, कथा खगोल शास्त्राची, पुराणातील संस्कार कथा, जीवन शिक्षण इत्यादी पुस्तके ठेवण्यात आलेली असल्याचे आढळून आले.

पुस्तकांच्या गावात शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहली येतात. सहलीला आलेले विद्यार्थी शाळेतील बाल साहित्य कक्षास भेट देतात. बाहेरुन आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शौचालय व बाथरुमची वेगळी व्यवस्था असावी, असे समितीला सांगण्यात आले.

खुले रंगमंच बांधकाम, भिलार

समितीने खुले रंगमंचाच्या बांधकामाची पाहणी केली असता समितीला अशी माहिती देण्यात आली की, ग्रामपंचायतीने ठराव करून प्रकल्पासाठी ३.५ एकर जागा दिलेली आहे. ग्रामपंचायतीने सदर जागा जिल्हाधिका-यांकडे हस्तांतरित केलेली आहे. आता सदर जागेवर शासनाचे नाव

लागलेले आहे. भिलार गावात जमिनीचा भाव प्रती गुंठा २५ लाख रुपये आहे. सदर जागा बिनशेती असून या जागेवर २०० आसन क्षमतेचे खुले रंगमंच बांधण्याच्या कामास नुकतीच सुरुवात झालेली आहे. खुल्या रंगमंचासमोरील नैसर्गिक दृश्य अत्यंत चांगले आहे. पुस्तकांच्या गावात दररोज ४-५ शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहली येतात. सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना बसण्यासाठी येथे बाक ठेवण्यात येणार आहेत. खुल्या रंगमंचामध्ये सहलीला येणा-या विद्यार्थ्यांचे कार्यक्रम, छोटे कवी संम्मेलन घेता येईल. तसेच, प्रकल्पाची १७ एकर जागा आहे. त्यापैकी ५ एकर जागेवर पयर्टक, वाचकांसाठी राहण्याची व्यवस्था करावी, असे ग्रामस्थ यांनी समितीला सांगितले.

कै. भि. दा. भिलारे गुरुजी (माजी आमदार)
सार्वजनिक सांस्कृतिक भवन, भिलार

समितीने सदर सांस्कृतिक भवनाची पाहणी केली असता सदर जागेवर सहलीसाठी येणा-या विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्थेचे (डॉर्मिटरीचे) बांधकाम करावयाचे आहे. तसेच, पर्यटक व विद्यार्थ्यांसाठी शौचालय व बाथरुमची व्यवस्था करावयाची आहे. सदर बांधकामास नुकतीच सुरुवात करण्यात आलेली आहे, असे समितीला सांगण्यात आले.

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीने सातारा जिल्ह्यातील "पुस्तकांचे गाव-भिलार" येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ९ मे २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने सातारा, पुस्तकांचे गाव-भिलार येथे भेट दिली, त्यावेळी वाचकांनी चांगल्या प्रतिक्रिया नोंदवहीमध्ये नोंदविल्याचे आढळून आले. त्या प्रतिक्रियांचे छायाचित्रण करून ते संकेतस्थळांवर किंवा फेसबुकवर अपलोड करण्याबाबत समितीने सूचना केली होती त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे? याबाबत विचारणा केली त्यावर फेसबुक पेज तयार केलेले असून ते लवकरच अपलोड होईल. ८-१० दिवसात नवीन संकेतस्थळ सर्वांना दिसणार आहे असे समितीला सांगितले.

पुस्तकांचे गांव - भिलार येथे भेट देणा-या पर्यटकांची व वाचकांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्या गावात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? असा प्रश्न समितीने केला त्यावर प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांनी भिलार गावाची निवड केल्यानंतर या कार्यक्रमाला दिनांक ४ मे, २०१८ रोजी एक वर्ष झाले. ही अभिनव स्वरुपाची योजना असून त्यास लोकांचा प्रतिसाद मिळेल की नाही याबाबत सुरुवातीला साशंकता होती.

मात्र लोकांकडून अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या वर्षी दिनांक ४ मे, २०१८ रोजी मंत्री महोदयांनी येथे सर्व यंत्रणांना भेट दिली. येथे काही आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मराठी भाषा वाचकांचा, लेखकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. येथे ८ मी. च्या महत्वाच्या रस्त्याच्या रुंदी करणाचे आदेश दिले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने आर्थिक तरतूद केलेली आहे. या रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. याठिकाणी एक मोठे खुले प्रेक्षागृह बांधण्यात आले आहे. साहित्याविषयी वाचनाचा कार्यक्रम, एकपात्री कार्यक्रम या करिता या पूर्वी तेथे जागा नव्हती. आता २५० जणांची क्षमता असलेले खुले प्रेक्षागृह बांधले असून माननीय मंत्री सर्वश्री. सुभाष देसाई व विनोद तावडे यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले आहे.

या प्रकल्पाकरिता जिल्हा परिषदेची एक जुनी शाळा आपल्याकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. दोन मजली इमारतीमध्ये १२ दालने आहेत. शाळेच्या सहली तेथे येतात. विद्यार्थ्यांकरिता दुस-या मजल्यावर राहण्याची व्यवस्था (डॉर्मिटरी) तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. हे काम जून अखेरपर्यंत पूर्ण होईल. शाळेतील २०० ते २५० विद्यार्थ्यांची तेथे सोय होऊ शकते. मुला-मुलींकरिता वेगवेगळी सोय करण्यात आलेली आहे. तसेच स्वच्छतागृहाकरिता ५ ठिकाणे शोधली असून तेथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत ती बांधण्यात येतील. या ठिकाणी सर्वात महत्वाची अडचण वाहनतळाची आहे. बसेसकरिता तात्पुरती व्यवस्था केली जात आहे. मात्र ही समस्या सोडवण्याकरिता अद्याप समाधानकारक उत्तर सापडलेले नाही. उर्वरित सुविधा ६ महिन्यांत पूर्ण करण्यात येईल अशी माहिती समितीला दिली. समितीने कर्मचारी वर्गाबाबत विचारणा केली, त्यावर कंत्राटी तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यास मान्यता घेतलेली आहे. या महिन्यात त्यांना नियुक्त केले जाईल. येथे विद्यापीठांमधील विद्यार्थी येतात तसेच मोठ्या प्रमाणात स्वयंसेवकही येतात, त्यांनाच प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्या स्वयंसेवकांना प्रोत्साहन देण्याकरिता दैनिक भत्ता दिला जात आहे. प्रशासकीय कामकाजाकरिता ३-४ लोकांची आवश्यकता आहे. मात्र फार जास्त कर्मचा-यांची आवश्यकता आहे असे नाही. येथे मोठ्या प्रमाणात सरकारीकरण होऊ नये याकरिता तेथे सरकारी कार्यालय बांधण्यास देखील अद्याप परवानगी दिलेली नाही. अन्यथा कार्यालयाचे प्रश्न सोडवण्यातच बराच वेळ जातो असे समितीला सांगितले.

समितीने पुस्तकांचे गाव भिलार येथे भेट दिली असता असे निदर्शनास आले की, अनेक दुर्मिळ पुस्तकांच्या प्रती पुन्हा छापण्यात आल्या नाहीत. त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे असा प्रश्न समितीने केला, त्यावर राज्य मराठी विकास संस्थेचा दुर्मिळ पुस्तकांच्या संबंधी

दुसरा एक प्रकल्प आहे. त्या अंतर्गत १२८ पुस्तके व ३४८ नियतकालिकांची छाननी करून संकेतस्थळांवर ठेवलेली आहेत. भिलार येथे दुर्मिळ पुस्तके ई-स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहेत अशी माहिती संचालक, राज्य मराठी विकास संस्था यांनी समितीला दिली.

समितीने पुस्तकांच्या गावाचे क्षेत्रफळ किती आहे व सदर उपक्रमात किती घरांचा समावेश करण्यात आलेला आहे? याबाबत विचारणा केली व तेथे आलेल्या वाचकांसाठी अनुकूल वातावरण असले पाहिजे. झाडाच्या खाली, बागेत बसून पुस्तक वाचण्याचा आंनद वाचकांना घेता आला पाहिजे. साहित्यिक पर्यटन (लिटरेचर टुरिझम) हा एक महत्वाचा विषय आहे. या बाबत आपण विचार केला पाहिजे अशी सूचनाही केली. प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांनी या गावात ३०० घरे असून त्यापैकी साधारण या उपक्रमासाठी ३० घरांचा समावेश झालेला आहे असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

- समितीने सातारा जिल्ह्यातील पुस्तकांचे गाव-भिलार येथे भेट दिली असता, वाचकांनी चांगल्या प्रतिक्रिया नोंदवहीमध्ये नोंदविल्याचे समितीला आढळून आले. भिलार या पुस्तकांच्या गावाला वाचक मोठ्या संख्येने भेट देतात. त्यामुळे पर्यटक व वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे तसेच पुस्तकांच्या गावात पर्यटक, वाचक व शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहली येतात. सहलीसाठी आलेल्या मुलींसाठी शौचालयांची संख्या अपुरी आहे तसेच सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्थाही नसल्यामुळे त्यांना वाई, सातारा, महाबळेश्वर किंवा पाचगणी येथे मुक्कामासाठी रहावे लागते. भिलार गावात येणा-या पर्यटकांसाठी वाहनतळाची तसेच गावातील अंतर्गत रस्ते, पथ दिवे, स्वच्छता इत्यादी पायाभूत सुविधा निर्माण होणे गरजेचे आहे असे समितीच्या निदर्शनास आले.

  पुस्तकांच्या गावाला भेट देणा-या पर्यटक व वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यादृष्टीने गावात त्या प्रमाणात पायाभूत सोई/सुविधा निर्माण कराव्यात तसेच गावामधील सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढविण्यात यावी व गावात येणा-या वाचक, पर्यटक व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी भिलार येथे राहण्याची व्यवस्था (डॉर्मिटरी) उपलब्ध करून देण्यात यावी, जेणेकरून भिलार गावाला येणा-या पर्यटक, वाचकांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल व पर्यायाने त्याचा मराठी भाषेच्या विकासात मोठा हातभार लागेल. त्यादृष्टीने मराठी भाषा विभागाने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत कळविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

- समितीने पुस्तकांचे गाव भिलार येथे भेट दिली त्यावेळी प्रकल्प कार्यालयात कर्मचारी वृंद कमी असल्यामुळे गावातील मंदीरे व शाळा येथे वाचकांसाठी ठेवलेल्या विविध विषयांवरील पुस्तकांविषयी सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे गावातील स्वयंसेवकांना माहिती द्यावी लागते. ज्या घरात ज्याविषयाची पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत त्याबाबत त्या घरातील लोक वाचकांना माहिती देतात ते संबंधित विषयातील तज्ज्ञ नसल्यामुळे त्यांच्या माहिती देण्यास मर्यादा पडत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

  सबब, प्रकल्प कार्यालयात पुरेशा प्रमाणात कर्मचारी वृंदांची तात्काळ भरती करण्यात यावी व सदर पदे भरताना शक्यतोवर तेथील स्थानिक उमेदवारांना संबंधित विषयाचे प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई (जि. सातारा)

समितीने दिनांक २ फेब्रुवारी २०१८ रोजी वाई शहरातील शासकीय मुद्रणालय, प्राज्ञपाठ शाळा मंडळाला भेट देऊन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संबंधित अधिका-यांसमवेत बैठक घेतली.

समितीने शासकीय मुद्रणालयाला भेट दिली असता व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई यांनी समितीला अशी माहिती दिली की, सन १९७२ मध्ये सदर शासकीय मुद्रणालयाची स्थापना झालेली आहे. पेशव्यांचे मामा रास्ते यांनी सन १९७० च्या जवळपास सदर वाडा शासनाच्या ताब्यात दिलेला आहे. सद्यःस्थितीत ७/१२ च्या उता-यावर विश्वकोश निर्मिती मंडळाचे नाव आहे. सन १९७२ मध्ये विश्वकोश निर्मितीच्या छपाईसाठी सदर वाडयामध्ये मुद्रणालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर शासकीय मुद्रणालयामध्ये एकूण ७० पदे मंजूर आहेत, त्यापैकी केवळ ४० कर्मचारी कार्यरत आहेत. मराठी विश्वकोशाच्या खंड १ ते १६ पर्यंतची छपाई खिळ्यांची अक्षर जुळणी (टाईप) पद्धतीने करण्यात आलेली आहे. त्यानंतरच्या पुढील खंडांची पुणे व मुंबई येथे छपाई करण्यात आलेली आहे. आता विश्वकोशाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. तसेच, सदर वाड्यातील मोकळ्या जागेत नवीन इमारत बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सन २०१० मध्ये इमारतीचा मानचित्र मंजूर झालेला आहे. इमारतीचे रेखाचित्र तयार करण्यात आले आहे. सदर योजना व त्यासाठी लागणा-या खर्चास मान्यता मिळावी यासाठी मराठी

भाषा विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, त्यास मंत्रिमंडळाची मान्यता व निधी उपलब्ध झाल्यानंतर कामास सुरुवात होईल. सद्यःस्थितीत शासकीय मुद्रणालयाची कामे वेगवेगळ्या ठिकाणी सुरू आहेत. परंतु, नवीन इमारत झाल्यानंतर मुद्रणालयाची कामे एकाच ठिकाणी करता येतील. नवीन इमारतीमध्ये वरच्या मजल्यावर सभागृह आणि मागील बाजूस अभ्यागतांसाठी प्रवासी निवारा बांधण्यात येणार आहे. तसेच, मुद्रणालयाची जुनी इमारत वंशार्जित संपत्तीमध्ये आहे. जुन्या इमारतीची पडझड झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग जुनी इमारत ताब्यात घेण्यास तयार नाही. जुन्या इमारतीचे जतन व नुतनीकरणाचा प्रस्ताव मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्यामार्फत तयार करण्यात येणार आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तो शासनाकडे सादर करण्यात येईल, असेही समितीला सांगण्यात आले.

सन १९७२ मध्ये विश्वकोश निर्मितीच्या छपाईसाठी सदर वाड्यामध्ये मुद्रणालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. शासनाने सदर शासकीय मुद्रणालयामध्ये मॉडर्न प्रिंटींग मशिन, बाईंडिंग मशिन अशी अत्याधुनिक मशिनरी उपलब्ध करून द्यावी. विश्वकोशाच्या छपाईचे उर्वरित काम पुणे, मुंबई येथील मुद्रणालयामध्ये होते. त्याऐवजी विश्वकोशाचे संपूर्ण काम येथेच पूर्ण व्हावे, असे व्यवस्थापक यांनी समितीला सांगितले.

मुद्रणालयाच्या परिसरामध्ये जुनी विहीर असून विहिरीमध्ये झाडाची पाने पडलेली असल्याचे आढळून आले. समितीने याबाबत विचारणा केली असता विहिरीतील गाळ काढणे व विहिरीत पाने पडू नयेत यासाठी जाळी बसविण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला असल्याचे समितीला सांगण्यात आले.

प्राज्ञपाठ शाळा मंडळ, वाई, जि. सातारा

समितीने प्राज्ञपाठ शाळा मंडळाला भेट दिली असता मंडळाच्या सह सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, मंडळाकडे इ.स.पूर्वीच्या वेगवेगळ्या पोथ्या आहेत. आता पर्यंत धर्मकोशाचे २५ खंड तयार झाले असून आणखी २५ खंड तयार करावयाचे आहेत. प्राज्ञपाठ शाळा मंडळाला लोकांनी ४-५ वाडे दिलेले आहेत. सदर इमारतीच्या दुस-या मजल्यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे कार्यालय असल्यामुळे हा वाडा चांगला आहे. परंतु, इतर वाड्यांची दुरावस्था झालेली आहे. सदर वाडे चुकीच्या पद्धतीने पुरातन वास्तूमध्ये (हेरिटेज) समाविष्ट करण्यात आलेले आहेत. तसेच, प्राज्ञपाठ शाळा मंडळाच्या वतीने "नवभारत" हे वैचारिक मासिक प्रसिद्ध करण्यात येते. नवभारत हे वैचारिक मासिक असल्याचे लोकांनी मान्य केलेले आहे, असेही

समितीला सांगण्यात आले. यानंतर समितीला अशी माहिती देण्यात आली की, सन १९६१ मध्ये प्राज्ञपाठ शाळा मंडळाची स्थापना झालेली आहे. इ.स.पूर्वीच्या अनेक मूळ हस्तलिखित पोथ्या मंडळाकडे उपलब्ध आहेत. आतापर्यंत धर्मकोशाचे २५ खंड तयार झालेले आहेत. आणखी २५ खंड तयार करावयाचे आहेत. शासनाने त्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून द्यावा. धर्मकोशाचा एक खंड प्रसिद्ध करण्यासाठी २५ ते ३० लाख रुपये खर्च येतो. कर्मचा-यांचा पगार, संपादन, छपाई यासाठी हा खर्च करण्यात येतो. धर्मकोश संस्कृत भाषेमध्ये असून त्यांचे मराठी व हिंदी भाषेत भाषांतर करावे, अशी लोकांची मागणी आहे. तसेच, परदेशातील लोकांची सुद्धा धर्मकोशाचे विविध भाषांमध्ये भाषांतर करावे, अशी मागणी आहे. सन १९१६ पासून धर्मकोशाचे काम सुरू आहे. जगातील भारतीय संस्कृती समजावून सांगणारा ठेवा मंडळाकडे आहे. त्यामुळे मंडळाचे ऐतिहासिक काम थांबता कामा नये, असेही समितीला सांगण्यात आले.

यानंतर समितीने धर्मकोशाचे काम आणखी किती वर्षे चालणार आहे, धर्मकोशाच्या छपाईसाठी किती निधी लागणार आहे याबाबत मंडळाने समितीला लवकरात लवकर लेखी निवेदन द्यावे. समितीचे उपरीपत्र (कव्हरींग लेटर) जोडून सदर निवेदन समिती माननीय मुख्यमंत्री व माननीय वित्तमंत्री यांच्याकडे पाठविण्यात येईल असे सांगितले.

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद कार्यालय (आनंदघर शास्त्रीय बाल शिक्षणाचे केंद्र), वाई, जि.सातारा

समितीने बाल शिक्षण केंद्राला भेट दिली असता श्रीमती प्रिती उपाध्ये, मुख्याध्यापक यांनी समितीला अशी माहिती दिली की, प्रा.रमेश पानसे यांनी सदर बाल शिक्षण केंद्र सुरू केले आहे. सदर शाळा ग्राममंगल संस्थेच्या माध्यमातून चालविण्यात येते. मुलांना ज्ञान रचनावादी पद्धतीने शिक्षण दिले जाते. सदर केंद्रात खेळवाडी, शिशूवाडी व बालवाडी अशा ३ गटांमध्ये वर्ग भरविले जातात.

यानंतर समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयात संबंधित अधिका-यांची बैठक घेतली.

सर्वप्रथम सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मित मंडळ यांनी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाबाबत थोडक्यात माहिती दिली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने सुरुवातीच्या काळात मराठी भाषेचा विकास करण्यासाठी संस्था स्थापन केलेल्या होत्या. यापैकी पहिली संस्था महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती असे

या मंडळाचे नाव घेता येईल. या संस्थेंतर्गत १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कामकाजाला सुरुवात झाली होती. तद्नंतर दिनांक १ डिसेंबर, १९८० रोजी विश्वकोशाचे संपादन व प्रकाशन या कार्यार्थ स्वतंत्र महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची राज्यस्तरीय स्थापना करण्यात आली होती. मराठी विश्वकोश हा विषय संग्राहक ज्ञानकोश आहे. मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंड वर्णानुक्रमाने प्रकाशित करण्यात आलेले आहेत. यामध्ये अंक ते ज्ञेयवाद याच्या एकूण १८ हजार ५७ नोंदीचा समावेश आहे. यामध्ये "अ" ते "ज्ञ" पर्यंत सर्व माहिती दिलेली आहे. ब-याच वेळेस विश्वकोश म्हणजे शब्द संग्रह आहे असा समज होतो. शब्दाबद्दलची माहिती त्यामध्ये नमूद केलेली आहे. या ठिकाणी आम्ही समितीला दाखविण्यासाठी काही खंड आणलेले आहेत. अंकापासून ज्ञेयवादापर्यंत संकल्पना, घटना, गावे, व्यक्ती वगैरे इत्यंभूत माहिती ही सार्वभौम स्वरूपात दिलेली आहे. १९७६ मध्ये पहिला खंड प्रकाशित झालेला होता. विशेषतः विज्ञान-तंत्रज्ञानातील काही माहिती जुनी झालेली आहे. यामध्ये तज्ञ किंवा थोर व्यक्तींची देखील भर पडलेली आहे. ती सर्व पुन्हा नव्याने त्यामध्ये अंतर्भूत केली जाणार आहे आणि त्यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना केलेली आहे. खंडांचे आपल्याला पूर्णतः अद्ययावतीकरण करावयाचे आहे. मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंड वर्णानुक्रमाने प्रकाशित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये १८ हजार पृष्ठे, १८ हजार लेखांच्या नोंदी आणि २२ हजार चित्र-स्वरूपातील पृष्ठे आहेत. हे सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अद्ययावत करणे ही काळाची गरज असून, तसे करणे खूप आवश्यक आहे.

याकरिता मुंबई विद्यापीठात जवळजवळ १० विषयांची ज्ञान मंडळे निर्माण केलेली आहेत. नव्याने "अ" ते "ज्ञ" करिता विषयनिहाय कामे सुरू केलेली आहेत. त्यामुळे एकाच वेळी सर्व विषयांमध्ये काम करता येणार आहे. पूर्वी एखादा खंड तयार करताना एक जरी नोंद राहिली तर तो खंड छापता येत नव्हता, अशी त्रुटी होती. आता आम्ही हे सर्व संकेतस्थळावर टाकणार आहोत. त्यामुळे ही नोंद ज्यावेळी होईल, त्यावेळी ती संकेत स्थळावर प्रकाशित होणार आहे. परिणामी सर्वांना त्वरित अद्ययावत माहिती मिळणार आहे आणि ते महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे वैशिष्ट्य म्हणावे लागणार आहे.

मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्थांमध्ये विषयनिहाय ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये मुंबई विद्यापीठ, रसायन तंत्रज्ञान संस्था, मराठी विज्ञान परिषद, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रोद्योगिक संस्था, नागपूर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, नागपूर, पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ अशा प्रकारे राज्यातील सर्वच नामवंत संस्थांमध्ये ४७ ज्ञानमंडळे सुरू केलेली आहेत. अद्ययावत माहिती सर्वांना मिळावी हे त्यामागचे उद्दिष्ट आहे. काही विषयांचे ज्ञान एकच व्यक्ती आत्मसात करू शकत नाही. विश्वकोशामध्ये थोडक्यात माहिती मिळणार आहे. जर अधिक अभ्यास करावयाचा असेल तर त्यातील संदर्भ लक्षात घेऊन अभ्यास करता येणार आहे. अशा प्रकारे विश्वकोशाचे काम हाती घेतलेले आहे. सदरहू काम साहित्य व संस्कृती मंडळाच्या माननीय अध्यक्षांनी सुरू केलेले आहे. विश्वकोशाचे १ ते २० असे जुने खंड आहेत. शासकीय नियम आणि तरतुदीमुळे ते छापून घेण्यासाठी खूप अडचणी येत आहेत. समितीने आताच मुद्रणालयाची अवस्था कशी आहे ती पाहिलेली आहे. मंडळाने ॲप तयार केलेला असून त्यामध्ये एकूण १ ते २० खंड आहेत. हे डाऊनलोड करणे अतिशय सोपे आहे. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी आम्ही ते लघुसंचिकेमध्ये घेतले होते. त्यामुळे ते आपल्याला खिशामध्ये ठेवता येत होते. पण आता लघुसंचिकेमध्ये आपल्या जवळ ठेवण्याची गरज पडणार नाही.

लोकसभेने आमच्याकडे खंडाची मागणी केली होती, परंतु ती उपलब्ध नसल्यामुळे आम्हाला ती देता आली नव्हती. त्यावेळी आम्हाला खूप वाईट वाटले होते. महाराष्ट्र राज्यात स्पर्धा परिक्षांना बसणारे अनेक विद्यार्थी आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्याचा खूप फायदा होणार आहे. तज्ज्ञ अभ्यासकांना देखील खंडाचा अभ्यास करण्यासाठी खूपच फायदा होणार आहे. परंतु, खंडच उपलब्ध नसल्यामुळे खूप अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यामध्ये जवळ जवळ १६० विषय आणि १८ हजार नोंदी आहेत. ते एक प्रकारे मोठ्या प्रमाणावर ज्ञानाचे भांडार असून, ते आपल्या हातात आहे. हे सर्वांसाठी मोफत आहे. आजपर्यंत १० हजाराहून अधिक लोकांनी सदरहू ॲप डाऊनलोड केलेला आहे. हे ॲप माननीय श्री. मंदार जोगळेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्याला मोफत दिलेले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाला एक रुपयाचा देखील खर्च आलेला नाही.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातील ग्रंथालयात ५४ हजारांपेक्षा अधिक पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध आहेत. या सर्व पुस्तकांचे अद्ययावतीकरण करणे ही काळाची गरज आहे. सद्यःस्थितीत सर्व पुस्तकांचे अद्ययावतीकरण करणे हे आम्हाला शक्य नाही. या सर्व पुस्तकांचे अद्ययावतीकरण भविष्यात करून घेण्याचा आमचा मानस आहे. ग्रंथालयास अनेक पर्यटकांनी आतापर्यंत भेटी दिलेल्या आहेत.

त्यानंतर समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडे नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध आहे काय? याबाबत विचारणा केली असता, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडे नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध आहे. मुद्रणालयाची जी जागा आहे, ती महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची आहे. त्या ठिकाणी संयुक्तपणे इमारत बांधली जाणार आहे. अशी माहिती समितीला दिली.

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडे आवश्यक तो अधिकारी/ कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे काय? याबाबत विचारणा केली, त्यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामध्ये एकूण ३८ पदे मंजूर आहेत. मुंबई येथील कार्यालय आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळासाठी एकूण ५१ पदे मंजूर आहेत. यापैकी केवळ १० पदे मानधनावर कार्यरत आहेत. विभाग संपादकांना २१ हजार रुपये, सह संपादकांना १४ हजार रुपये आणि उर्वरित पदांसाठी १० ते ११ हजार रुपयांचे मानधन दिले जाते. सद्य:स्थितीत पद भरतीवर बंदी असल्यामुळे ही पदे भरलेली नाहीत. मानधन तत्वावरील पदे केवळ ११ महिन्यांसाठी तात्पुरत्या कालावधीकरिता भरण्यात येतात व त्याकरिता दरवर्षी तशा प्रकारची प्रक्रिया राबविण्यासाठी खूप वेळ जातो. मानधनावर सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी घेतले जातात. सद्य:स्थितीत मानधनावर काम करणा-या अधिकारी किंवा कर्मचा-यांचे वय हे जवळपास ७५ वर्षे पर्यंत आहे. त्याच्यानंतर आम्हाला दर्जेदार व्यक्ती मिळेल किंवा नाही अशी शंका आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा मंडळाला होत आहे. सद्य:स्थितीत अभ्यास संपादकांची सोय असून, ती १२ दिवसांसाठी असते. तसेच यामधील काही मान्यवर वयोवृद्ध झाल्यामुळे ते वारंवार आजारी असतात. असे सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी समितीस सांगितले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे काम अधिक गतीमान करण्यासाठी आपल्याला आणखी कशाची गरज पडणार आहे? याबाबत समितीने विचारणा केली असता, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी प्रतिपादन केले की, यासंदर्भातील प्रस्ताव मराठी भाषा विभागाकडे दिलेला आहे. मानधनावर विभाग संपादक, सह-संपादक कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळात अनेक जण विद्या व्यासंगी सहायक पदावर कार्यरत आहेत. ही पदे "ब" वर्गात येत नाही. कोणत्याही प्रकाशन संस्थेला उप संपादक, कार्यवाही संपादक, मुख्य संपादक ही पदे या ठिकाणी मिळत नाही. सदर पदे या ठिकाणी कार्यरत असणे खूप आवश्यक आहे. पूर्वी ही पदे कार्यरत होती. सन २००३ मध्ये आढावा घेतल्यानंतर ही पदे

मानधनावर घेण्यात आली आहेत. विज्ञान विषयासाठी विभाग संपादक होता. यामध्ये एकालाच सर्व कामे अंतिम करावी लागत होती. माननीय शाखेमध्ये देखील अशाच प्रकारे काम चालत होते. यासंदर्भात समितीला उदाहरण देताना सांगितले की, देशाचे माननीय माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांची नोंद माननीय विभागाने घेतली होती. माजी राष्ट्रपती डॉ. कलाम हे शास्त्रज्ञ होते. वास्तविक पहाता ती नोंद विज्ञान विभागाने घेणे अपेक्षित होते. परंतु, दोन्ही विभागात समन्वय नसल्यामुळे देशाचे माननीय माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांची नोंद माननीय विभागाने घेतली होती. असा प्रकार भविष्यात होऊ नये याकरिता एक मुख्य जबाबदार अधिकारी असणे आवश्यक आहे. तसेच दोन्ही विभागांमध्ये समन्वय असणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. मंडळामध्ये अध्यक्षांचे पद मानधनावर आहे. धोरणात्मक निर्णयामध्ये माननीय अध्यक्षांनी सहभाग घेणे असे त्यांचे काम आहे. त्यामुळे आस्थापनेवर अधिकारी असणे गरजेचे आहे. यासंदर्भात प्रस्ताव दिलेला आहे आणि त्यासाठी वारंवार विभाग संपादकांची मागणी केलेली आहे.

त्यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे काम कोणत्याही परिस्थितीत थांबविता कामा नये अशी समितीची प्रामाणिक भावना आहे. आपल्या अडचणी समिती सोडविणार असून महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाला समिती अधिक सहकार्य करेल असे समितीने आश्वासन दिले.

विश्वकोशामध्ये ज्या नोंदी घेतल्या जातात त्यासाठी काही नियमावली किंवा निकष आहेत काय, असा समितीने प्रश्न केल्यावर सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ यांनी समितीला विशद केले की, इन्सायक्लोपिडियाच्या धर्तीवर मराठीमध्ये विश्वकोश असावा अशी संकल्पना होती. मराठी संस्कृती, भारतीय संस्कृती आणि जागतिक संस्कृती अशा सर्वच विषयांमधील महत्वाचे विषय मग तंत्रज्ञान, विज्ञान, अर्थशास्त्र किंवा समाजशास्त्र असेल. सामान्य वाचकांना आवश्यकता वाटेल अशा विषयाची माहिती हा महत्त्वपूर्ण निकष लक्षात घेऊन १८ हजार नोंदीची यादी तयार करून हे काम केले जात आहे. मराठी विश्वकोशामध्ये १८ हजार नोंदी आहेत. जागतिक पातळीवर जेवढी महत्त्वाची शहरे आहेत त्या सर्व शहरांच्या भौगोलिक माहितीपासून इतर सर्व माहिती त्यामध्ये समाविष्ट आहे. जागतिक पातळीवर जेवढी राजकीय व्यक्तिमत्वे आहेत त्या सर्वांची माहिती त्यामध्ये देत आहोत. तसेच, संस्कृती, साहित्य किंवा जागतिक तापमान वाढ या संदर्भात ज्या लोकांना नोबेल पारितोषिक मिळतात त्यांची माहिती देखील आपण त्यामध्ये देत आहोत. मराठी भाषा आणि मराठी संस्कृती हा केंद्रबिंदू डोळ्यासमोर ठेवून हे सर्व खंड तयार केलेले आहेत. संस्कृतीचा विचार केला तर महाभारतातील जी महत्त्वाची पात्रे आहेत

त्यांच्या सुद्धा नोंदी त्यामध्ये घेतलेल्या आहेत. ज्या लोकांनी मराठी साहित्यामध्ये चांगले काम केलेले आहे त्यांच्या नोंदी त्यामध्ये घेण्यात आलेल्या आहेत. तसेच, विज्ञानामध्ये जे विषय नव्याने संशोधित केले जातात म्हणजे ग्राफाईट सारखा विषय आहे, हायड्रोजन वायू आहे किंवा मूलद्रव्य आहे यांच्या नोंदी सुद्धा आपण त्यामध्ये घेतलेल्या आहेत. आमच्याकडे अशा प्रकारे पहिल्या प्रकल्पात १८ हजार नोंदीचे काम पूर्ण झालेले आहे. पुढील प्रकल्प या दृष्टीने आहे की, आता हे काम बरेच जुने झालेले आहे. हे काम ४० ते ५० वर्षांपूर्वी सुरू झाले होते. आम्ही आता ते काम नव्याने विकेंद्रीकरण (डिसेंट्रलाईज) करून त्या त्या विद्यापीठातील तज्ज्ञ व्यक्तींकडे ते काम सोपवून ते करून घेत आहोत. आम्ही विद्यापीठातील तज्ज्ञांबरोबर सातत्याने बैठका घेतो त्या काळात १८ हजार नोंदीचे काम पूर्ण केलेले आहे. आपल्याला वेगवेगळ्या ६० विषयांची जवळपास ६० ज्ञानमंडळे तयार करावयाची आहेत. साधारणतः प्रत्येक ज्ञानमंडळात १ हजार नोंदी झाल्या पाहिजेत म्हणजे आपल्याकडे पुढील दोन-तीन वर्षांत ६० हजार नोंदी होऊ शकतील.

आता आम्ही सर्व काम ऑनलाईन पद्धतीने करीत आहोत. आमचे जे प्रकाशन आहे ते लोकांसाठी ऑनलाईन उपलब्ध असेल. म्हणून आता आपण हळूहळू मुद्रणालय यापासून सुद्धा बाहेर पडत आहोत. अनेक शाळांना किंवा वाचकांना ग्रंथ पाहिजे असतात, त्यांची तशी मागणी असल्यामुळे आम्ही मुद्रणालयाशी निगडित होतो. परंतु, आता आम्ही हळूहळू या सर्व बाबी संकेतस्थळावर आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. आम्ही तसे ॲप तयार केलेले आहे. आता पर्यंत ४७ ज्ञानमंडळे स्थापन झालेली आहेत. त्यापैकी अनेक ज्ञानमंडळांचे या विश्वकोशाच्या व्यतिरिक्त नव्या पद्धतीचे जे काम आहे ते साहित्यिकांना बघण्यासाठी उपलब्ध आहे. प्रत्येक विद्यापीठामध्ये एक ज्ञानमंडळ असावे, असे आपले धोरण आहे. त्याप्रमाणे कामाचे वाटप करण्यात आलेले आहे. त्या काळात सर्वात प्रथम मुंबई विद्यापीठाचे सहकार्य होते. त्यामुळे आपण मुंबई विद्यापीठाकडे १० विषय दिलेले आहेत. तसेच, औरंगाबाद विद्यापीठाकडे माध्यम आणि संगणक विज्ञान हे २ विषय दिलेले आहेत. डेक्कन कॉलेजमध्ये पुरातत्व विषय खूप चांगला आहे. आपण अशा प्रकारे विचार करून ते विषय त्या त्या विद्यापीठाकडे दिलेले आहेत. आता ४७ विषयांची ज्ञानमंडळे स्थापन झालेली आहेत. मानवी वैद्यक हा विषय राहिलेला आहे. डॉक्टरांना वेळ मिळत नसल्यामुळे असे विषय थोडे मागे राहिलेले आहेत. आम्ही त्यांच्याशी समन्वय (ॲप्रोच) केल्यानंतर ही ज्ञानमंडळे सुद्धा स्थापन होतील. भूगोल विषयाची ३ ज्ञानमंडळे स्थापन होतील. तसेच, मानवी वैद्यक या विषयाची ३-४ ज्ञानमंडळे स्थापन होतील. लोक साहित्य या विषयाचे ज्ञानमंडळ स्थापन झालेले आहे. मुंबई विद्यापीठातील ज्ञानमंडळामध्ये श्री.प्रकाश खांडगे यांच्या सारखी तज्ज्ञ मंडळी

आहेत. पुणे येथे श्री. संतोष दास्ताने हे अर्थशास्त्र विषय बघतात. श्री.बाळ फोंडके विज्ञान, तंज्ञत्रान विषय बघतात. श्रीमती अरुणा ढेरे मराठी साहित्य, लोक साहित्याचे काम बघतात. ही सर्व तज्ज्ञ मंडळी केवळ बैठकीला उपस्थित राहून धोरणात्मक निर्णय घेत नाहीत तर त्या त्या विषयाचे काम तपासून ते अंतिम करतात. श्री.बाळ फोंडके परदेशामध्ये गेले तरी ऑनलाईन काम असल्यामुळे ते तेथूनच ते काम तपासून पूर्ण करतात. काही सूचना करावयाची असेल तर ते तसा ई-मेलही करतात.

गुगल संकेतस्थळावरील नोंदी आणि आपल्या विश्वकोशातील नोंदीमध्ये काही फरक आहे काय? याबाबत समितीने विचारणा केली असता, आपल्याला जी माहिती प्राप्त होते त्यामध्ये अधिकृतपणा हा महत्वाचा भाग आहे. गुगल संकेतस्थळावरुन मिळालेल्या माहितीसाठी कोणते संदर्भ वापरण्यात आले, ती माहिती कोणत्या विद्वान व्यक्तीने लिहिली याबाबत संदिग्धता असते. परंतु, आपण जी माहिती लिहितो ते लोक त्या त्या विषयातील तज्ज्ञ आहेत. श्री.प्रकाश खांडगे, श्रीमती अरुणा ढेरे त्या विषयातील तज्ज्ञ आहेत. आपल्याकडे ७० हजार पुस्तकांचे ग्रंथालय आहे. आपण त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संपादन करतो. त्यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती तपासून ती प्रकाशित केली जाते. गुगल संकेतस्थळावरुन प्राप्त होणारी माहिती आणि आपल्या माहितीमध्ये हा एक फरक आहे. आमच्याकडे माहिती कमी असली तरी त्याला अधिग्राह्यता आहे. आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुले किंवा संशोधन करणारी मुले विश्वकोशामध्ये काय म्हटले आहे याचा संदर्भ देतात असे सहायक सचिव यांनी समितीला सांगितले.

यासंदर्भात आणखी माहिती देताना सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी समितीला सांगितले की, ब-याच वेळा न्यायालयामध्ये सुद्धा माहिती लागते. पूर्वी "तसूभर" असे म्हटले जायचे. "तसू" म्हणजे काय हे बघण्यासाठी ब-याच वेळा न्यायालयाला विश्वकोशाचा वापर करावा लागत होता. त्यावर सहायक सचिव यांनी सांगितले की, आपण मराठी विश्वकोशाची जागा/स्थळ मुंबई उच्च न्यायालयाला देवाणघेवाण (लिंकअप) करून दिलेली आहे. त्यांना एखाद्या शब्दाचा अर्थ बघावयाचा असेल तर ते शब्दकोशाचा वापर करतात. परंतु, त्यांना एखादी संकल्पना माहिती करून घ्यावयाची असेल तर ते विश्वकोशाचा वापर करतात. संकल्पनामध्ये सुद्धा शब्दांचे अनेक अर्थ लागू शकतील. परंतु, त्यांना ती माहिती त्यातून मिळू शकेल. आपल्याकडे न्यायालयाने एका वर्षात ४ प्रकरणांमध्ये माहिती विचारलेली आहे. ग्रामीण भागातील लोक न्यायालयात आपले म्हणणे मांडतात. न्यायालयाला त्यातील काही शब्दांचा अर्थ समजून घ्यावा लागतो.

तसेच, ब-याच वेळा फौजदार देखील काही शब्दांचा अर्थ विचारतात. अमूक शब्दाचा अर्थ नमूद करून आम्हाला त्यावर स्वाक्षरी द्यावी, असे ते आपल्याला सांगतात. आमच्याकडे बरेच शब्दकोश आहेत. आपण त्यांना संदर्भाशी संबंधित शब्दकोश देखील देतो. या संदर्भात आणखी माहिती दिली की,विज्ञानामध्ये संकल्पना लिहिण्यासाठी अडचणी येतात. म्हणून तर्कतीर्थ यांनी विश्वकोश तयार करण्यापूर्वी परिभाषाकोश तयार केलेला आहे. विज्ञानामध्ये अशा अनेक संकल्पना आहेत की त्या मराठी भाषेतून लिहिता येत नाहीत. परंतु, त्या काळात तशा परिभाषा सुद्धा तयार करण्यात आलेल्या आहेत. आपण त्या परिभाषेनुसार लिखाण करतो. आपण मानवी वैद्यकाच्या नोंदी बघितल्या तर आपल्याला शरीराची संपूर्ण माहिती मराठी भाषेतून मिळते. आपण भाषेच्या दृष्टीने खूप पुढे आहोत. कारण, २२ भाषांमध्ये अशा प्रकारे १८ हजार नोंदी असलेला एकही ॲप नाही. आपण ज्या नोंदी घेतलेल्या आहेत त्यामध्ये काही नोंदी २०० पानांच्या सुद्धा आहेत. उदा. बांधकाम तंत्रज्ञान ही खूप मोठी नोंद आहे. आपण अभियांत्रिकी/इंजिनिअरिंग बद्दलची माहिती मराठी भाषेतून लिहिलेली आहे.

विद्याव्यासंगी सहायक यांनी समितीला सांगितले की, आपण संस्कृत शब्दकोशाचा वापर करून बरेच मराठी शब्द तयार केलेले आहेत. आता "नॅनो टेक्नॉलॉजी" सारखे विषय आहेत. त्याला मराठीमध्ये मूळ शब्दच उपलब्ध नाही. आपण त्याला "सुक्ष्मतीत तंत्रविज्ञान" असे नाव देऊन ती नोंद "स" च्या खंडामध्ये समाविष्ट केलेली आहे. आपण परिभाषाकोशामध्ये इंग्रजी व मराठी असे दोन्ही पर्याय दिलेले आहेत. त्यामुळे आपल्याला परिभाषाकोशामध्ये इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेत शोध घेता येईल "अपोहन" शब्द आहे. हा शब्द डायलेसीससाठी वापरला जातो. परंतु, ब-याच लोकांना हा शब्द माहिती नाही. हा शब्द केवळ विश्वकोशातील लोकांना माहिती आहे. परिभाषाकोशात डायलेसीस शब्द टाईप केल्यानंतर ती नोंद उघडली गेली पाहिजे, अशी आमची अपेक्षा आहे. म्हणून आम्हाला परिभाषाकोशामध्ये इंग्रजी शब्द टाकल्याशिवाय पर्याय नाही. जेणेकरून ते शब्द टाईप केल्यानंतर लोकांना त्याचा अर्थ शोधता येईल. "अभियंता" हा शब्द विश्वकोशानेच तयार केलेला आहे. आज हा शब्द प्रचलीत आहे.

त्यावर लोकांना शासकीय कार्यालयामध्ये पत्रव्यवहार करावयाचा असेल तर ते लोक मराठी भाषेतून पत्रव्यवहार करतात. परंतु, काही अधिकारी संबंधित व्यक्तीला इंग्रजी भाषेतून पत्र पाठवितात. म्हणून अशा प्रकारे इंग्रजी भाषेतून पत्रव्यवहार करणा-या अधिका-यांवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे अशी समितीने सूचना केली.

कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर बंधनकारक करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे? याबाबत समितीने प्रश्न केला असता त्यावर सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी, सदर विषय भाषा संचालनालयाच्या अखत्यारीत आहे. न्यायालयात मराठी भाषेतून निकाल दिले जावेत, मराठी भाषेतील पुरावे स्वीकारले जावेत या संदर्भातील प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात आलेला आहे असे सांगितले.

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्राज्ञपाठ शाळा, मुद्रणालय यांना त्यांच्या अडचणींच्या संदर्भातील निवेदन देण्याबाबत सूचना केली.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे काम खूप चांगल्या प्रकारे सुरू असल्याचे समितीने मत व्यक्त केले. तसेच त्यांना खूप अडचणी देखील आहेत असे समितीच्या निदर्शनास आले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या ग्रंथालयाची पाहणी

समितीने विश्वकोश निर्मिती मंडळाच्या ग्रंथालयाची पाहणी केली असता, समितीला ग्रंथालयात अर्थशास्त्र, चरित्रे, भाषाशास्त्र, अभियांत्रिकी, रसायनशास्त्र, राज्यशास्त्र, गूढविद्या, कायदा, इतिहास, जीवशास्त्र इत्यादी विषयांची विविध पुस्तके असल्याचे आढळून आले.

यानंतर सहायक सचिव यांनी समितीला अशी माहिती दिली की, ग्रंथालयात अनेक दुर्मिळ ग्रंथ असून प्रत्येक देशातील इतिहास, भूगोल इत्यादींचे संदर्भ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. ग्रंथालयातील जवळपास ९७ टक्के पुस्तके इंग्रजी भाषेतील आहेत. विश्वकोशाच्या संपादकीय कामासाठी सदर पुस्तकांचा उपयोग केला जातो. आम्ही ग्रंथालयातील सर्व पुस्तके वृत्त दृष्टया प्रतिमांकन करून ती वाचकांसाठी ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहोत.

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, ता. वाई येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने शासकीय मुद्रणालय, वाई येथे मंजूर पदे ७० असून सध्या ४० कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत व ही पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे? याबाबत विचारणा केली असता, संचालक, शासकीय मुद्रणालय, वाई यांनी सांगितले की, शासकीय मुद्रणालय, वाई येथे ७१ पदे मंजूर असून २५ पदे रिक्त आहेत व ४६ पदे

कार्यरत आहेत. शासनाच्या धोरणानुसार सध्या नियुक्ती बंद आहे. मात्र काही तांत्रिक पदे अत्यंत आवश्यक असून त्यांची आम्ही मागणी केलेली आहे. ८ मंडळांमध्ये २६८ तांत्रिक पदांची मागणी केलेली आहे.

तसेच त्यांनी समितीला विदित केले की, विश्वकोशाचे २२ खंड पूर्ण केलेले आहेत. येथील मुद्रणालयाची निर्मिती विश्वकोशाकरिता झालेली आहे. कालांतराने ही प्रक्रिया बंद पडली. आमच्याकडे सध्या दोन मशीन्स आहेत. विश्वकोशाचे बरेच काम झालेले आहे व इतर कामे सुरू आहेत. येथे कर्मचा-यांची संख्या वाढवून शक्ती वाया घालवू नये, असा उद्देश आहे. दिनांक १० जुलै, १९९७ रोजी विश्वकोश मंडळाची बैठक झाली होती. आम्हाला लागणारी जागा व विश्वकोशाकरिता लागणारी जागा याकरिता तळ मजला व पहिला मजला यांची मांडणी तयार केली होती. अधीक्षक अभियंता, सा.बां. विभाग यांनी २ कोटी १४ लाख ८९ हजार रुपयांचे अंदाजपत्रक दिले होते. सन २००९ पासून तरतूद होऊ लागली. सन २००९-१० मध्ये ५० लाख रुपयांची तरतूद झाली होती. सन २०१०-११ मध्ये १ कोटी ३१ लाख १८ हजार रुपयांची तरतूद झाली. यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली. दरम्यानच्या काळात सन २०१३ पर्यंत विश्वकोश मंडळात अनेक बदल झाले. त्यामुळे आम्ही पुन्हा वास्तुशास्त्रकार यांच्याकडे गेलो. या करिता दोन्ही विभागांची परवानगी आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. या जागेची मालकी मराठी भाषा विभागाकडे आहे. म्हणून सन २०१३ मध्ये मराठी भाषा विभाग व उद्योग ऊर्जा, कामगार (उद्योग) विभागाच्या उप सचिवांना कळविले. या संबंधी तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे,२०१३ रोजी बैठक घेतली होती. सन २०१३ नंतर ग्रंथागाराकरिता ३ हजार चौ.फू. जागेची मागणी विश्वकोश मंडळाकडून करण्यात आली. ही बाब दिनांक २७ जून, २०१३ रोजी शासनाच्या निदर्शनास आणली. आम्हाला केवळ ७०० चौ.फू. जागा मिळावी, अशी आमची मागणी आहे. आमच्या विभागाकडून सन २०१६ मध्ये एक बैठक झाली होती. रास्तेवाडा पुरातन वास्तु (हेरीटेज) जाहीर झालेला आहे. त्याचा चौथरा देखील पुरातन वास्तु (हेरिटेज) मध्ये समाविष्ट आहे. प्रस्तावित इमारत वाड्याच्या प्रांगणात आहे. नगरपालिकेने मान्यता दिल्याशिवाय तेथे कोणतेही काम करता येणे शक्य नाही.

त्यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, "तेथील काही वास्तु चुकीने पुरातन वास्तुमध्ये (हेरीटेजमध्ये) समाविष्ट झालेल्या आहेत." रास्ते वाडा ही वास्तु पुरातन वास्तु (हेरीटेज) असू शकते हे मान्य आहे, परंतु बाजूला धर्मग्रंथ ठेवण्यात आलेली प्राज्ञपाठ शाळा व पुढील चौथरा चुकीने पुरातन वास्तुमध्ये (हेरीटेजमध्ये) समाविष्ट झाल्याचे तेथील लोकांचे म्हणणे आहे. याबाबत आढावा घेण्यात येऊन पुरातन वास्तुमध्ये नेमके काय असले पाहिजे व काय नसावे याचा पाठपुरावा करण्यात यावा.

प्रज्ञापाठ शाळा मंडळाने धर्मकोशाचे २५ खंड तयार केलेले आहेत. आणखी २५ खंड तयार करावयाचे आहेत त्याकरिता शासनाने पुरेसे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून दिला आहे काय तसेच त्यासाठी आणखी निधी लागणार आहे काय, आणखी निधी लागत असेल तर त्याचे प्रयोजन काय आहे? याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येणार आहे? याबाबत समितीने विचारणा केली,त्यावर विभागीय प्रतिनिधींनी हे काम संस्कृत भाषेतील आहे व त्यामुळे याचा मराठी भाषा विभागाशी संबंध नाही. संस्कृत विद्यापीठ किंवा इतर तत्सम विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे याबाबत आम्ही सदर विभागाला कळविले आहे.

यामध्ये काही दुर्मिळ संदर्भ असून त्याचा केवळ मराठी अनुवादाचा विषय आहे. याबाबत राज्य मराठी विभागाची "साहित्य व संशोधन संस्थांना अनुदान" ही योजना आहे. याअंतर्गत प्राज्ञपाठ शाळेचा अर्ज आला आहे. या योजनेच्या माध्यमातून मराठी अनुवादासाठी आपण प्रत्येक वर्षी त्यांना ५ लाख रुपयांची मदत करु शकतो असे सांगितले त्यावर समितीने असा प्रश्न केला की, एका ग्रंथाचा अनुवाद करण्यासाठी सुमारे २५ लाख रुपयांचा खर्च येतो. त्यामुळे या ५ लाख रुपयांच्या निधीमधून कशी कार्यवाही होणार? त्यावर संचालक, राज्य मराठी विकास संस्था यांनी सध्या तरी जास्तीत जास्त ५ लाख रुपयांचीच मर्यादा आहे. त्यामुळे आपण दिलेल्या या निधीमध्ये त्यांचे किमान काम तरी होऊ शकते, असे आम्ही त्यांना कळविले आहे असे समितीला उत्तर दिले.

त्यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, या ग्रंथांची कोणी ना कोणी दखल घेतलीच पाहिजे. मराठी भाषा जर आपली आई असेल तर संस्कृत भाषा आपली आजी आहे. अनेक मराठी शब्द आपल्याला कळत नाहीत कारण त्याचे संस्कृत शब्दच आपल्याला माहित नसतात. संस्कृतमधून मराठी निर्माण झाली. इतर राज्यांमध्ये आपण पाहिले तर त्यांनी त्यांच्या स्तरावर संस्कृत भाषेला न्याय दिलेला आहे. आपण देखील संस्कृत भाषेला एवढे उपेक्षित न ठेवता मागणी करावी. राज्याच्या अर्थसंकल्पाचा विचार करता हा निधी अत्यंत कमी आहे.

त्यावर प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग यांनी सदर विषय संस्कृत भाषेशी संबंधित असल्यामुळे मराठी भाषा विभाग याबाबत कार्यवाही करेल की अन्य कोणता विभाग करेल हे सांगता येणार नाही. आम्ही सध्या हे प्रकरण उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे पाठविले आहे. कारण अशा स्वरुपाची सर्व कामे त्या विभागाची असतात. सुदैवाने दोन्ही विभागांचे मंत्री महोदय एकच आहेत. त्यामुळे मराठी भाषा विभाग या दोन्ही विभागांशी समन्वय साधून याबाबत मार्गदर्शन घेईल असे आश्वासन दिले.

समितीने इतर ज्ञानमंडळांप्रमाणे संस्कृत या विषयाचा देखील समावेश करावा. आपण वेगवेगळ्या स्वरुपातील ज्ञान मराठी भाषेत अंतर्भूत करून त्याचा समावेश इतर ठिकाणीही करीत आहोत. त्याप्रमाणेच संस्कृत भाषेतील ज्ञान समाविष्ट करण्यात यावे अशी सूचना केली, त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सदर विषय भाषांतराचा नाही. यामध्ये दोन विषय आहेत. जुने हस्तलिखित व इतर साहित्य मूळ संस्कृत भाषेमधील आहेत. ते मराठी भाषेमध्ये देखील यावे, असाही मुद्दा आहे. कोष किंवा धर्मग्रंथ संस्कृतमध्येच करायचे आहेत. ज्यावेळी त्याचे भाषांतर मराठीमध्ये करायचे असेल त्यावेळी आमच्या विभागामार्फत अनुदान देऊ शकतो. याबाबतचा प्रस्ताव मराठी भाषांतराचा असेल तर त्याबाबत आम्ही विचार करु शकतो असे समितीला सांगितले.

त्यावर या धर्मग्रंथांचे भाषांतर मराठी भाषेमध्येच करायचे आहे. काही ग्रंथांची लिपी देवनागरी नाही. काही देवनागरी तर काही मोडी लिपीमध्ये आहेत. माननीय मुख्यमंत्री व माननीय मंत्री यांना दिलेल्या निवेदनामध्ये मराठीकरण करायचे असल्याबाबत नमूद केलेले आहे. त्यामुळे आपण याबाबत विचार करावा, अशी समितीने सूचना केली.

समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या ग्रंथालयातील ५४ हजारांपेक्षा अधिक पुस्तकांच्या अद्ययावतीकरणासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे? याबाबत प्रश्न केला त्यावर सर्व ग्रंथ हे दुर्मिळ आहेत. यामधील काही ग्रंथांचे प्रतिमांकन करावे, असा अहवाल आम्ही तयार केलेला आहे. सदर ग्रंथांचा वापर संपादक करीत असल्यामुळे ते व्यवस्थित आहेत. इतर लोकांना हे ग्रंथ उपलब्ध व्हावेत यासाठी त्यांचे संगणकीकरण करण्याचा प्रकल्प प्रस्तावित आहे असे सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी सांगितले.

त्यावर समितीने सूचना केली की, हे दुर्मिळ ग्रंथ दुस-यांना उपयोगी पडले पाहिजेत तसेच आपल्याला देखील त्यांचे जतन करावे लागेल. केवळ एकच प्रत चांगली असून उपयोग नाही तर पर्यायी व्यवस्था देखील असली पाहिजे. कोणी अभ्यासक येवो अगर न येवो परंतु या ग्रंथांचे प्रतिमांकन करून त्यामधील ज्ञानाचे आपल्याला जतन करावेच लागेल व त्या अनुषंगाने आपल्याकडे किती निधी आहे व जर हा निधी कमी असेल तर आणखी निधीची आपण मागणी केली आहे काय? असा प्रश्न केला त्यावर आपल्याकडे असलेली पुस्तके, त्यामधील दुर्मिळ पुस्तके, त्यापैकी कोणत्या पुस्तकांचे प्रतिमांकन करायचे आहे यासाठी तेथील ग्रंथालयीन सहायक स्वत: प्रत्येक पुस्तक पाहून संगणकावर त्याच्या नोंदी करीत आहेत. हे काम पूर्ण झाल्यानंतर प्रतिमांकनाचे काम आम्ही बाहय संस्थेमार्फत करून घेऊ. यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत किंवा इतर

संस्थांची मदत घेण्यात येईल असे उत्तर समितीला दिले त्यावर ५४ हजार पुस्तकांपैकी किती ग्रंथांचे जतन करून झाले आहे, या सर्व कामाचे अंदाजपत्रक किती आहे व कामाला केव्हापासून सुरुवात होणार आहे? याबाबत स्पष्टीकरण देण्याबाबत समितीने सांगितले त्यावर अद्याप प्रतिमांकनाला सुरुवात केलेली नाही. सध्या आम्ही केवळ किती दुर्मिळ पुस्तके आहेत याचा शोध घेत आहोत. गत एक वर्षापासून हे काम सुरू आहे. ग्रंथालय सहायक स्वतः ही पुस्तके वाचून पाहत आहेत, तालगीकरण करीत आहेत. ६० ज्ञानमंडळांच्या वेगवेगळ्या योजनांसाठी विश्वकोश मंडळाला १ कोटी ५० लाख रुपये देण्यात येतात. हा निधी ६० ज्ञानमंडळे गृहित धरुन देण्यात येतो. परंतु आता ६० पैकी केवळ ४४ ज्ञानमंडळे कार्यरत आहेत. त्यामुळे उर्वरित मंडळांच्या शिल्लक असलेल्या निधीमधून ही कामे घेता येतील असे समितीला सांगितले.

त्यावर समितीने जसजसे आपल्याला दुर्मिळ व जतन करण्याजोगी पुस्तके आढळून येतील त्याप्रमाणे त्यांची कार्यवाही सुरू केली पाहिजे. कारण एकाच वेळी ५४ हजार पुस्तकांचे प्रतिमांकन (स्कॅनिंग) करणे शक्य नाही. त्यामुळे याबाबत कार्यवाही करावी व पुढील वेळी यासाठी निधीची मागणी करावी अशी सूचना केली.

समितीने कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठी भाषेतून निकाल देण्याबाबत व मराठी भाषेतील पुरावे स्विकारण्याबाबत उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे? याबाबत विचारणा केली असता, कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबत अगोदरपासूनच सूचना आहेत व त्याप्रमाणे ब-याच कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर केला जातो. उच्च न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबत उच्च न्यायालयाच्या तत्कालीन मुख्य न्यायमूर्तींनी तीन न्यायाधिशांची समिती स्थापन केलेली आहे. सदर समितीच्या बैठकींबाबतचा कुठलाही अंतिम अहवाल समितीने उच्च न्यायालयास व उच्च न्यायालयामार्फत शासनास दिलेला नाही. याबाबत विभागाचा पाठपुरावा सुरू आहे, परंतु उच्च न्यायालय असल्यामुळे विभाग एका मर्यादेच्या पुढे जाऊन पाठपुरावा करु शकत नाहीत. न्यायमुर्ती श्री. चव्हाण, न्यायमुर्ती श्री. ओक व आणखी एका न्यायमूर्तींचा या समितीमध्ये समावेश आहे असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

विश्वकोश निर्मितीच्या छपाईसाठी वाई येथील रास्ते यांच्या वाडयामध्ये सन १९७२ मध्ये शासकीय मुद्रणालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर वाडयातील मोकळ्या जागेत नवीन इमारत बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे व त्यासाठी सन २०१० मध्ये इमारतीचे मानचित्र

मंजूर करण्यात आले असून रेखाचित्र तयार करण्यात आले आहे. सदर योजनेसाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी २ कोटी १४ लाख ८९ हजार रुपयांचे अंदाजपत्रक दिले होते. सन २००९-२०१० मध्ये ५० लाख तसेच सन २०१०-२०११ मध्ये १ कोटी ३१ लाख १८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती व यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली. सन २०१३ नंतर ग्रंथागाराकरिता ३ हजार चौरस फूट जागेची मागणी मंडळाकडून करण्यात आली व ही बाब दिनांक २७ जून,२०१३ रोजी शासनाच्या निदर्शनास आणली. आता शासकीय मुद्रणालयासाठी केवळ ७०० चौरस फूट जागा मिळण्याबाबत त्यांची मागणी आहे. दरम्यानच्या काळात रास्ते वाडयाची इमारत वारसा जपणूक यादीतील "अ" प्रवर्गातील इमारत असल्यामुळे या प्रस्तावाला वास्तु जपणूक समिती, पुणे यांची मान्यता घेणे आवश्यक असल्यामुळे त्यासंबंधातील प्रस्ताव वास्तु जपणूक समितीकडे तात्काळ सादर करणे आवश्यक असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

वाई येथे सध्या अस्तित्वात असलेल्या शासकीय मुद्रणालयाच्या जागेसंदर्भातील पुरातन वास्तु (हेरिटेज) संबंधातील वाद सोडविण्यासाठी मराठी भाषा विभाग व उद्योग विभाग यांनी संयुक्तरित्या पुणे येथे वास्तु जपणूक समितीकडे चर्चा करून वाद मिटविण्याच्या दृष्टीकोनातून उचित कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

- राज्यातील दिवाणी न्यायालयांच्या दाव्यांचे निकाल मराठीतून देण्यात येतात. माननीय उच्च न्यायालयामध्ये साक्षीच्या कामकाजाकरिता मराठीचा वापर करण्यात यावा अशी शासनाची मागणी आहे. याप्रकरणी माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, श्री. ओक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. परंतु न्यायालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबत फारशी प्रगती झालेली नाही. याप्रकरणी राज्य सरकार आग्रही आहे. देशाच्या राज्यघटनेमध्ये अशी तरतूद आहे की, संबंधित राज्य शासनाने मागणी केल्यास त्या राज्य शासनाचे कामकाज स्थानिक भाषेत करता येईल. माननीय उच्च न्यायालयाच्या संमतीनेच हे कामकाज करता येणार आहे. पक्षकारांची बाजू मांडणे किंवा उलट तपासणी घेणे, मराठीतून कागदपत्रे सादर करणे यास माननीय उच्च न्यायालयाने संमती दिली तर त्याचा फायदा पक्षकारांना होऊ शकेल असे समितीच्या निदर्शनास आले.

  सदर प्रकरणी मराठी भाषा विभागाने माननीय उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या समितीसमवेत तात्काळ बैठक आयोजित करून कनिष्ठ न्यायालयांच्या कामकाजामध्ये मराठीचा वापर करण्याबाबत चर्चा करावी व त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार शासनव्यवहारात मराठी भाषेचा वापर बंधनकारक असतानाही राज्यातील सर्व महानगरपालिका व विशेषतः मुंबई महानगरपालिकेतील कामकाज मराठी भाषेतून होणे तसेच सर्वसामान्य नागरिकांना या महानगरपालिकांद्वारे करण्यात येणारा पत्रव्यवहार व त्यानुषंगाने त्यांना देण्यात येणारी माहिती (जसे पत्रांची उत्तरे, विविध प्रपत्रांचे नमुने इ.) मराठी भाषेतून दिली जात नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

  राज्यातील सर्व महानगरपालिकांमधील कामकाज व पत्रव्यवहार मराठी भाषेतूनच होणे अपेक्षित व बंधनकारक आहे. त्यासाठी नगरविकास विभागाने प्रथमतः मुंबई महानगरपालिकेतील व तद्नंतर टप्प्याटप्प्याने राज्यातील इतर महानगरपालिकांशी संपर्क साधून किंवा त्यांचेसमवेत बैठकी आयोजित करुन त्यांच्याद्वारे मराठी भाषेच्या वापराबाबतची व पत्रव्यवहाराबाबतची माहिती घेऊन त्यासंबंधातील अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.

- राज्यातील काही शाळा संपूर्णपणे इंग्रजी माध्यमांच्या आहेत. त्यामध्ये आयसीएसई, सीबीएसई व आयबी या शाळांचा समावेश असून त्यांचा कारभार केंद्रीय मंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत चालतो. तथापि, आयसीएसई, सीबीएसई व आयबी शाळांमध्ये त्रिभाषा सुत्रानुसार मराठी भाषा द्वितीय किंवा तृतीय स्तरावर असणे आवश्यक असतानाही मराठी भाषेऐवजी जर्मन, फ्रेंच व तत्सम भाषा विद्यार्थ्यांचा गुणांक (स्कोअर) वाढविण्यासाठी पर्याय म्हणून निवडल्या जातात, असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

  राज्यातील आयसीएसई, सीबीएसई व आयबी शाळांच्या अभ्यासक्रमामध्ये प्राथमिक स्तरापासून मराठी भाषा अनिवार्य करणे आवश्यक आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ यासारख्या संस्थांनी देखील याबाबतचा आग्रह धरलेला आहे. या शाळांमध्ये दुसरी भाषा ही मराठीच असली पाहिजे असा आग्रह या शाळांना मान्यता देताना व तद्नंतरच्या काळामध्येही धरणे आवश्यक आहे ही बाब विचारात घेता शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन यासंदर्भात वैधानिक (अधिनियम) तरतूद करावी अशी समितीची शिफारस आहे.

- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचा प्रस्ताव मराठी भाषा विभागाद्वारे केंद्र शासनाकडे सन २०१३ मध्ये पाठविण्यात आला होता. अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाला हरकत घेणारी एक याचिका मद्रास उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेचा निकाल माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये लागलेला असून, सदर प्रकरण खारीज झाल्यामुळे अभिजात भाषेच्या दर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या न्यायालयीन प्रक्रियेची आवश्यकता नसल्याबाबतची बाब केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाद्वारे मराठी भाषा विभागास कळविण्यात आली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री व मा.मराठी भाषा मंत्री यांनी केंद्र शासनाच्या संबंधित विभागास आणि माननीय पंतप्रधान महोदयांना देखील पत्रे पाठविलेली आहेत.

केंद्र शासनाकडून देशातील ज्या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे त्याच धर्तीवर मराठी भाषेला देखील अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मराठी भाषा विभागाने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे तात्काळ पाठपुरावा करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट "एक"

मराठी भाषा विभागाकडून प्राप्त झालेली माहिती

महाराष्ट्र विधानमंडळाच्या

मराठी भाषा समितीने

मराठी भाषा विभागाच्या

सचिवांची आयोजित केलेली

साक्ष दि. ०९/०५/२०१८ (टिप्पणी)

परिशिष्ट–एक (अ)

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना १९ नोव्हेंबर, १९६० साली मराठी भाषा व साहित्य यांच्या विकासासाठी करण्यात आली. या मंडळाच्या वतीने अनेकविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. त्यांपैकी एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठी विश्वकोशासारखा सर्वविषयसंग्राहक असा संदर्भग्रंथ तयार करणे. या कामाचे महत्व विचारात घेऊन त्याकडे विशेष लक्ष देण्याच्या दृष्टीने विश्वकोशाच्या संपादन आणि प्रकाशन कार्यार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे विभाजन करून दि.१ डिसेंबर, १९८० रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली. मराठी विश्वकोशात ज्ञानविज्ञानाच्या विविध शाखा, तसेच विचारप्रवाहांना मराठीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून मराठीचा प्रचार व प्रसार करतां जिज्ञासू वाचकांना मराठीत विचार करण्यास, लेखनास प्रवृत्त करणे, हा त्याच्या निर्मितीमागील प्रमुख हेतू होता.

मूळ आराखड्यानुसार मराठी विश्वकोशाचे १७ संहिता खंड प्रकाशित करण्याचे नियोजन होते. तथापि, व्याप्तीमुळे नंतर ते २० खंडात प्रकाशित करण्यात आले आहेत. हे २० संहिता खंड (अंक ते ज्ञेयवाद) मुद्रित स्वरूपात प्रकाशित करण्यात आले असून हे सर्व खंड मराठी विश्वकोशाच्या www.marathivishwakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विश्वकोशाच्या २० खंडात मानव्य, कला, विज्ञान व तंत्रज्ञान या प्रमुख ज्ञानशाखेतील १५१ विषय, ३१२ सूची, १८ हजार १६३ नोंदींचा समावेश आहे. संकेतस्थळावर वाचकांच्या सोयीकरिता खंडनिहाय, शब्दनिहाय व विषयनिहाय शोध देण्यात आलेला आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी विश्वकोशाच्या वीस खंडातील माहिती कार्ड पेनड्राईवमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. कार्ड पेनड्राईव्ह वाचकांसाठी www.bookganga.com या संकेतस्थळावर तसेच ग्रंथाली या संस्थेच्या कार्यालयात विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी विश्वकोशाच्या वीस खंडांतील माहिती मोबाईल ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या मोबाईल ॲपचे लोकार्पण बाई येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या कालावधीत दि. १२ जानेवारी २०१८ रोजी करण्यात आले. आजपावेतो अठरा हजारांहून अधिक लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले असून ४५८ लोकांनी त्यावर आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. या ॲपचे ४.७ इतके मानांकन वाचकांच्यावे नोंदविण्यात आलेले आहे.

मंडळाने विश्वकोशाच्या संहिता खंडानंतर सूचीखंड, परिभाषा खंड आणि नकाशा खंड अशा तीन खंड निर्मितीचा आराखडा केला होता. हे तीन खंड आता २१, २२, व २३ या खंडाच्या स्वरूपात प्रकाशित करण्यात येत आहेत. या पैकी सध्या एकविसावा खंड म्हणून सूचीखंडाचे संपादन कार्यही मंडळाने पूर्ण केले आहे. ते २०१८ अखेर

सूचीखंडाचे प्रकाशन करण्याचे नियोजित आहे. सन १९७६ मध्ये मराठी विश्वकोशाच्या १८ व्या खंडाच्या प्रयोजनार्थ तयार करण्यात आलेला परिभाषा कोश ज्ञानमंडळाच्या मदतीने अद्ययावत करून विद्यमान खंड २२ म्हणून परिभाषा कोश प्रकाशित करण्यात येत आहे. २३ वा खंड म्हणून नकाशा खंड प्रकाशित करण्याचे नियोजन आहे.

मराठी कुमार विश्वकोश:-

मराठी कुमार विश्वकोशाचा परिचय ग्रंथ प्रकाशित करण्यात आला असून त्याअंतर्गत , एकूण १२ खंड प्रकाशित करण्याचे नियोजन असून त्यांची यादी सोबत जोडली आहे. यापैकी खंड १ व खंड २ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. खंड ३ चे संपादन कार्य पूर्ण झाले असून तो संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडे संपर्क करण्यात येत आहे.

मराठी विश्वकोश ज्ञानमंडळ :-

मराठी विश्वकोशाच्या दुसऱ्या टप्प्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन विश्वकोशाच्या कामाचे विकेंद्रीकरण करून महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ, संशोधन व शैक्षणिक संस्था आणि विविध विषयांत कार्यरत असलेल्या संस्था यांच्या संयोगाने ज्ञानमंडळे स्थापन करण्याचा निर्णय मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. विकोश-२०१५/प्र.क्र.५३१/भाषा-२, दि. २३ फेब्रुवारी २०१५ रोजी घेण्यात आला. विज्ञान व तंत्रज्ञान आणि मानव्य शाखा यांचे मिळून ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याची योजना आहे. पैकी ४४ ज्ञानमंडळे विविध विद्यापीठात, शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमध्ये कार्यरत आहेत. प्रत्येक ज्ञानमंडळासाठी समन्वयकांची नियुक्ती केली असून समन्वयक हा प्रमुख कार्यकारी घटक आहे. समन्वयकाने ५ ते ७ तज्ज्ञ सल्लागार मंडळाच्या साहाय्याने आपल्या ज्ञानमंडळाची व्याप्ती निश्चित करावी, ज्ञानमंडळांतर्गत असलेल्या विषयाचे वर्गीकरण करावे, त्याअंतर्गत नोंद-यादी तयार करावी, प्रत्येक नोंदीची शब्दसंख्या निश्चित करावी, नोंदीसाठी लेखक शोधावे आणि त्या नोंदीचे समीक्षण-संपादन करून घ्यावे, असे अपेक्षित आहे. विश्वकोशाच्या दुसऱ्या टप्प्यातील काम हे संकेतस्थळाद्वारे चालणार असून प्रत्येक नोंदीत आवश्यक चित्रे, आकृत्या, दृक-श्राव्य माध्यमांचा उपयोग केला जाऊ शकतो. मराठी विश्वकोशाच्या नवीन कार्यपद्धतीनुसार मराठी विश्वकोशाच्या ज्ञानमंडळाच्या अद्ययावत माहितीचे नवीन संकेतस्थळ असणार आहे.

मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्रज्ञान अशा एकूण ४४ ज्ञानमंडळांच्या माध्यमातून आतापर्यंत १४०९ नोंदीचे काम पूर्ण झाले आहे.

मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी विविध विषयांची ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. यांची यादी सोबत जोडली आहे. परंतु त्यापैकी काही ज्ञानमंडळे स्थापन होऊ शकली नाहीत, त्याची कारणे खालीलप्रमाणे.

१) काही संकल्पित ज्ञानमंडळांचे काम अन्य ज्ञानमंडळांमध्ये समायोजित करण्यात आले आहे.

उदा. जैवविविधता या विषयाचे ज्ञानमंडळ वनस्पतिशास्त्र/प्राणिशास्त्र या दोन विषयांमध्ये समायोजित केले आहे.

२) विविध कारणांमुळे संकल्पित ज्ञानमंडळाला योग्य ते समन्वयक मिळू शकलेले नाहीत.

आयुर्वेद सोडून अन्य वैद्यकशास्त्रातील ज्ञानशाखांना समन्वयक मिळू शकले नाहीत. यासंदर्भात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संपर्क साधला आहे. विमान अभियांत्रिकी, अंतरिक्ष विज्ञान-तंत्रज्ञान, नाविक- अभियांत्रिकी, जलविज्ञान या विषयांसाठी समन्वयक तसेच पालक संस्था उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. राष्ट्रीय पर्यावरण इंजीनियरींग शोध संस्थान (NEERI) नागपूर यांच्याशी पर्यावरण तसेच राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याशी समाजशास्त्र, लोकप्रशासन, सामाजिक चालीरीती आणि मानवशास्त्र या विषयांची ज्ञानमंडळे स्थापन करण्याबाबत संपर्क साधला होता परंतु त्यास प्रतिसाद मिळू शकला नाही.

३) समन्वयकांनी काम न केल्यामुळे काही ज्ञानमंडळे रद्द करण्यात आली.

जैवविविधता, जीवशास्त्र-प्राणिशास्त्र, प्रसारमाध्यमे, क्रीडा या विषयांच्या समन्वयकांनी अपेक्षित काम न केल्यामुळे ती रद्द करण्यात आली आहेत.

जीवशास्त्र-प्राणिशास्त्र, मानवशास्त्र, भूगोल या ३ विषयांची ज्ञानमंडळे स्थापन करण्याबाबत समन्वयक, पालकसंस्था यांच्याशी संपर्क साधला असून त्यांनी ज्ञानमंडळे स्थापन करण्यासाठी प्रतिसाद दिला आहे. परंतु सद्यस्थितीत सचिव पद रिक्त असल्याने कार्यवाही करता आलेली नाही.

४) सर्व ज्ञानमंडळे सक्षमपणे कार्यरत राहण्याकरिता आवश्यक ती प्रशासन यंत्रणा अजून पुरेशी सक्षम झालेली नाही.

ज्ञानमंडळ ही संकल्पना नवी असल्यामुळे पालकसंस्था व समन्वयकांशी संपर्क साधून त्यांना त्यांच्या कामाची कल्पना देणे, त्यांच्या कामाच्या नियोजनात मदत करणे, बहुतेक ज्ञानमंडळाचे समन्वयक हे विद्यापीठीय व अन्य कामात कार्यरत असल्याने त्यांच्याकडे सतत पाठपुरावा करून विश्वकोशाच्या कामाला प्राधान्य देतील याची काळजी घेणे, आलेल्या नोंदींचे योग्य ते संपादन झाले आहे याची दक्षता घेणे या सर्व कामासाठी मंडळामध्ये अंतर्गत यंत्रणाही सक्षमपणे उभी राहणे आवश्यक आहे. मंडळाच्या प्रशासनासाठीही ज्ञानमंडळाची संकल्पना नवीन असल्याने त्यांनाही ती पेलण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे व त्याकरिताही सुयोग्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. विश्वकोशातील विभाग संपादक/सहसंपादक या पदांचे मानधन खूप कमी आहे. त्यामुळे या पदावर काम करण्यास सक्षम तज्ज्ञ व्यक्ती उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या पदांना कायम वेतनश्रेणीत रूपांतर करणे आवश्यक आहे याकरिता पदांच्या आकृतीबंधामध्ये तसा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सन २०१७-१८ व २०१८-१९ करीताच्या अनुदानाचा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

(रुपये हजारांत)

आर्थिक वर्ष	तपशील	मंजूर अनुदान	झालेला खर्च
२०१७-१८	योजनेतर	१९५२०	१५९५४
	योजनांतर्गत	१५०८०	१७०४
२०१८-१९	योजनेतर	२१७४५	
	योजनांतर्गत	१५०८०	

मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातील पदांची सद्यस्थिती

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	कार्यरत पदे	रिक्त पदे
१	सचिव	१	-	१
२	सहायक सचिव	१	-	१
३	अधीक्षक	१	१	-
४	सहायक लेखाधिकारी	१	१	-
५	विद्याव्यासंगी सहायक	८	७	१
६	कनिष्ठ लघुलेखक	१	-	१
७	स्वीय सहायक	१	१	-
८	संपादकीय सहायक	७	३	४
९	वरिष्ठ लिपीक	२	१	१
१०	ग्रंथालयीन सहायक	३	२	१
११	लिपिक टंकलेखक	७	५	२
१२	वाहनचालक	१	१	-
१३	शिपाई	७	४	३
	एकूण	४१	२६	१५

पदभरतीवर बंदी असल्यामुळे नानघनावरील पदे सद्यस्थितीत भरण्यात आलेली नाहीत. मंडळाच्या सचिव पदाच्या उमेदवाराची निवडप्रक्रिया पूर्ण झाली असून आयोगाकडून लवकरच उमेदवार प्राप्त होणार आहे. सहायक सचिव पदाकरिता उमेदवाराची शिफारस आयोगाकडून प्राप्त झाली असून त्यांची नियुक्तीप्रक्रिया शासनस्तरावर सुरु आहे. विद्याव्यासंगी सहायक या पदावरील व्यक्तीच्या सेवेतून काढून टाकल्याने व त्यांच्याऐवजी पुनर्नियुक्ती अपेक्षित असल्याने सदर पद रिक्त आहे. पदभरतीस असलेल्या बंदीच्या अनुषंगाने अन्य वर्ग-३ ची पदे रिक्त आहेत. मात्र याबाबत स्वतंत्रपणे पदे भरण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

विधानमंडळाच्या मराठी भाषा समितीने दि. ०८.११.२०१७ रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या कार्यालयांना आणि दि. १ व २ फेब्रुवारी, २०१८ रोजी मराठी विश्वकोश कार्यालय, पाई येथे भेट दिली असता आढळून आलेल्या बाबींच्या अनुषंगाने दि. २५.०४.२०१८ रोजी घेण्यात येणा-या साक्षीकरिता संभाव्य प्रश्नांबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रश्न	स्पष्टीकरण
१	मुंबई येथील कार्यालयाच्या वापरातील अपूरी जागा.	भाषा संवर्धनाकरिता विविध योजना तयार करणे व त्या अंतर्गत आणण्याच्या दृष्टीने मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये एकाच छताखाली आणून ती कार्यान्वित करण्याकरिता मराठी भाषा भवन निर्माण करण्याचे योजिले आहे. दि.१४.०२.२०१८ रोजी मा. मंत्रीमंडळाच्या

		बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या विभागाच्या दि.०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयानुसार मराठी भाषा भवन उपकेंद्राकरिता सिडको महामंडळाने मंजूर केलेल्या भूखंड क्र.६-अ, अंदाजे क्षेत्रफळ २००० चौ.मी., सेक्टर १३, ऐरोली, नवी मुंबई येथील भूखंड दिर्घकालीन भाडेपट्टी तत्वावर घेण्याकरिता विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर जागेकरिता सन २०१७-१८ च्या अनुदानातून सिडकोला रुपये ३ कोटी अदा करण्यात आले असून भूखंड हस्तांतरणाबाबतची पुढील प्रक्रिया सुरु आहे. तसेच मराठी भाषा भवनाकरिता दक्षिण मुंबई ते वांद्रा-कुर्ला संकुल या परिसरात योग्य जागेची निवड करण्याकरिता मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
२	विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संकेतस्थळाची सद्यस्थिती व नवीन ज्ञानमंडळाच्या संकेतस्थळासाठी येणाऱ्या अडचणी.	मंडळाच्या www.marathivishwakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळाची देखभाल करण्याबाबत सी-डॅक, पुणे या संस्थेबरोबर करार करण्यात आलेला होता.सदर करार दि.१०.१०.२०१७ रोजी संपलेला असल्यामुळे मराठी भाषा विभागातर्फे (कार्या. आस्था-१) माहिती व तंत्रज्ञान (ता. प्र. वि.) संचालनालयाच्या विकासक (Webdevelopar) नेमला असून तो विभागाच्या व इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण करण्याचे काम करीत आहे. याशिवाय मराठी भाषा विभाग(खुद) व अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे संगणकीकरण करण्यासाठी संगणक विकासक नेमण्याची कार्यवाही राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्याबाबतचा निर्णय दि.१८.०४.२०१८ च्या बैठकीत घेण्यात आला.
३	मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामध्ये तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी तांत्रिक बाबींचे ज्ञान असलेल्या एका तज्ज्ञाची नेमणूक करणे.	मंडळाने ज्ञानमंडळ नावाचा नवीन उपक्रम सुरु केल्यामुळे विद्यापीठे, शैक्षणिक संस्था यांच्याबरोबर करार करून विषयनिहाय ज्ञानमंडळे स्थापन करण्यात आली आहे.या ज्ञानमंडळामार्फत झालेल्या नोंदी संकेतस्थळावर टाकणे, मंडळाचे संकेतस्थळ हाताळणे तसेच इतर अनुषंगीक तांत्रिक बाबी हाताळण्याकरीता तांत्रिक बाबींचे ज्ञान असलेल्या तज्ज्ञांची नेमणूक करण्याबाबत मंडळाच्या दि. २७ डिसेंबर २०१७ च्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव प्रशासकीय विभागास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
४	मराठी विश्वकोश कार्यालयातील	मानधनावरील एक योग्य उमेदवार न मिळाल्यामुळे भरण्यात

	विभाग संपादक व सहसंपादक ही पदे कायम वेतनश्रेणीमध्ये घेणे.	आलेली नाहीत. विभागाचा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये ही पदे नियमित वेतनश्रेणीमध्ये भरण्याच्या दृष्टीने सदर पदे नियमित आस्थापनेवर घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या पदांचे सेवाप्रवेश नियम बनविणे आवश्यक असल्याने त्याबाबतची कार्यवाही दरम्यानच्या काळात हाती घेण्यात येत आहे.
५	वाई येथील मराठी विश्वकोश कार्यालयाच्या नवीन इमारतीबाबतचा प्रस्ताव सादर करणे.	वाई येथे मराठी विश्वकोश कार्यालय हे प्राज्ञ पाठशाळेच्या इमारतीत भाडेतत्त्वार सध्या कार्यरत आहे. मराठी विश्वकोश कार्यालयाच्या ताब्यात असलेली जागा रास्तेवाडा, वाई (क्षेत्रफळ-३५९७ चौ.मी.) एवढी असून त्यात मराठी विश्वकोश कार्यालय व शासकीय मुद्रणालय या दोन्ही कार्यालयाकरिता एक संयुक्त इमारत उपरोक्त जागेवर बांधणेबाबत सुधारित बांधकाम आराखडा (G+३, Proposed Area of Building ३०३३ sq.m. (६९८ per floor) with FSI १.२) तयार करण्याची कार्यवाही ~~[illegible]~~ सुरू आहे.
६	मराठी विश्वकोश कार्यालय वाई येथील ग्रंथालयाचे अद्ययावतीकरण करणे.	मराठी विश्वकोश कार्यालय, वाई येथे मराठी विश्वकोश खंडाचे संपादकीय काम हे सातत्याने सुरू असल्याने कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावर ग्रंथालय आहे. सदर ग्रंथालय हे मागील ६८ वर्षांपासून तेथे कार्यरत असून संपादकांना नोंदी लिहण्याकरिता आवश्यक असणाऱ्या संदर्भाकरीता ५४ हजार पुस्तके उपलब्ध आहेत. सदर ग्रंथालयात दुर्मिळ असे संदर्भग्रंथ असून सदर पुस्तके जीर्ण होत आहेत. तरी सदर पुस्तकांचे जतन करण्याच्या दृष्टीने ग्रंथालयाचे अद्ययावतीकरण व संगणकीकरण करण्याच्या सूचना सहायक सचिव, वाई कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत. संगणकीकरणाच्या दृष्टीने माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाशी संपर्क करण्यात येत आहे.

परिशिष्ट–एक (ब)

नियोजित केलेल्या ज्ञानमंडळांची यादी

स्थापन झालेली ज्ञानमंडळे

१) मानव्यविद्या

अ.क्र	ज्ञानमंडळाचे नाव	विषय पालकाचे नाव	विद्यापीठ/संस्थेचे नाव	समन्वयकाचे नाव
1	भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान	डॉ. गौरी माहुलीकर	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. माधवी नरसाळे
2	भारतीयेतर धर्म आणि तत्त्वज्ञान	डॉ. गौरी माहुलीकर	मुंबई विद्यापीठ, मुंबई	प्रा. शकुंतला गावडे
3	आधुनिक तत्त्वज्ञ आणि त्यांचे तत्त्वज्ञान	डॉ. गौरी माहुलीकर	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. शर्मिला वीरकर
4	अर्थशास्त्र	डॉ. नीरज हातेकर	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. संतोष दास्ताने
5	मानसशास्त्र	डॉ. नीरज हातेकर	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. विवेक बेल्हेकर
6	राज्यशास्त्र	डॉ. रानशेखर सोलापूरे	शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	डॉ. प्रकाश पवार
7	सामरिक शास्त्र आणि राष्ट्रीय सुरक्षा	मेजर जनरल शशिकांत पित्रे	गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे	कर्नल पी. पी. मराठे
8	कायदा	श्री. अनिरुध्द कुलकर्णी	आयएलएस लॉ कॉलेज, पुणे	डॉ. जया सागडे
9	शिक्षणशास्त्र	श्री. दिपक घैसास	यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक	डॉ. कविता साळुंके
10	भाषाशास्त्र	डॉ. अरुणचंद्र पाठक	डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे	डॉ. सोनल कुलकर्णी-जोशी
11	दृश्यकला (चित्रकला आणि शिल्पकला)	श्री. सुहास बहुलकर	रचना संसद, मुंबई	श्रीमती सुपर्णा कुलकर्णी
12	संगीत (गायन वादन नृत्य)	श्री. दीपक जेवणे	गायन समाज देवल क्लब, कोल्हापूर	डॉ. सुधीर पोटे
13	नाट्यशास्त्र	श्री. दीपक जेवणे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.	डॉ. जयंत शेवतेकर
14	लोकसाहित्य व लोकसंस्कृती	डॉ. अरुणा ढेरे	महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे	डॉ. अनिल सहस्रबुद्धे
15	चित्रपट	डॉ. अरुणा ढेरे	प्रभात चित्रपट मंडळ, दादर, मुंबई	श्री. संतोष पाठारे

16	विश्वसाहित्य	डॉ. अरुणा ढेरे	महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे	डॉ. अनघा घट बेहेरे
17	मराठी साहित्य	डॉ. अरुणा ढेरे	शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	डॉ. रानन गवस
18	साहित्य-भारतीय भाषा	डॉ. अरुणा ढेरे	महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे	प्रा. अविनाश सप्रे
19	अभिजात भाषा व साहित्य	डॉ. श्रीनंद बापट	भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे	श्रीमती तनश्री रेडीज
20	प्रागैतिहासिक काळ व आद्य ऐतिहासिक काळ	डॉ. अरुणचंद्र पाठक	डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे	डॉ. सुषमा देव
21	प्राचीन इतिहास काळ	डॉ. अरुणचंद्र पाठक	डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे	डॉ. प्रकाश जोशी
22	आधुनिक इतिहास-भारतीय आणि जागतिक	डॉ. अरुणचंद्र पाठक	शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	डॉ. अवनिश पाटील
23	योगविज्ञान	श्री. दीपक जेवणे	क.जे.सोमया भारतीय संस्कृती पीठम्, विद्याविहार	श्री. बाळासाहेब वाघ
24	आंतरराष्ट्रीय संबंध	डॉ. दिनेश थिटे	म.रा.म.वि.नि.मंडळ, मुंबई	डॉ. उत्तरा सहस्रबुध्दे
25	मध्ययुगीन इतिहास - भारतीय आणि जागतिक	डॉ. अरुणचंद्र पाठक	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	डॉ. सचिन जोशी
26	वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र	श्री. दीपक घैसास	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	डॉ. संजय कप्तान

२) विज्ञान व तंत्रज्ञान ज्ञानमंडळे

अ.क्र	ज्ञानमंडळाचे नाव	विषय पालकाचे नाव	विद्यापीठ/संस्थेचे नाव	समन्वयकाचे नाव
1	भौतिकी	डॉ. बाळ फोंडके	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. माधव राजवाडे
2	रसायनशास्त्र	डॉ. बाळ फोंडके	रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई	डॉ. मालचंद्र भणगे
3	गणित-सांख्यिकी	डॉ. बाळ फोंडके	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. उल्हास दीक्षित
4	वनस्पतिशास्त्र	डॉ. बाळ फोंडके	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. शरद चाफेकर
5	वैज्ञानिक चरित्र, विज्ञान संस्था आणि संकीर्ण	डॉ. बाळ फोंडके	मराठी विज्ञान परिषद, मुंबई	अ. पां. देशपांडे

6	माहिती तंत्रज्ञान-संगणक विज्ञान	श्री दिपक पैसाल	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	डॉ. रामदीप देशमुख
7	अभ्यांत्र तंत्रज्ञान	डॉ. बाळ फोडके	स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	डॉ. वसंत वाघ
8	अणुविज्ञान आणि ऊर्जा तंत्रज्ञान	डॉ. बाळ फोडके	मराठी विज्ञान परिषद, मुंबई	डॉ. शशिकांत धारगे
9	स्थापत्य अभियांत्रिकी	डॉ. बाळ फोडके	अभियांत्रिकी महाविद्यालय,	प्रा. सुहासिनी माहेकर
10	यंत्र अभियांत्रिकी-स्वयंचल अभियांत्रिकी	डॉ. बाळ फोडके	अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे	प्रा. पी. आर धामणगावकर
11	विद्युत् अभियांत्रिकी	डॉ. बाळ फोडके	अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे	प्रा. उज्ज्वला माटे
12	धातुविज्ञान	डॉ. बाळ फोडके	अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे	प्रा. पी. पी. देशपांडे
13	संदेशवहन अभियांत्रिकी	डॉ. बाळ फोडके	अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे	प्रा. एस. पी. महाजन
14	वास्तुविज्ञान-वास्तुकला	डॉ. बाळ फोडके	रचना संसद, मुंबई	श्री. श्रीपाद एकनाथ भालेराव
15	खाणविज्ञान	डॉ. बाळ फोडके	विश्वेश्वरय्या प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर	डॉ. आर आर येरपुडे
16	कृषिविज्ञान-संपूर्ण	डॉ. भीमराव उन्मेक	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, नि. अहमदनगर	डॉ. पी. एन. रसाळ
17	भूविज्ञान	डॉ. बाळ फोडके	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती	डॉ. यादवकुमार मालळे
18	आयुर्वेद	डॉ. बाळ फोडके	विज्ञान भारती, मुंबई	वैद्य जयंत देवपुजारी

स्थापन कामयाची ज्ञानमंडळे

मानव्यविद्या	विज्ञान व तंत्रज्ञान
भूगोल- प्राकृतिक	अंतरिक्ष विज्ञान तंत्रज्ञान
मानवशास्त्र -समाजशास्त्र	पर्यावरण
लोकप्रशासन	वैद्यकशास्त्र
भूगोल- राजकीय	नाविक अभियांत्रिकी
	जलविज्ञान
	विमान अभियांत्रिकी

रद्द करण्यात आलेली ज्ञानमंडळे

अ. क्र.	ज्ञानमंडळाचे नाव	विषयतज्ज्ञाचे नाव	पालक संस्थेचे नाव	समन्वयकाचे नाव	करार रद्द करण्यात आलेला दिनांक
1	नैसर्गिकविज्ञान	डॉ. बाळ फोंडके	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. संजय देशमुख	17 जुलै 2017
2	जीवशास्त्र	डॉ. बाळ फोंडके	मुंबई विद्यापीठ, मुंबई	डॉ. सिध्दीविनायक सर्वे	17 जुलै 2017
3	माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान	श्री. दीपक पैसास	उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव	डॉ. राकेश रामटेके	20 एप्रिल 2017
4	वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र	श्री. दीपक पैसास	उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव	डॉ. समीर नारखेडे	20 एप्रिल 2017
5	क्रीडा	श्री. माधव चौडे	श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती	श्री. नवलकिशोर तिवारी	31 ऑक्टोबर 2017
6	प्रसारमाध्यमे	श्री. अनिकेत कुलकर्णी	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	डॉ. सुधीर गव्हाणे	18 नोव्हेंबर 2017

मराठी विश्वकोश कार्यालय, मुंबई

विद्यावाचस्पती/संपादकीय सहायक यांच्याकडून ज्ञानमंडळातील नोंदींचा अहवाल

दिनांक २४/०४/२०१८

विद्यावाचस्पती/संपादकीय सहायक	ज्ञानमंडळ	समन्वयकांकडून प्राप्त नोंदींची संख्या	संपादन/संशोधन झालेल्या नोंदींची संख्या	अंतिम संपादित नोंदींची संख्या
श्री. अ. वा. भाटवा, विद्यावाचस्पती सहायक	लोकसाहित्य	४९	४७	४७
	अभिनय कला व साहित्य	४२	४२	४१
	मराठी साहित्य	३१	३१	३१
	भाषाशास्त्र	२५	२४	२४
	भारतीय भाषा साहित्य	०५	०५	०५
	राज्यशास्त्र	०१	०१	०१
	विश्वसाहित्य	०२	०२	०२
श्री. प्र. ग. पेंडसे, विद्यावाचस्पती सहायक	आधुनिक तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञान	२१	२१	२१
	कायदा, न्याय व न्यायव्यवस्था	०३	३	०१
	आंतरराष्ट्रीय संबंध	१९	१६	१०
	भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान	३३	२७	१९
	भारतेतर धर्म आणि तत्त्वज्ञान	३०	२४	२४
	सांस्कृतिकवाद व राष्ट्रीय एकात्मता	१२२	१२२	१२२
	क्रीडा	०५	०४	००
श्री. ल. ल. शिंदे, विद्यावाचस्पती सहायक	प्राथमिक व आद्य ऐतिहासिक काळ (पुराणवस्तुविद्या)	२६	२६	२६
	प्राचीन ऐतिहासिक काळ	१५	१९	१९
	दृश्यकला (चित्रकला व शिल्पकला)	२४	१९	१९
	आधुनिक काळ	२	२	२
	चित्रपट	३०	२२	२२
[illegible] विद्यावाचस्पती सहायक	रसायनशास्त्र	८	३	३
	विद्युत्अभियांत्रिकी	१६	९	०
	संगणकशास्त्र अभियांत्रिकी	२	२	२
श्री. म. ग. [illegible], विद्यावाचस्पती सहायक	अर्थशास्त्र	१३६	८०	८०
	[illegible]	२३	-	३

	शिक्षणशास्त्र	५८	४८	४८
डॉ. र. बा. गोंदाळ, विद्यापरिषदेचे सहायक	धातुविज्ञान	२२	२८	२८
	भूविज्ञान	१०	-	-
	कृषिविज्ञान	२८	-	-
	वनस्पतिविज्ञान	५६	५३	५३
श्रीमती प. नि. पाचकवडे, संचालकीय सहायक	गणित, सांख्यिकी	५६	-	२२
	व्यापार अभिप्रशिक्षण	२५	२१	२१
	यंत्र व उत्पादन अभियांत्रिकी	६	९	६
श्रीमती शि. पं. पारसकर, संचालकीय सहायक	अभियांत्रिकी रसायन	२७	२५	२०
	वस्त्रविज्ञान	२३	२०	१०
	अणुजीव	२८	२४	२४
श्रीमती उ. मु. देशपांडे, संचालकीय सहायक	भाषाशास्त्र	१०	२४	०
	इतिहास	१८	१५	२८
	पदव्यवहार	२३	२	०
श्रीमती स्व. नि. खोत्रागडे, विद्यापरिषदेचे सहायक	मौखिक चाचणी	२१५	२१५	२१५
	मौखिकी	३९	३९	३९
	मंत्रालय-नाविकी संवहन	०२	०२	०२
	खगोलविज्ञान	०७	०७	०७
	वाहतूकशास्त्र-वाहतूकविज्ञान	२३	२३	२३
	एकूण	१४०९	१०५९	९९२

सर्व विद्यापरिषदांचे/संचालकीय सहायकांनी दिलेल्या विवरणानुसार.

(डॉ. ज. बा. गंडेकर)
उपाध्यक्ष व सचिव
मराठी विश्वकोश महामंडळ, मुंबई

प्रत माहितीकरिता सादर :
(१) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई - ४००००५.
(२) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई - ४००००५.

परिशिष्ट–एक (क)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रस्तावना :

मराठी साहित्य संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते. सध्याचे मंडळाचे अध्यक्ष श्री.बाबा भांड हे असून विद्यमान मंडळ दिनांक ०५ ऑगस्ट, २०१५ पासून कार्यरत आहे.

१) मंडळाचे मुख्य उद्दिष्ट :-

महाराष्ट्राची साहित्य, संस्कृती आणि इतिहास हे विषय तसेच विज्ञान, अत्याधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या क्षेत्रे येणाऱ्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शासनाने मंडळाकडे सोपविलेली वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ **मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे.** ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनसंकलन व आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यातील अद्ययावत प्रगतीची माहिती देणारी, मूलभूत ज्ञान देणारी पुस्तके व अभिजात ग्रंथांची मालाही स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे.

२) मंडळाची संरचना:-

अ.क्र.	संवर्गाचे नाव	मंजूर पदे	कार्यरत पदे	रिक्त पदे
१	सचिव गट – अ	१	१	—
२	अधिक्षक	१	—	१
३	प्रपाठक	१	१	—
४	सहायक लेखाधिकारी	१	१	—
५	उच्च श्रेणी लघुलेखक	१	१	—
६	निम्न श्रेणी लघुलेखक	१	१	—
७	वरिष्ठ लिपिक	४	१	३

७	ग्रंथालयीन सहायक	१	१	—
८	लिपिक - टंकलेखक	७	४	३
९	वाहन चालक	१	-	१
१०	शिपाई	२	२	—
	एकूण	२१	१३	०८

रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही -

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयातील अधीक्षक हे १ रिक्त पद भरण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या ई - महापरिषा विभागामार्फत सुरू करण्यात आलेली आहे.याबाबत अलीकडेच ई-महापरिषा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली आहे.

२) मंडळाच्या आस्थापनेवरील लिपिक वर्गीय रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात येत आहे. यापैकी वरिष्ठ लिपिक पदोन्नती संवर्गातील रिक्त असलेले १ पद भरण्यासाठी कनिष्ठ संवर्गात मंडळाच्या आस्थापनेवर पात्र उमेदवार नाही.

३) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ कार्यालयाला मागील ३ वर्षांत योजनांतर्गत योजना या उद्दिष्टाखाली प्राप्त अनुदान आणि झालेला खर्च याबाबतची माहिती :-

वर्ष	तरतूद	प्रत्यक्ष खर्च
२०१४-१५	८५५००००	८५५००००
२०१५-१६	१०२५००००	१०२५००००
२०१६-१७	१२५४६०००	१२५४६०००
२०१७-१८	२,४०,९५०००	२,४०,९५०००

४) प्रमुख योजना :-

१) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना - शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला, उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना, महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन व संशोधन, मंडळाची वैचारिक, लक्षीशास्त्रक, चरित्रात्मक स्वरूपाची अन्य प्रकाशने यांचा समावेश होतो.

२) उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना.

३) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनाचे अनुदान योजना

४) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना

५) नवलेखकांची चर्चासत्रे/ कार्यशाळांना अनुदान योजना

६) सात साहित्य संस्थांना अनुदान

७) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान

८) नियतकालिकांना अनुदान

९) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

१०) विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार

११) श्री.पु. भागवत पुरस्कार

१२) अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान

१३) महाराष्ट्राचे शिल्पकार योजना

१४) मंडळाच्या ग्रंथांचे ई-बुक

५) मंडळाच्या ग्रंथांचे ई-बुक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मराठी भाषा, संस्कृती, विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान व समाजविद्या यासारख्या विविध विषयांवर आजमितीपर्यंत ५३३ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यापैकी ४४४ पुस्तके ई-बुक करण्यासाठी सी-डॅक, पुणे या संस्थेकडे सोपविण्यात आली होती. सदर ४४४ पुस्तके पी.डी.एफ. स्वरुपात मंडळाच्या msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सदर ४४४ पुस्तकांचे ई-बुक पूर्ण झाले असून सदर ४४४ पुस्तकांपैकी ४३४ ई-बुक स्वरुपातील पुस्तके मंडळाच्या https//: msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वाचकांना मोफत स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. व उर्वरित १० ई-बुक स्वरुपातील पुस्तके मंडळाच्या https//:msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. उर्वरित ८९ पुस्तके ई-बुक स्वरुपात उपलब्ध करण्याच्या सूचना मंडळाला देण्यात आल्या आहेत.

६) " **एक भारत, श्रेष्ठ भारत** " या केंद्र शासनाच्या योजनेमध्ये सन २०१६-१७ च्या प्रथम वर्षात आपल्या राज्याची जोडी ओरिसा राज्यासोबत असून यामध्ये भाषिक व सांस्कृतिक देवाणघेवाण संदर्भात राज्य पुरस्कार प्राप्त ५ पुस्तकांचा अनुवाद उरिया भाषेत करण्याची जबाबदारी विभागावर सोपविण्यात आली होती. यामध्ये पुढील ५ पुस्तके उरिया भाषेत अनुवादीत केली आहेत :-

अ.क्र.	पुस्तकाचे नाव	लेखकाचे नाव	अनुवादकाचे नाव
१.	महाराष्ट्राची कुळकथा	डॉ. मधुकर ढवळीकर	श्रीमती मंजुलता मोहपात्रा
२.	गावगाडा शतकानंतर	श्री. अनिल पाटील	श्रीमती सविता राऊत

३.	गंमत शाळा (भाग-३)	श्री. राजीव तांबे	श्रीमती सविता राऊत
४.	सर्वसाक्षी	श्रीमती संजिवनी खेर	डॉ. वासुदेव जोगळेकर
५.	कैफियत	श्री. आनंद जातेगावकर	डॉ. वासुदेव जोगळेकर

उरिया भाषेत अनुवादीत वरील ५ पुस्तकांची छपाई करण्याचे काम ओरिसा राज्याच्या सांस्कृतिक विभागाकडे सोपविण्यात आले आहे. तसेच उरिया भाषेतील ५ पुस्तकांचा मराठी अनुवाद पुर्ण झाल्यानंतर त्या पुस्तकांच्या छपाईचे काम मराठी भाषा विभागाकडून करण्यात येणार आहे.

७) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या वतीने मंडळाच्या १६ प्रकाशने या लेखाशिर्षांतर्गत पुस्तक प्रकाशन योजनसाठी पुस्तकांचे मुद्रण, पुनर्मुद्रण, विविध बृहदप्रकल्पांचे प्रकाशन, लेखकांचे मानधन, तज्ञ मानधन यासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी सन २०१८-१९ मध्ये रक्कम रुपये २ कोटीपैकी रक्कम रुपये ४५ लक्ष इतका निधी शासनाने मंजुर केला आहे.

८) पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिर इमारत दुसरा मजला येथे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयाचे माहे मार्च, २००७ ते माहे मार्च,२०१८ या कालावधीचे थकीत भाडे रक्कम रुपये १,७६,१०,७९१/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी शहात्तर लक्ष नव्वद हजार सातशे एक्याण्णव फक्त) पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई या कार्यालयास अदा करण्यात आली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी भाडे रक्कम अदा करण्यासाठी रु. १५,६०,०००/- (अक्षरी पंधरा लाख, साठ हजार रुपये फक्त) इतकी तरतूद करण्यात आली आहे. भाषा संवर्धनाकरिता विविध योजना तयार करणे व त्या अंमलात आणण्याच्या दृष्टीने मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये एकाच छत्राखाली आणून ती कार्यान्वित करण्याकरिता मराठी भाषा भवन निर्माण करण्याचे योजिले आहे. दि.१४.०२.२०१८ रोजी मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या विभागाच्या दि.०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयानुसार मराठी भाषा भवन उपकेंद्राकरिता सिडको महामंडळाने मंजुर केलेल्या भूखंड क्र.६-अ, अंदाजे क्षेत्रफळ २००० चौ.मी., सेक्टर १३, ऐरोली, नवी मुंबई येथील भूखंड दिर्घकालीन भाडेपट्टी तत्वावर घेण्याकरिता विहित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर जागेकरिता सन २०१७-१८ च्या अनुदानातून सिडकोला रुपये ३ कोटी अदा करण्यात आले असून भूखंड हस्तांतरणाबाबतची पुढील प्रक्रिया सुरु आहे. तसेच मराठी भाषा भवनाकरिता दक्षिण मुंबई ते वांद्रा-कुर्ला संकुल या परिसरात योग्य जागेची निवड करण्याकरिता मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

परिशिष्ट–एक (ड)

पुस्तकांचे गांव - मिलार

मुद्दा क्र. १ - प्रकल्प कार्यालयातील कमी मनुष्यबळ

प्रकल्पांतर्गत झालेल्या विविध बैठकींमध्ये नवीन पदे भरण्यासाठी विविध गोष्टींचा अभ्यास करुन (जसे कामाचे स्वरुप, स्थानिकांना संधी इ.) नविन पदभरती प्रस्ताव दिनांक १२-०४-२०१८ रोजी रविंद्र नाट्य मंदिर येथे झालेल्या राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये पुस्तकांचं गाव या प्रकल्पामध्ये नवीन पदभरती करण्यासंदर्भातील प्रस्ताव मांडण्यात आला. पदभरती प्रस्ताव मांडण्यात येऊन तात्पुरत्या कालावधीसाठी पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली.

मुद्दा क्र २ - पुस्तकांच्या गावात येणाऱ्यांसाठी कमी दरात निवासाची व्यवस्था.

वाचनासाठी - अभ्यासासाठी येणारे वाचक-पर्यटक व शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी यांच्यासाठी कमी दरात निवासाची सोय करण्यासाठी धर्मशाळेची व्यवस्था करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी मिलार गावातील जुन्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत दुरुस्त करुन धर्मशाळा तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या ठिकाणाची पाहणी करुन या इमारतीच्या दुरुस्ती व नूतनीकरण संदर्भातील रु.३४.७४ लाख इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर केले आहे.

तसेच स्थानिक घरमालक व रिसॉर्टमालक यांच्याशी चर्चा करुन पुस्तकांच्या गावात वाचनासाठी - अभ्यासासाठी येणाऱ्या व्यक्तींना परवडेल अशा दरात भोजन व निवासाची सोय उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली आहे.

मुद्दा क्र. ३ - प्रकल्पाला भेटीकरता गावात येणाऱ्यांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहाची व्यवस्था.

पुस्तकांचं गाव, मिलार मध्ये स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांना त्या संदर्भातील पाहणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच काही लोकप्रतिनिधींकडून अर्थसहाय्य मिळविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पाहणी झाली असून अंदाजपत्रक आले की काम सुरु करण्याचे नियोजन आहे.

मुद्दा क्र. ४ - वाहनतळाची व्यवस्था करण्याबाबत.

पुस्तकांच्या गावात येणाऱ्यांसाठी सायंकाळीच्या कार्यक्रमांच्या वेळी जननी-माता मंदिर प्रशिक्षण, अनगोल्स इन रिसॉर्ट समोरील जागा यांचा वापर करण्यात येतो. त्याचबरोबर गावातील प्रमुख व्यक्तींशी चर्चा करुन गावातील मोकळ्या जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील चर्चा करण्यात आली आहे.

मुद्दा क्र. ५ - नवीन विषयांच्या दालनांची वाढ

पुस्तकांचं गाव प्रकल्पामध्ये सद्यस्थितीत साहित्यप्रकारनिहाय ३० दालने तयार करण्यात आली आहेत. आगामी काळात दालनांची वाढ करताना समितीने सुचविलेले विषय समाविष्ट करण्यात येतील.

पुस्तकांचे गांव या उपक्रमांतर्गत आतापर्यंत खालील कामे करण्यात आली आहेत.

१) निवड करण्यात आलेल्या २५ घरांमध्ये १५,०००/- पुस्तके ठेवण्यात आली आहेत.

२) मिलार येथील हवामानाचा विचार करून पुस्तकांची बांधणी करण्यात आली आहे.

३) पर्यटकांना पुस्तके व्यवस्थित पाहता येतील, चाळता येतील आणि प्रसंगी आरामात बसून वाचता येतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. त्याकरिता प्रत्येक घरात पुस्तकांसाठी दोन लोखंडी कपाटे, आठ खुर्च्या, एक बीनबॅग, एक पुस्तक मांडणी, दोन टी-पॉय, एक शिल्प/चित्र, सावलीसाठी जम्बो छत्री इत्यादि साहित्य पुरविण्यात आले आहे.

४) निवड करण्यात आलेल्या घरांची साहित्य प्रकारानुसार विभागणी करून घरांची रंगरंगोटी, सुशोभीकरण व सजावट करण्यात आली.

५) निवड केलेल्या घरांवर पुस्तकाच्या गांवाचे बोधचिन्ह बसविण्यात आले. त्याचप्रमाणे गावामध्ये महत्त्वाच्या ठिकाणी, तसेच रस्त्यांवर दिशादर्शक फलक, नकाशे बसविण्यात आले आहेत.

६) लेखक व प्रकाशकांनी येथे पुस्तकांची प्रकाशने करावीत, अशी प्रोत्साहनपर वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. दि. २७ फेब्रुवारी, १ मे, मराठी भाषा पंधरवडा, दिवाळी, नाताळ व अन्य सुट्ट्यांचे दिवस ह्या काळात मान्यवर साहित्यिक येथे भेट देऊन रसिकांशी औपचारिक-अनौपचारिक संवाद साधतील असे कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

७) पुस्तकाचे गाव याचे स्वतंत्र संकेतस्थळ, ॲप, फेसबुक पेज तसेच माहितीपट तयार करण्यात आले आहेत.

भविष्यातील सोयी-सुविधांचे नियोजन

१. सध्या या प्रकल्पाअंतर्गत २५ घरे निवडली आहेत, याशिवाय अजून ८ ते १० घरांची निवड करून त्यामध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

२. लेखन, वाचन, संपादन, मुद्रितशोधन, प्रकाशन या संबंधीच्या प्रशिक्षण कार्यशाळा येथे आयोजित करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे विविध शाळा व महाविद्यालयांच्या सहलींचे आयोजनाबाबत

शाळा/महाविद्यालय यांच्या सहकार्यातून प्रयत्न करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुस्तक प्रकाशन कार्यक्रम, परिसंवाद, साहित्य जत्रा, गान्यवर साहित्यिकांचे साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. पुस्तकांच्या गावाला भेट देणारे पर्यटक, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थी, आयोजित करण्यात येणा-या विविध साहित्यिक उपक्रमांसाठी उपस्थित साहित्यिक व प्रेक्षकवर्गाच्या सोयीकरिता तात्पुरत्या समुह निवा-याची (डॉरमेंटरी) सोय म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी जुन्या गावठाणातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची मिळकत क्र. १००/१ मधील एकूण २८५.५६ चौ. मी. क्षेत्रफळ असलेल्या ६ शाळा खोल्या ३० वर्ष मुदतीच्या करारावर राज्य मराठी विकास संस्थेकडे विनामोबदला हस्तांतरीत केल्या आहेत. सदर वापरात नसलेल्या शाळेची दुरुस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येणार असून त्याबाबतचे रु.३८.७४ लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक त्यांच्याकडून प्राप्त झाले आहे. याकामासाठी रु. १०.०० लक्ष निधी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून उपलब्ध करून देण्यात आला आहे.

३. वर्षभर विविध उपक्रम राबविण्यासाठी खुले प्रेक्षागृह (ॲम्फि थिएटर) बांधण्याचे नियोजित आहे. यासाठी जुन्या गावठाण क्षेत्रातील जागा ग्रामपंचायत, मिलार यांनी शासनाकडे वर्ग केली आहे. सदरची जागा महसूल विभागाकडून मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्था या कार्यालयाच्या नांवे वर्ग करण्याबाबत सहमतीसाठी पाठविण्यात आली आहे. दरम्यान सदर जागेचे सुरक्षिततेच्या दृष्टीने आयआयटी, पवई या संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यात आले आहे. आयआयटी, पवई यांनी सूचविल्यानुसार खुले प्रेक्षागृहाचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी जागेची पहाणी करून रु. ३२.३३ लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक आणि आराखडे सादर केले आहे. त्यानुसार खुल्या प्रेक्षागृहाच्या बांधकामाबाबतचे प्राथमिक काम सुरु करण्यात आले आहे.

४. मिलार गावातून जाणा-या रस्त्यांवर दोन ठिकाणी स्वागत कमान उभारण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडून जिल्हा नियोजन योजनेअंतर्गत रुपये २५.०० लक्ष निधी मंजुर करण्यात आला आहे.

५. पुस्तकाचे गावात येणा-या जनसमुदायाच्या सोयीसाठी तीन ते चार ठिकाणी प्रसाधनगृहाची उभारणी करण्यात येणार आहे.

~~६. वाहनतळाची सोय करण्यात येणार आहे.~~

भाषा संचालनालय, मुंबई

भाषा संचालनालयामार्फत हाती घेण्यात आलेल्या विविध प्रकल्पांची माहिती बोजक्यात पुढीलप्रमाणे आहे.

१) भ्रमणध्वनी उपयोजक (मोबाईल ॲप) :-

भाषा संचालनालयाने यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या शब्दकोशांपैकी पुढील चार निवडक शब्दकोश भ्रमणध्वनी उपयोजकाद्वारे उपलब्ध करून दिले असून दि. २७ फेब्रुवारी २०१८ रोजी मराठी भाषा गौरव दिनी या भ्रमणध्वनी उपयोजकाचे मा.मंत्री, मराठी भाषा यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

१) कार्यदर्शिका २) प्रशासन वाक्प्रयोग ३) शासन व्यवहार कोश ४) न्यायव्यवहार कोश

या व्यतिरिक्त सदर भ्रमणध्वनी उपयोजकामध्ये विविध मंत्रालयीन विभाग व त्या अंतर्गत येणारी कार्यालये यांच्या शासकीय संकेतस्थळांना भेट देण्यासाठी आणि केंद्राचे व राज्याचे मराठी अधिनियम यांची सीडीएक पुढे पाहण्यासाठी लिंक देखील देण्यात आली आहे. वरील चार कोशांमध्ये सुमारे ८६ हजार मराठी / इंग्रजी शब्दांचा समावेश आहे.

२) संक्षिप्त शब्दांची लघुपुस्तिका :-

प्रशासकीय कामकाजामध्ये वरिष्ठांकडून लिहिले जाणारे शेरे मराठीमध्ये नेमक्या शब्दात व संक्षिप्त स्वरूपात लिहिण्यासाठी संक्षिप्त शेऱ्यांची इंग्रजी - मराठी लघुपुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली आहे.

३) भाषा संचालनालयाची प्रकाशने संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबतची सद्यस्थिती :-

भाषा संचालनालयाचे परिभाषा कोश व अन्य प्रकाशने ई-पुस्तकाच्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे काम सी-डॅक, पुणे या संस्थेमार्फत २०१४-१५ मध्ये पूर्ण करून घेण्यात आलेले होते. हे कोश शोधानुकूल पद्धतीचे असून ते coe.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. आता ते भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४) परिभाषा कोश :-

आतापर्यंत ३५ परिभाषा कोश / शब्दकोश तसेच शासन मार्गदर्शक पुस्तिकांची निर्मिती केली आहे.परिभाषा कोश अद्ययावतीकरण करण्याचे काम सातत्याने सुरु असते. सध्या शासन व्यवहार कोश, कृषी शास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र तसेच शिक्षणशास्त्र परिभाषा कोश या कोशांच्या अद्ययावतीकरणाचे काम पूर्ण होत आहे.

१.	लोकप्रशासन परिभाषा कोश	२.	कृषिशास्त्र परिभाषा कोश	३.	तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश	४.	गणितशास्त्र परिभाषा कोश
५.	शिक्षणशास्त्र परिभाषा कोश	६.	मानसशास्त्र परिभाषा कोश	७.	रसायनशास्त्र परिभाषा कोश	८.	यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश
९.	भूगोलशास्त्र परिभाषा कोश	१०.	न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश	११.	औषधशास्त्र परिभाषा कोश	१२.	व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश
१३.	साहित्य समीक्षा परिभाषा कोश	१४.	वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश	१५.	वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश	१६.	धातुशास्त्र परिभाषा कोश
१७.	शारीरशास्त्र परिभाषा कोश	१८.	ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश	१९.	विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश	२०.	संख्याशास्त्र परिभाषा कोश
२१.	शरीरक्रियाशास्त्र परिभाषा कोश	२२.	भूशास्त्र परिभाषा कोश	२३.	स्थापत्य परिभाषा कोश	२४.	अर्थशास्त्र परिभाषा कोश
२५.	जीवशास्त्र परिभाषा कोश	२६.	भौतिकशास्त्र परिभाषा कोश	२७.	राज्यशास्त्र परिभाषा कोश	२८.	भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या परिभाषा कोश
२९.	समाजशास्त्र परिभाषा कोश						

शासन व्यवहार उपयोगी शब्दकोश :-

१.	शासन व्यवहार कोश	२.	प्रशासन वाक्प्रयोग	३.	पदनाम कोश	४.	वित्तीय शब्दावली
५.	शासन व्यवहार शब्दावली	६.	न्यायव्यवहार कोश				

५) एतदर्थ संकल्पमार्फत घेत असलेल्या परीक्षा :-

अ) परीक्षा घेण्यामागील शासनाची भूमिका व उद्देश :-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या कलम ४ नुसार विहित प्रयोजनांव्यतिरिक्त शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा संपूर्ण वापर करणे अनिवार्य असल्याने, शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने, आवश्यक असलेल्या मानवी क्षमता व कौशल्ये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे. ही मानवी क्षमता व कौशल्ये प्राप्त करण्याच्या दृष्टीने, भाषा संचालनालयामार्फत एतदर्थ संकल्पमार्फत घेतल्या जाणाऱ्या मराठी व हिंदी भाषा विषयक आणि मराठी टंकलेखन व मराठी लघुलेखन विषयक परीक्षा वर्षातून २ वेळा घेतल्या जातात आणि या परीक्षांमधून सुट मिळत नसलेल्या

१७३१५

कर्मचाऱ्यांनी/ अधिकाऱ्यांनी या परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत या परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढी रोखल्या जातात.

ब) एतदर्थ मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षा व परीक्षांचा तपशील:-

अ.क्र.	परीक्षेचे नाव	सन २०१७-१८ मध्ये अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची संख्या	उपस्थित उमेदवार	उत्तीर्ण उमेदवार	अनुत्तीर्ण उमेदवार	आतापर्यंत एकूण उमेदवारांची संख्या
१.	मराठी भाषा परीक्षा (राजपत्रित)	३१३	२७६	२३२	४३	५२१३
२.	मराठी भाषा परीक्षा (अराजपत्रित)	२०१	१९०	१४३	४७	१५६१७
३.	हिंदी भाषा (निम्नश्रेणी)	२१३	२६८	२५९	१७	४६५०
४.	हिंदी भाषा (उच्चश्रेणी)	१२२७	११९६	१०५३	६३	३३८६३
५.	मराठी टंकलेखन परीक्षा	५४८	४४४	३११	१३३	२१२१२
६.	मराठी लघुलेखन परीक्षा	१३५	१०१	४१	६८	१४२४०

६) केंद्रीय अधिनियमांच्या अनुवादाच्या कामाबाबत :-

केंद्र/राज्य शासनाकडून वेळोवेळी विविध कायदे/अधिनियम/नियम इ. प्रसिद्ध केले जातात. केंद्र/राज्य शासनाचे विविध कायदे/अधिनियम/नियम इत्यादि मराठी भाषेत उपलब्ध करुन देण्याचे काम भाषा संचालनालयामार्फत करण्यात येते.

महाराष्ट्र विधानमंडळात सादर होणारे प्रत्येक विधेयक, सुधारणा विधेयक हे इंग्रजी भाषेतील अनुवादासह मराठी भाषेतून सादर होते. त्यानंतर त्याचे अधिनियमात रुपांतर होत असते. विधानमंडळाच्या सभागृहात वेळोवेळी सुधारणा विधेयक, नवीन विधेयक सादर होत असते त्याचा मराठी अनुवाद भाषा संचालनालय निरंतर चालवत आहे. तसेच राज्यपाल महोदयांच्या विधानमंडळातील भाषणाकरिता मराठी अनुवाद उपलब्ध करुन देते. तसेच प्रत्येक कायद्यात झालेल्या सुधारणांचे यथोचित संकलन करुन नवीन कायद्याची निळी पुस्तके देखील उपलब्ध करुन देते. हे कायदे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. आतापर्यंत महाराष्ट्र राज्याचे जवळपास १०३ मराठी भाषेतील अधिनियम शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून जास्तीतजास्त अद्ययावत अधिनियम उपलब्ध करुन देण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

मंत्रालयीन विभागाकडून दरवर्ष करण्यात येणारे नियम,विनियम, आदेश, निर्णय मसुदा, दिवाणीत सुधारणा यांचे मराठी भाषेतील अनुवाद करण्यात येतात. दिवसात सरासरी ३ ते ४ अभिसूचनांचे काम भाषा

संचालनालयाकडून पार पाडले जाते. भाषा संचालनालयाकडे अनुवाद करुन उपलब्ध असलेले मराठी भाषेतील नियम देखील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे काम हाती घेतले आहे. त्यात २०१७-२०१८ मध्ये पार पाडलेले नियम महारेरा/वस्तु व सेवा कर नियम यांचा समावेश आहे.

केंद्रीय कायद्यांचे मराठीत भाषांतर करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियोजनबद्ध आखणी करण्यात आली

केंद्रीय (विधि) अधिनियम, १९७३ हा केंद्र सरकारचा कायदा १९७३ पासून अंमलात आला असून त्यात १९८८ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्याचे (प्राधिकृतपाठ) (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ असे शीर्ष बदलण्यात आले आहे. उक्त कायद्याची अंमलबजावणी करताना, भारत सरकारचे विधि व न्याय मंत्रालय हे भाषा संचालनालयास वेळोवेळी अधिनियमांची प्राधान्य सूची पाठवते. त्यातील सूचीबद्ध असणा-या अधिनियमांचे मराठी भाषेतील अनुवाद भाषा संचालनालय जबाबदारीने पार पाडते.

भाषा संचानालय प्रस्तुत अधिनियमांची नियोजनबद्ध मराठीत भाषांतरणाची आखणी पुढीलप्रमाणे करते.

- सूचीत अंतर्भूत असलेल्या इंग्रजी भाषेतील अधिनियमाची प्रत भारत सरकारच्या संकेतस्थळावरुन काढून त्यांचा अनुवादकाकडून यथोचित मराठी भाषेतून अनुवाद करण्यात येतो.
- अनुवादकांकडून प्राप्त झालेला अनुवाद हा पर्यवेक्षकांकडून तपासण्यात येतो.
- पर्यवेक्षकाकडून तपासणी झालेला अनुवाद सहायक भाषा संचालक यांच्याकडून तपासला जातो.
- पर्यवेक्षक/सहायक भाषा संचालक यांना अनुवाद तपासताना काही शंका असल्यास त्याचे निराकरण व समाधान भाषा उप संचालक (विधि) यांच्याकडून होते.
- असा उपलब्ध झालेला अनुवाद भाषा संचालक यांच्याकडून विधिक्षेत्राती (Vetting) भारत सरकारच्या राजभाषा खंड, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात येतो.
- प्रस्तुत अनुवादात काही सुधारण व त्यात अंतर्भूत होणारी संज्ञा/शब्द यांसाठी तसेच विधीक्षेत्राती, विधि व न्याय मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथे बैठक आयोजित करण्यात येते. प्रस्तुत बैठकीत सुधारणा-दुरुस्त्या व संज्ञा- शब्द निश्चित झाल्यावर भाषा संचालनालयाकडून प्रस्तुत अनुवादामध्ये यथोचित सूचनेनुसार सुधारणा/दुरुस्त्यांचा तसेच संज्ञा शब्दांचा अंतर्भाव करुन त्याची हिरवी प्रत (ॲड्युअरलेड) छापण्यात येते. त्यावर राष्ट्रपती

१७५ /५

मसुदेवांची मान्यता घेतल्यानंतर प्रस्तुत छपाई झालेला अधिनियम भारत सरकारच्या राजपत्रात छापण्यात येतो. त्यानंतर त्यावर प्राधिकृत पाठाचे टप्पे अवलंबून त्यास अंतिम निळे पुस्तक प्राधिकृत पाठ म्हणून छपाई करण्यात येते. या छपाईला लगेच मराठी अनुवाद यावा संपूर्ण चर्चा भारत सरकार करीत असते.

एकूण प्राप्त झालेले अधिनियम	निरसित (Repeal)	प्राधिकृत पाठ	प्राधिकृत अनुवाद (राजपत्र व प्राधिकृत पाठासाठी)	राजपत्रासाठी व प्राधिकृत पाठासाठीचा अनुवाद (औद्योगिक/अस्तेअसाठी)
३४९	३१	१७५	४४	(१६+८३)९९ संकेतस्थळावर उपलब्ध करावयाचे अधिनियम

नव्याने अनुवादासाठी प्राप्त झालेले अधिनियम	भारत सरकारकडून विचिक्षा होऊन आलेले अधिनियम	अनुवादासाठी हाती घेण्यात आलेले अधिनियम	अनुवाद पूर्ण झालेले अधिनियम	अनुवाद करावयाचे अधिनियम
३५	६	४	२	२३

भाषा संचालनालयाने एकूण १७५ अधिनियम अद्ययावत होण्याच्या दृष्टीने काम हाती घेतले असून ७० अधिनियमात कोणतीही सुधारणा नसल्याचे आढळून आले आहे. भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयाकडून याबाबत मंजुरीही प्राप्त झालेली आहे. त्यामुळे ७० अधिनियम एप्रिल २०१८ पर्यंत सुधारणा असल्याप्रमाणे उपलब्ध आहेत. उर्वरित ५ अधिनियमांचे सुधारणा करून अद्ययावतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. ४४ प्राधिकृत अनुवादांपैकी १५ अधिनियमात सुधारणा करण्याचे काम पूर्ण झाले आहे. ९९ अधिनियम राजपत्रात छापण्यासाठी उपलब्ध असून त्याला प्राधिकृतपाठाच्या टप्प्यात आणण्याचे काम हाती घेतले आहे.

७. पदांचा तपशील.

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	भाषा संचालक	१		१
२	भाषा उप संचालक (अनुवाद व शब्दावली)	१		१
३	भाषा उप संचालक (विधि)	१	१	

४.	सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना)	१	—	१
५	सहायक भाषा संचालक / विभागीय सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली)	८	६	२
६.	भाषा अधिकारी (हिंदी)	१	१	—
७.	उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)	१	१	—
८.	अधीक्षक	७	७	—
९.	पर्यवेक्षक (मराठी)	९	८	१
१०.	पर्यवेक्षक (हिंदी)	१	१	—
११.	अनुवादक (मराठी)	४२.	३२	१०
१२.	अनुवादक (हिंदी)	४	२	२
१३	वरिष्ठ लिपिक	१०	१०	—
१४.	लिपिक टंकलेखक	२०	१०	१०
१५.	लघु-टंकलेखक (मराठी)	२	२	—
१६.	कनिष्ठ ग्रंथपाल	१	—	१
१७.	वाहन चालक	२	२	—
१८.	नाईक	२	२	—
१९.	चपराशी	१८	१३	५
एकूण :-		१३२	९८	३४

भाषा संचालक या पदाकरिता सन-२०१४ व सन-२०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवार उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि शैक्षणिक अर्हतेच्या मुद्यावरुन पात्र उमेदवार उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे सन-२०१३ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमांमध्ये आवश्यक बदल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. हे पद पदोन्नतीने भरण्याच्या दृष्टीने विचार करताना देखील निम्न संवर्गात निकष पूर्ण करणारा अधिकारी उपलब्ध नसल्याने विचार करणे शक्य झाले नाही.

सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) तसेच (प्रशिक्षण व आस्थापना) या पदांच्या निम्न संवर्गात ज्येष्ठतेबाबत असलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने सर्व संबंधित संवर्गाचे ज्येष्ठता तपासण्याचे काम हाती घेण्यात आल्याने प्रत्यक्ष पदोन्नती प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. या पदांच्या ज्येष्ठतेच्या सुधारणेनंतर भाषा उपसंचालक (अनुवाद व शब्दावली) या पदाच्या पदोन्नतीचा प्रस्ताव देखील विचारात घेण्यात येईल.

अनुवाद (मराठी) व (हिंदी) या संवर्गातील पदांकरिता आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. लिपिक टंकलेखक या पदांकरिता मागणीपत्र सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आले आहे.

मराठी भाषा विभाग/आस्था-१

विषय :- मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना हस्तांतरित करण्याबाबत.

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी राजभाषा धोरण निश्चित करण्याकरिता दिनांक ३०.६.२०१७ रोजी मा.मंत्री (मराठी भाषा) यांच्या अधिपत्याखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीतील चर्चेच्या वेळी ग्रंथालय प्रसारासंबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. सदर चर्चेच्या वेळी ग्रंथालय संचालनालयाची मूळ उद्दिष्टे ग्रंथ प्रसार व भाषा विकासाशी निगडीत असल्याने, सदर विषय मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असणे आवश्यक असल्याचे मा.मंत्री (मराठी भाषा) यांनी निर्देश दिले. यासंदर्भात पुढील वस्तुस्थिती नमूद करण्यात येते आहे.

२. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये "मराठी भाषा विभाग" असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग स्थापन करण्याचा निर्णय दि.२४ जून, २०१० च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयास अनुलक्षून स्वतंत्र मराठी भाषा विभागाच्या स्थापनेबाबतचा आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-मभावा-२१०/४५८/प्र.क्र.९५(भाग-२)/२०-ब, दिनांक २२ जुलै, २०१० अन्वये निर्गमित करण्यात आला असून याबाबतची अधिसूचना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजी निर्गमित करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी, तसेच प्रसार व प्रचारासाठी राबवावयाच्या योजना व भाषेशी संबंधीत सर्व विषय एकत्रितपणे हाताळण्यासाठी एकच स्वतंत्र विभाग असावा म्हणून स्वतंत्र मराठी भाषा विभागाची निर्मिती प्रस्तावित असताना सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग यांच्या अधिनस्त असलेलेली पुढील कार्यालये/संस्था स्वतंत्र मराठी भाषा विभागात सामावून घेण्याचे प्रस्तावित होते.

(१) भाषा संचालनालय, (२) राज्य मराठी विकास संस्था, (३) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, (४) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, (५) ग्रंथालये,

(६) पाठ्यपुस्तके सोडून मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी कला या सर्व विषयाशी संबंधित उत्तम पुस्तकांना उत्तेजन देण्याकरिता पुस्तक निवड करणेबाबत (पुस्तक निवड समिती) व तदनुषंगिक बाबी.

मराठी भाषा व साहित्याशी निगडीत वरील कार्यालये/संस्था स्वतंत्र मराठी भाषा विभागात सामावून घेण्याबाबत प्रस्तावित असलेल्या सदर कार्यालये/संस्था ज्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्यात होती त्यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता उच्च व तंत्र शिक्षण विभाग वगळून अन्य विभागांनी सहमती दर्शविली होती. मात्र उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पुढीलप्रमाणे अभिप्राय नोंदविले होते

"ग्रंथालये संचालनालयाबरोबर असणा-या शासकीय ग्रंथालयांमध्ये प्रामुख्याने मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराथी, तेलगु, तामिळ, मल्याळम, कानडी, सिंधी, आसामी, बंगाली, प्राकृत, मोडी इत्यादी विविध भाषेचा ग्रंथसंग्रह व नियतकालिके प्राप्त होऊन त्या त्या भाषा जाणणा-या जनतेला/वाचकांना/गरजू व्यक्तींना यांचा लाभ घेण्यात येतो. त्यामुळे प्रस्तावित नवनिर्मित मराठी विभागाला हा भाग जोडल्यास अन्य भाषिक संग्रह व वाचनिय साहित्य आणि लाभार्थी यांच्यादृष्टीने संयुक्तिक होणार नाही. सद्य:स्थितीत उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे ग्रंथालये संचालनालय हे कला व संस्कृती जोपासण्याचे काम उत्तमरित्या व सुरळीत करीत आहेत. तरी नव्याने निर्माण करण्यात येणा-या मराठी विभागाकडे ग्रंथालय संचालनालय वर्ग करणे संयुक्तिक होणार नाही." सदर अभिप्रायास सामान्य प्रशासन विभागाने सहमती दर्शविली होती. त्यामुळे ग्रंथालये वगळता अन्य प्रस्तावित कार्यालये/संस्था यांचा नवनिर्मित मराठी भाषा विभागामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

३. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली असलेले ग्रंथालय संचालनालय हा कार्यालयाचे ध्येय व उद्दिष्ट हे "वाचन संस्कृती जोपासणे, त्याचा प्रचार व प्रसार करणे" असा आहे. मराठी भाषा विभागाची निर्मिती देखील मराठी भाषेचा विकासकरणे, वाचन संस्कृती जोपासणे आणि भाषेचा प्रचार व प्रसार करणे यासाठीच करण्यात आली आहे, यांच उद्दिष्टांचा भाग म्हणून पुस्तकांचे गंध/ग्रंथोत्सव यासारखे उपक्रम विभागाकडून राबविण्यात येतात. सन

२०११ पासून विभागाकडून प्रतिवर्षी जिल्हानिहाय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येत होते. परंतु विभागाकडे सदर योजना राबविण्यासाठी स्वतंत्र अशी जिल्हास्तरीय संस्था नसल्याने ग्रंथालय संचालनालय यांच्यामार्फत सदर योजना राबविण्यात येत होती. क्षेत्रीय स्तरावरील ही अडचण विचारात घेऊन त्यानंतर ही योजना ग्रंथालय संचालनालयामार्फत राबविण्याकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. ग्रंथालय संचालनालयाचे मूळ उद्दिष्ट वाचन संस्कृती जोपासणे व भाषेचा विकासासाठी प्रचार व प्रसार करणे हे असल्याने ते मराठी भाषा विकासाशी निगडीत आहे. तसेच अन्य भाषिक पुस्तकांशी संबंधित विषय हे "भाषा" या विषयाशी निगडीत असल्याने ग्रंथालय संचालनालय मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणे जास्त संयुक्तिक आहे. तरी मा.मंत्री (मराठी भाषा) यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर ग्रंथालय संचालनालय मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली हस्तांतरित करण्यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाची सहमती घेण्यात यावी. तद्नंतर अन्यबाबींच्या पूर्ततेकरीता सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येईल.

मान्यतेसाठी सादर.

(श्री.गौतम)

अ.सं. (श्री.जाधव)

उप सचिव (श्रीमती गावडे)

प्रधान सचिव (श्री.गगराणी)

प्रधान सचिव (श्री.कुंटे)(उ.व तं.शि.वि.)

[मा. मंत्री (मराठी भाषा)]

उच्च व तंत्र शिक्षण विभाग/ सामि ५

पूर्वपृष्ठावरील मराठी भाषा विभागाच्या पृ. ३ वरील टिप्पणीच्या अनुषंगाने सादर,

२. सदरहू टिप्पणी अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली हस्तांतरीत करण्याबाबत अभिप्राय देण्याची विनंती करण्यात आली आहे.

३. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने ग्रंथालय संचालनालयाचे अभिप्राय मागविण्यात आले असता ग्रंथालय संचालनालयाच्या दि. १९/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय प्राप्त असून ते खालील प्रमाणे आहेत-

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ मधील तरतूदींनुसार ग्रंथालय संचालनालय या स्वतंत्र विभागाची स्थापना दिनांक ०२ मे, १९६८ रोजी करण्यात आली आहे. अधिनियम संमत होताना ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना तत्कालीन शिक्षण आणि समाज कल्याण विभागात होती. सद्यस्थितीमध्ये ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीत कार्यरत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ मधील तरतूदींनुसार राज्यात सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, संघटन, परीक्षण, नियोजन आणि विकास साधणे हे ग्रंथालय संचालनालयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

४. आजमितीस भारतातील २९ राज्ये व ७ केंद्रशासीत प्रदेशांपैकी २० राज्यांमध्ये ग्रंथालय अधिनियम पारित करण्यात आला असून, ग्रंथालय विभाग ज्या प्रशासकीय विभागाखाली कार्यरत आहे, त्याची वस्तुस्थिती खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

अ.क्र.	राज्य / केंद्रशासित प्रदेशाचे नाव	अधिनियम संमत झाल्याचे वर्ष	प्रशासनिक विभाग
१.	तामिळनाडू	१९४८	शालेय शिक्षण विभाग
२.	आंध्रप्रदेश	१९६०	ग्रंथालय विभाग (स्वतंत्र)
३.	कर्नाटक	१९६५	ग्रंथालय विभाग (स्वतंत्र)
४.	महाराष्ट्र	१९६७	उच्च व तंत्र शिक्षण विभाग
५.	पश्चिम बंगाल	१९७९	सर्व शिक्षा, विस्तार व ग्रंथालय सेवा विभाग
६.	मणिपूर	१९८८	शालेय शिक्षण विभाग
७.	हरियाणा	१९८९	उच्च शिक्षण विभाग
८.	केरळ	१९८९	उच्च शिक्षण विभाग
९.	मिझोराम	१९९३	शिक्षण आणि मानव संसाधन विकास विभाग
१०.	गोवा	१९९३	कला आणि संस्कृती विभाग
११.	गुजरात	२०००	क्रीडा, युवक कल्याण आणि सांस्कृतिक कार्य विभाग
१२.	ओडिसा	२००१	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१३.	उत्तरांचल	२००५	शिक्षण विभाग
१४.	राजस्थान	२००६	भाषा आणि ग्रंथालय विभाग
१५.	उत्तर प्रदेश	२००६	शालेय शिक्षण विभाग

१६.	लक्षद्वीप	२००७	समाज कल्याण व सांस्कृतिक कार्य विभाग
१७.	बिहार	२००८	मानव संसाधन व विकास विभाग
१८.	छत्तीसगढ	२००९	शालेय शिक्षण विभाग
१९.	अरुणाचल प्रदेश	२००९	शिक्षण आणि ग्रंथालय विभाग
२०.	तेलंगाणा	२०१४	ग्रंथालय विभाग (स्वतंत्र)

भारतातील उपरोक्त २० राज्यांमध्ये ग्रंथालय अधिनियम संमत करण्यात आला असून, २० पैकी ३ राज्यांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय विभाग हा प्रशासनिक विभाग म्हणून त्या राज्यांमध्ये कार्यरत आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यासह १२ राज्यांमध्ये ग्रंथालय विभाग शालेय शिक्षण अथवा उच्च शिक्षण विभागास जोडण्यात आला असल्याचे निदर्शनास येते. गोवा, गुजरात, ओडिसा, आणि लक्षद्विप या ४ राज्यांमध्ये ग्रंथालय विभाग हा कला, क्रिडा व सांस्कृतिक कार्य विभागाकडे जोडण्यात आला आहे, तर राजस्थान राज्यात भाषा आणि ग्रंथालय विभाग यांचा संयुक्तपणे प्रशासनिक विभाग स्थापन केला असल्याचे दिसून येते.

५. सार्वजनिक ग्रंथालये ही अनौपचारिक शिक्षणाचे एक माध्यम असून, त्याद्वारे समाजाच्या एकूणच जडणघडणीमध्ये महत्वाचे योगदान देत आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ मधील तरतूदींनुसार ग्रंथालय संचालनालयाची स्थापना करण्यात आली असून, राज्यामध्ये ग्रंथालय चळवळीचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य ग्रंथालय संचालनालयाकडून करण्यात येत आहे. याबाबत विशेषत्वाने येथे नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्याचा ग्रंथालय अधिनियम व अनुदान विषयक नियमांतील तरतूदींनुसार ग्रंथालयांचे अ,ब, क आणि ड अशा ४ वर्गांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे आणि त्याचा लाभ घेणारी १२१४५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय ग्रंथालये/कार्यालये, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, ग्रामपंचायत ग्रंथालये व इतर सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे आहे--

अ. क्र.	कार्यालये	संख्या
अ	शासनाची कार्यालये व शासकीय ग्रंथालये (दि. ३१.०३.२०१७ अखेर)	
१	ग्रंथालय संचालनालय (मुख्यालय)	१
२	सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय (महसूल विभाग निहाय प्रत्येकी १)	६
३	राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई	१
४	शासकीय विभागीय ग्रंथालये	६
५	डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती संदर्भ ग्रंथालय,दापोली	१
६	जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये	३५
	एकूण	५०
ब	अनुदानप्राप्त शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये (दि.३१.०३.२०१७ अखेर)	
१	जिल्हा अ वर्ग-३४, तालुका अ वर्ग-१३३, तालुका ब वर्ग-१०९, तालुका क वर्ग-३०	३०६
२	इतर अ वर्ग-१६२, इतर ब वर्ग- १९५५, आणि इतर क वर्ग- ४०५३	६१७०
३	ड- वर्ग ग्रंथालये	५५१५
	एकूण	१२१९१

५	ग्रामपंचायत ग्रंथालये- तालुका ब वर्ग - ४, तालुका क वर्ग-३, इतर अ वर्ग -५, इतर ब वर्ग-४८, इतर क वर्ग- ६९, ड वर्ग- २५	१५४
	एकूण	१२१४५
क	संशोधन संस्थांची ग्रंथालये	३५
ड	शतायु ग्रंथालये (११९९१ मध्ये समावेश आहे व शासनाकडून विशेष प्रोत्साहनपर अनुदान रु. ५.०० लक्ष देण्यात आले आहे.)	८३
इ	राज्य ग्रंथालय संघ(१), विभाग ग्रंथालय संघ (६), जिल्हा ग्रंथालय संघ (३३)	४०
फ	संचालनालयांतर्गत कार्यरत समित्या	५

६. ग्रंथालय संचालनालयाच्या आस्थापनेवर ४८१ मंजूर पदे असून त्यातील ३६० पदे भरण्यात आली आहेत. उर्वरीत पदे सेवानिवृत्ती व अन्य कारणाने रिक्त आहेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांसाठी रु. १५३.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. तसेच, जिल्हा वार्षिक योजनेतून सुमारे रु. ५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. प्रशासकीय विभागाकडून जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ट योजनांच्या मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णयही निर्गमीत करण्यात आला आहे. याशिवाय, भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून राष्ट्रीय ग्रंथालय अभियानांतर्गत दोन कार्यालयांसाठी NML Model Library Scheme अंतर्गत रु. ६३.०० लक्ष हा केंद्रशासनाचा हिस्सा मंजूर करण्यात आला आहे. सन १९७२ पासून राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाताच्या समान आणि असमान निधी योजनांसाठी अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. यामध्ये इमारत बांधकाम व विस्तार, कार्यशाळा घेणे, ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे,संगणक, फर्निचर व ग्रंथ भेट ग्रंथालयांना देणे, ग्रंथालयामध्ये स्पर्धा परीक्षा, महिला, बाल, दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करणे, इ. योजनांच्या लाभासाठी प्रतिष्ठानकडून अर्थसहाय्य मंजुर करण्यात येते.

७. ग्रंथालय संचालनालयाचे मूळ उद्दिष्ट "वाचन संस्कृती जोपासणे, त्याचा प्रचार व प्रसार करणे", हे असून ते मराठी भाषा विभागाशी निगडीत आहे, असे नमूद केले आहे. वास्तविक पाहता, मराठी भाषा विभागाच्या स्थापनेच्या आधीपासून म्हणजे ग्रंथालय संचालनालयाची स्थापना झाल्यापासूनच, ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त असलेली शासकीय ग्रंथालये आणि शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विविध भाषांतील प्रसिध्द ग्रंथसंपदेद्वारे ज्ञानप्राप्ती साध्य करणे, वाचन संस्कृती जोपासणे, त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य अव्याहत पणे राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मराठी भाषा विभागाकडून सन २०११ पासून प्रतिवर्षी जिल्हानिहाय ग्रंथोत्सवाचे आयोजन पूर्वी माहिती आणि जनसंपर्क विभागामार्फत राबविण्यात येत होते. सदर ग्रंथोत्सव योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे शासन निर्णय, मराठी भाषा विभाग दि. १६/०७/२०१६ अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील ग्रंथालय संचालनालयामार्फत ग्रंथोत्सव हा उपक्रम राज्यातील जिल्ह्याच्या ठिकाणी राबविण्यासाठी दि. १६ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. केवळ मराठी भाषेचा प्रचार प्रसार करणे हे ग्रंथालय संचालनालयाचे कार्य नसून, ज्ञानप्राप्तीसाठी विविध भाषेतील ग्रंथांच्या माध्यमातून वाचन चळवळ वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविणे, जसे थोर राष्ट्रपुरुषांची जयंती, पुण्यतिथी, थोर विचारवंत व लेखकांच्या

५	ग्रामपंचायत ग्रंथालये- तालुका ब वर्ग - ४, तालुका क वर्ग-३, इतर अ वर्ग -५, इतर ब वर्ग-४८, इतर क वर्ग- ६९, ड वर्ग- २५	१५४
	एकूण	१२१४५
क	संशोधन संस्थांची ग्रंथालये	३५
ड	शताब्दी ग्रंथालये (११९९९ मध्ये समावेश आहे व शासनाकडून विशेष प्रोत्साहनपर अनुदान रु. ५.०० लक्ष देण्यात आले आहे.)	८३
इ	राज्य ग्रंथालय संघ(१), विभाग ग्रंथालय संघ (६), जिल्हा ग्रंथालय संघ (३३)	४०
फ	संचालनालयांतर्गत कार्यरत समित्या	५

६. ग्रंथालय संचालनालयाच्या आस्थापनेवर ४८१ मंजूर पदे असून त्यातील ३६० पदे भरण्यात आली आहेत. उर्वरीत पदे सेवानिवृत्ती व अन्य कारणाने रिक्त आहेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांसाठी रु. ५१३.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. तसेच, जिल्हा वार्षिक योजनेतून सुमारे रु. ५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. प्रशासकीय विभागाकडून जिल्हा वार्षिक योजनेत समाविष्ट योजनांच्या मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णयही निर्गमीत करण्यात आला आहे. याशिवाय, भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून राष्ट्रीय ग्रंथालय अभियानांतर्गत दोन कार्यालयांसाठी NML Model Library Scheme अंतर्गत रु. ६३.०० लक्ष हा केंद्रशासनाचा हिस्सा मंजूर करण्यात आला आहे. सन १९४२ पासून राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाताच्या समान आणि असमान निधी योजनांसाठी अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. यामध्ये इमारत बांधकाम व विस्तार, कार्यशाळा घेणे, ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे,संगणक, फर्निचर व ग्रंथ भेट ग्रंथालयांना देणे, ग्रंथालयामध्ये स्पर्धा परीक्षा, महिला, बाल, दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करणे, इ. योजनांच्या लाभासाठी प्रतिष्ठानकडून अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते.

७. ग्रंथालय संचालनालयाचे मूळ उद्दिष्ट "वाचन संस्कृती जोपासणे, त्याचा प्रचार व प्रसार करणे", हे असून ते मराठी भाषा विभागाशी निगडीत आहे, असे नमूद केले आहे. वास्तविक पाहता, मराठी भाषा विभागाच्या स्थापनेच्या आधीपासून म्हणजे ग्रंथालय संचालनालयाची स्थापना झाल्यापासूनच, ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त असलेली शासकीय ग्रंथालये आणि शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विविध भाषांतील प्रसिध्द ग्रंथसंपदेद्वारे ज्ञानप्राप्ती साध्य करणे, वाचन संस्कृती जोपासणे, त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य अव्याहत पणे राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मराठी भाषा विभागाकडून सन २०११ पासून प्रतिवर्षी जिल्हानिहाय ग्रंथोत्सवाचे आयोजन पूर्वी माहिती आणि जनसंपर्क विभागामार्फत राबविण्यात येत होते. सदर ग्रंथोत्सव योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे शासन निर्णय, मराठी भाषा विभाग दि. १६/०७/२०१६ अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील ग्रंथालय संचालनालयामार्फत ग्रंथोत्सव हा उपक्रम राज्यातील जिल्ह्याच्या ठिकाणी राबविण्यासाठी दि. १६ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. केवळ मराठी भाषेचा प्रचार प्रसार करणे हे ग्रंथालय संचालनालयाचे कार्य नसून, ज्ञानप्राप्तीसाठी विविध भाषेतील ग्रंथांच्या माध्यमातून वाचन चळवळ वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविणे, जसे थोर राष्ट्रपुरुषांची जयंती, पुण्यतिथी, थोर विचारवंत व लेखकांच्या

सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा घेतल्या जातात. त्याचे वर्ग व्यवस्थापन जिल्हा ग्रंथालय संघामार्फत केले जाते. परीक्षाधिकारी म्हणून शासकीय ग्रंथालयांतील अधिकारी व कर्मचारी काम पाहतात. सदर ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा अधिनियमांतील तरतूदींनुसार कार्यरत आहे. याशिवाय वाचन प्रेरणा दिन, ग्रंथोत्सव, मराठी भाषा गौरव दिन साजरा करणे, थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त ग्रंथप्रदर्शन, महिला, बालक, ज्येष्ठ नागरिक वाचेसाठी विविध विषयांवर आधारित व्याख्यानांचे आयोजन करणे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करणे, इ. उपक्रम राबविले जातात. यातील ग्रंथोत्सव हा उपक्रम मराठी भाषा विभागाकडून ग्रंथालय संचालनालयाने स्वत:हून मागणी करुन घेतला आहे. याशिवायही मराठी भाषा विभागाचे अन्य उपक्रम राबवायचे असतील तर ग्रंथालय संचालनालय आपल्या स्तरावरुन शक्यती मदत करण्यास तयार आहे. त्यासाठी आस्थापनेसह प्रशासनिक विभाग बदलण्याची आवश्यकता नाही, या तसे केल्यास संपूर्ण भारतामध्ये केवळ महाराष्ट्रात असा बदल होईल व तो मूळ शिक्षण विभाग सोडून होईल, असे संचालनालयाचे अभिप्राय आहेत.

११. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषा विभाग असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग स्थापन करण्याचा निर्णय दि. २४/०६/२०१० च्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयास अनुलक्षून मराठी भाषेच्या प्रसार व प्रचारासाठी राबवावयाच्या योजना व भाषेशी संबंधीत सर्व विषय एकत्रितपणे हाताळण्यासाठी एकच स्वतंत्र मराठी भाषा विभागाची निर्मिती प्रस्तावित असताना सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग यांच्या अधिनस्त असलेली कार्यालये स्वतंत्र मराठी भाषा विभागात सामावून घेण्याचे प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत -

" ग्रंथालये संचालनालयाबरोबर असणा-या शासकीय ग्रंथालयांमध्ये प्रामुख्याने मराठी, हिंदी, इंग्रजी, ऊर्दू, गुजराथी, तेलगु, तामिळ, मल्याळम, कानडी, सिंधी, आसामी, बंगाली, प्राकृत, मोडी इत्यादी विविध भाषेचा ग्रंथसंग्रह व नियतकालिके प्राप्त होऊन त्या त्या भाषा जाणणाऱ्या जनतेला/वाचकांना/गरजू व्यक्तींना याचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे प्रस्तावित नवनिर्मित मराठी विभागाला हा भाग जोडल्यास अन्य भाषिक संग्रह व वाङ्मय साहित्य आणि लाभार्थी यांच्यादृष्टीने संयुक्तिक होणार नाही. सद्यःस्थितीत उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे ग्रंथालये संचालनालय हे कला व संस्कृती जोपासण्याचे काम उत्तमरित्या व सुरळित करीत आहेत. तरी नव्याने निर्माण करण्यात येणा-या मराठी विभागाकडे ग्रंथालय संचालनालय वर्ग करणे संयुक्तिक होणार नाही. " या अभिप्रायास सामान्य प्रशासन विभागाने सहमती दर्शविल्यामुळे नवनिर्मित मराठी भाषा विभागामध्ये ग्रंथालयाचा समावेश करण्यात आलेला नाही.

१२ विभागाचे अभिप्राय- परिच्छेद ११ मधील विभागाचे वापूर्वीचे अभिप्राय व ग्रंथालय संचालनालयाचे ग्रंथालय संचालनालयाकडील सद्यस्थितीत चालू असलेल्या योजना, कार्यव्याप्ती आणि भारतातील उपरोक्त २० राज्यांमध्ये ग्रंथालय अधिनियम संमत करण्यात आला असून, देशातील २० पैकी ३ राज्यांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय विभाग हा प्रशासनिक विभाग म्हणून त्या राज्यांमध्ये कार्यरत आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यासह १२ राज्यांमध्ये

ग्रंथालय विभाग करीता शिक्षण अधिक व्यय टिकाव विभागात जोडण्यात आला असल्याची निदर्शनास येते. सेवा, पुरवठा, अंदाजपत्रक, आणि लेखाशीर्ष या ४ मध्यांमध्ये ग्रंथालय विभाग हा वेगळा, स्वतंत्र व सांस्कृतिक कार्य विभागाकडे जोडण्यात आला आहे, तर राज्यात राज्यस्तर मध्ये आणि ग्रंथालय विभाग दोन्ही समुहाकडे प्रशासकीय नियंत्रण ठेवण्यात येत आला आहे. ही बाब विचारात घेता ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना मराठी भाषा विभागाकडे वर्ग करणे सयुक्तिक होणार नाही, या अभिप्रायासह मराठी भाषा विभागास पुढील कार्यवाही करावी.

मान्यतेसाठी सादर,

(अ.ज. (वी. सावरे))

उ.स. (ग्रंथालये)

(शु.व.वि.)

सचिव (मराठी भाषा विभाग)

मराठी भाषा विभाग/आस्था-१

पूर्व पृष्ठावरील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या टिप्पणी अनुसरुन सादर.

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषा विभाग असा स्वतंत्र प्रशासकिय विभाग स्थापन करण्याचा निर्णय दि. २४.०६.२०१० च्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयास अनुलक्षून मराठी भाषेच्या प्रसार व प्रचारासाठी राबवावयाच्या योजना व भाषेशी संबंधित सर्व विषय एकत्रितपणे हाताळण्यासाठी एकच स्वतंत्र मराठी भाषा विभाग निर्माण करण्यात आला आहे. मराठी भाषा विभागाची निमिर्ती ही मराठी भाषेचा विकास करणे, वाचन संस्कृती जोपसना आणि भाषेचा प्रचार प्रसार करणे यासाठीच करण्यात आली आहे. याच उद्दिष्टांचा भाग म्हणून पुस्ताकांचे गांव/ ग्रंथोत्सव यासारखे उपक्रम विभागाकडून राबविण्यात येतात. सन २०११ पासून विभागाकडून प्रतिवर्षी जिल्हानिहाय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येत होते. परंतु विभागाकडे सदर योजना राबविण्यासाठी स्वतंत्र असे जिल्हास्तरीय यंत्रणा नसल्याने ग्रंथालय संचालनालय यांच्यामार्फत सदर योजना राबविण्यात येत होत. क्षेत्रिय स्तरावरील ही अडचण विचारात घेवून ही योजना ग्रंथालय संचालनालयामार्फत राबविण्याकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे.

ग्रंथालय संचालनालयाचे मुळ उद्दिष्ट वाचन संस्कृती जोपासणे व भाषेच्या विकासासाठी प्रचार व प्रसार करणे हे असल्याने व ते मराठी भाषा विकासाशी निगडीत असल्याने ग्रंथालय संचालनालय मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणे जास्त संयुक्तिक होईल. ही बाब विचारात घेवून व मा. मंत्री (मराठी भाषा) यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर ग्रंथालय संचालनालय मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली हस्तांतरित करण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाची सहमती घेण्यासाठी पृ. १-३ /टिवि नुसार प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ मधील तरतूदींनुसार ग्रंथालय संचालनालय या स्वतंत्र विभागाची स्थापना दि. २ मे, १९६८ रोजी करण्यात आली आहे. अधिनियम संमत होताना ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना तत्कालीन शिक्षण आणि समाजकल्याण विभागात होती. सद्य:स्थितीमध्ये ग्रंथालय संचालनालयाची आस्थापना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित कार्यरत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ मधील तरतूदींनुसार राज्यात सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापन, संघटन, परिरक्षण, नियोजन आणि विकास साधणे हे ग्रंथालय संचालनालयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आजमितीस भारतातील २९ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशांपैकी २०

राज्यांमध्ये ग्रंथालय अधिनियम पारित करण्यात आला असून, ग्रंथालय विभाग ज्या प्रशासकिय विभागाखाली कार्यरत आहे, त्याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे, २० राज्यांपैकी ३ राज्यांमध्ये तर तेथे ग्रंथालय विभाग हा प्रशासनिक विभाग म्हणून त्या राज्यांमध्ये कार्यरत आहे. तसेच महाराष्ट्र राज्यासह ९ राज्यांमध्ये ग्रंथालय विभाग शालेय शिक्षण अथवा उच्च शिक्षण विभागास जोडण्यात आला असल्याचे निदर्शनास येते. गोवा, गुजरात, दिल्ली, लक्षद्विप या ४ राज्यांमध्ये ग्रंथालय विभाग हा कला, क्रिडा व सांस्कृतिक कार्य विभागाकडे जोडण्यात आला आहे. तर राजस्थान राज्यात भाषा आणि ग्रंथालय विभाग यांचा संयुक्तपणे प्रशासनिक विभाग स्थापन केला असल्याचे दिसून येते. मराठी भाषा विभागाचे अन्य उपक्रम राबवीयाचे असतील तर ग्रंथालय संचालनालय आपल्या सारारुप शक्य ती मदत करण्यास तयार आहे. त्यासाठी आस्थापनेसह प्रशासनिक विभाग बदलण्याची आवश्यकता नाही, या तसे केल्यास संपूर्ण भारतामध्ये केवळ महाराष्ट्रात असा बदल होईल व तो मुख्य शिक्षण विभाग सोडून होईल असे ग्रंथालय संचालनालयाचे अभिप्राय आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ग्रंथालय संचालनालयाची कार्यालये, त्यांची संख्या, मंजूर पदे, अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी व त्यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या योजना याबाबतची माहिती नमूद करून ग्रंथालय संचालनालया मराठी भाषा विभागाकडे वर्ग करणे संयुक्तिक होणार नाही, असे अभिप्राय दिलेले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ग्रंथालय संचालनालयाला प्रशासकिय विभाग बदलल्यामुळे नेमक्या कोणत्या अडचणी येणार आहेत याचे विवेचन त्यांच्या टिप्पणीमध्ये दिलेले नाही. अन्य राज्यांमध्ये ग्रंथालय विभाग विशिष्ट विभागाला जोडण्यात आलेला नाही. याबाबतही उच्च व तंत्रशिक्षण विभागाने समर्थनीय मुद्दे नमूद केलेले नाहीत. तसेच ग्रंथालय संचालनालय भाषा विभागाला जोडल्यास संचालनालयाची धोरणे/प्रकल्प व आस्थापना विषयक बाबी हाताळण्यास या विभागाला कोणत्याही अडचणी नाहीत. मराठी भाषा विभागाची व ग्रंथालय संचालनालयाची उद्दिष्टे एकसारखी असल्याने व मराठी भाषा विभागास विभागाच्या योजना जिल्हास्तरावर राबविण्यासाठी जिल्हास्तरीय यंत्रणा उपलब्ध होऊन दोन्ही कार्यालयांची उद्दिष्टये साध्य करण्यास मदत होईल, तरी ग्रंथालय संचालनालय मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. तरी याबाबत वरिष्ठ स्तरावर आदेश व्हावेत.

अवर सचिव
(हर्षवर्धन जाधव)

उपरोक्त ३ प्रशासनिक वस्तुस्थिती विचारात घेता, ग्रंथालय संचालनालयास मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरीत करणेबाबत कु. अदिती तटकरे

उप सचिव (आस्था)

प्रधान सचिव (मराठी भाषा)

मा. मंत्री.

परिशिष्ट–एक (इ)

आस्था-२

मराठी भाषा विभाग व क्षेत्रिय कार्यालये यांचा सुधारीत आकृतीबंध २०१७ उच्चस्तर सचिव समिती बैठक

टिप्पणी व विहित प्रपत्रे

जोडपत्र – "क.१"

आकृतीबंधाचा प्रस्ताव सादर करावयाच्या विवरणपत्राचा नमुना

(शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.पदनि-०६१०/प्र.क्र.२०/आयुक्त, दि.२९.६.२०१० चे सहपत्र)

कार्यालयाचे नांव : महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

अ.क्र.	मागूनच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडावी.)	सध्याची मंजूर पदे	सध्या कार्यरत पदे	रिक्त पदे	प्रस्तावित पदे	सध्याच्या कार्यरत पदावरील वेतनाचा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारी वार्षिक बचत	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	सचिव (रु.१४९,००-३१२००, ग्रे.पे.६६००)	१	१	-	१	१०,६६,७०६	१०,६६,७०६		
२	सहायक सचिव (रु.९३००-३४८००, ग्रे.पे.४४००)	१	-	१	२	५,०७,६७२	१०,१५,३४४		
३	अधीक्षक (रु.९३००-३४८००, ग्रे.पे.४३००)	१	-	१	१	४,३५,९८४	४,३५,९८४		
४	सहायक लेखा अधिकारी (रु.९३००-३४८००, ग्रे.पे.४४००)	१	१	-	१	६,६५,१४६	६,६५,१४६		
५	निम्नश्रेणी लघुलेखक (रु.९३००-३४८००, ग्रे.पे.४३००)	२	१	१	२	१०,२५,००४	१०,२५,००४		हिंदीचा आकृतीबंध [illegible]

अ.क्र.	पदपूर्तीचा आकृतीबंधानुसार मंजूर पदे (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडावी.)	मंजूर पदे	सध्या कार्यरत पदे	रिक्त पदे	प्रस्तावित पदे	सध्याच्या कार्यरत पदावरील वेतनाचा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारी वार्षिक बचत	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
									[illegible]
६	विद्यालयीन सहायक (रु.९३००-३४८००, ग्रे.पे.४४००)	८	६	२	८	३४,४४,५५२	३४,४४,५५२	—	
४	संपादकीय सहायक (रु.५२००-२०२००, ग्रे.पे.२८००)	७	४	३	८	२९,८०,५२४	३३,४४,८८०		
८	कनिष्ठ लिपिक (रु.५२००-२०२००, ग्रे.पे.२४००)	२	१	१	२	६,४३,४६४	६,४३,४६४		
१	ग्रंथालयीन सहायक (रु.५२००-२०२००, ग्रे.पे.२०००)	३	२	१	२	९,४५,३४८	६,४२,१६८	२,७३,१८०	
१०	लिपिक-टंकलेखक (रु.५२००-२०२००, ग्रे.पे.१९००)	७	५	२	४	१९,३६,३२०	१९,३६,३२०		
११	वाहनचालक (रु.५२००-२०२००, ग्रे.पे.१९००)	१	१	—	१	२,४५,४६४	२,४५,४६४		

अ.क्र.	बापूर्वीच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडावी.)	सेवेतील मंजूर पदे	सध्या कार्यरत पदे	रिक्त पदे	प्रस्तावित पदे	सध्याच्या कार्यरत पदावरील वेतनाचा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारी वार्षिक बचत	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१२	शिपाई (क.४४४०-७४४०, ग्रे.पे.१३००)	७	६	१	७	१९,०६,६३२	१९,०६,६३२		
१३	विभाग संपादक (कंत्राटी) (मानधन रु.२१०००/-)	२	--	२	-	५,०४,०००		५,०४,०००	
१४	सह संपादक (कंत्राटी) (मानधन रु.१४०००/-)	३	--	३	-	५,०४,०००		५,०४,०००	
१५	कला संपादक (कंत्राटी) (मानधन रु.११०००/-)	१	--	१	-	१,३२,०००		१,३२,०००	
१६	प्रमुख चित्रकार (कंत्राटी) (मानधन रु.१००००/-)	१	-	१	-	१,२०,०००		१,२०,०००	
१७	प्रमुख गण चित्रकार (कंत्राटी) (मानधन रु.११०००/-)	१	-	१	-	१,३२,०००		१,३२,०००	
१८	सहायक गण चित्रकार (कंत्राटी) (मानधन रु.८५००/-)	१	-	१	-	१,०२,०००		१,०२,०००	
१९	संदर्भ सहायक (कंत्राटी) (मानधन रु.८०००/-)	१	-	१	-	९६,०००		९६,०००	
२०	विभाग संपादक (रु.१५६००-३९१००, ग्रे.पे.६६००)				२		१६,५८,८०८		[illegible]
२१	सह संपादक (रु.९३००-३४८००, ग्रे.पे.४६००)				२		११,१३,४६८		[illegible]

अ.क्र.	मागूनीच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडावी.)	सध्याची मंजूर पदे	सध्या कार्यरत पदे	रिक्त पदे	प्रस्तावित पदे	सध्याच्या कार्यरत पदावरील वेतनाचा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारा वार्षिक खर्च	प्रस्तावित आकृतीबंधानुसार वेतनावर होणारी वार्षिक बचत	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
२२	कला संपादक (रु.१३००-३४८००, ग्रे.पे.४४००)				१		५,०४,५७२		[illegible]
	एकूण	५१	२८	२३	४७	१,४४,५०,३१६	२,००,३९,४९२	१८,६३,९८०	

टीप :

१) अ.क्र.१३ ते १९ मधील एकूण १० पदे समर्पित करण्यात येत आहेत.

२) सध्या ज्ञानमंडळामार्फत विश्वकोशाची माहिती वाचकांकरिता सातत्याने उपलब्ध होणार आहे. नव्याने होणाऱ्या बदलामुळे माहितीचे / नोंदीचे आलेख संपादन करण्याकरिता संपादकीय संवर्गात कुशल / सज्ज व्यक्तीची नियमित नियुक्ती होणे गरजेचे आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे अ.क्र.२० ते २२ येथील ५ पदे नव्याने प्रस्तावित केली आहेत.

केंद्र शासनाच्या निर्णया सूत्रानुसार केंद्र शासनाच्या कार्यालयामधून/प्राधिकरणामधून मराठीचा वापर करणेबाबत.

.माझा संचालनालयाकडे मराठी भाषेच्या धोरणाची अंमलबजावणी तोपर्यंत बाबत —

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक – मभावा –१०९१/१२८/२०–ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ६ सप्टेंबर, १९९१.

पहा :- १] शासन निर्णय, क्रमांक–मभावा–१०८७/१०४७/प्र. क्र.२/८७/२०–ब, दिनांक २९ जुलै, १९८९.
२] शासन परिपत्रक क्रमांक –मभावा–१०९१/१२८/२०–ब, दिनांक १७ मे, १९९१.

परिपत्रक :-

शासन व्यवहारात मराठीचा वाढत्या प्रमाणात वापर करण्याच्या धोरणानुसार व केंद्र शासनाच्या निर्णयासूत्रानुसार केंद्र शासनाच्या कार्यालयांमधून/प्राधिकरणामधून जनतेच्या माहितीसाठी लागणे आवश्यक नामफलक, सूचना फलक यांवर हिंदी व इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचाही वापर केला जातो किंवा नाही हे पहाण्याचे व वापर केला जात नसल्यास, सदर कार्यालयाकडे त्याबाबतीत पाठपुरावा करण्याचे काम संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे शासन परिपत्रक क्रमांक–मभावा–१०९१/१२८/२०–ब, दिनांक १७ मे, १९९१ अन्वये सोपविण्यात आले आहे. शासनाच्या मराठीकरणाच्या धोरणानुसार, शासन निर्णय, क्रमांक–मभावा–१०८७/१०४७/प्र. क्र.२/८७–२०–ब, दिनांक २९ जुलै, १९८९ अनुसार महाराष्ट्रातील विभागीय व जिल्हास्तरावरील राज्य शासकीय कार्यालयांतील कामकाजात राजभाषा मराठीचा वापर काटेकोरपणे केला जातो किंवा नाही याची पाहणी करण्याचे काम आता संचालनालयाकडे सोपविण्यात आले असून त्यानुसार विभागीय व जिल्हास्तरावरील कार्यालयांची तपासणी त्या संचालनालयाकडून वेळोवेळी करण्यात येते. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयांची तपासणी करणेबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मभावा–१०९१/१२८/२०–ब, दिनांक १७ मे, १९९१ मधील आदेशानुसार जिल्हाधिकारी आवश्यक ती कार्यवाही करतात किंवा नाही ? याबाबत आता संचालनालयाकडे

[illegible] निर्णय शासनाने घेतला आहे. त्याप्रमाणे शाखा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उचित कार्यवाही करावी व तपासणी अहवालात त्यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी पाठपुरावा करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[अ. [illegible] आम्बेरकर]
शासनाचे उपसचिव.

प्रत –

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी,
शाखा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
निवड नस्ती.

[illegible]

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : मराधा-१०९५/६१२/प्र.क्र.३०/९६/१०अ,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १० सप्टेंबर १९९६.

वाचा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मराधा-१०९१/१२८/१०अ, दिनांक १० मे १९९१.

: प रि प त्र क :

शासन व्यवहारात मराठीचा वापर वाढत असल्याच्या धोरणानुसार व केंद्र शासनाच्या नियमाचा सुधारणेनुसार महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या कार्यालयामधून व प्राधिकरणामधून जनतेच्या माहितीसाठी लागणारे नामफलक, सूचनाफलक, पत्रव्यवहार हिंदी व इंग्रजी भाषेत मराठी भाषेबरोबर वापर केला जातो किंवा वापरावे असे व मराठी भाषेचा वापर केला जात नसल्यास संबंधित कार्यालयाचे स्वतंत्र पाठपुरावा करण्याचे काम कसोशीने व्हावे म्हणून केलेल्या उपरोक्त दिनांक १० मे १९९१ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी सोपविण्यात आलेले आहे. तथापि केंद्र शासनाच्या दिनांक १८.६.१९७७ व दिनांक २६.२.१९८४ च्या आदेशातील नियमाचा सुधारणेनुसार केंद्र शासनाच्या/कार्यालयामधून/प्राधिकरणामधून पूर्वीचे अधिसूचनेनुसार केली जात नाही असे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन अशा दुबळ्या पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. उपरोक्त आदेशातील सूचनाविरोध शासनाच्या गृहमंत्रालयाच्या क्रमांक २/८/६०-रोराप्र, दिनांक २०.४.१९६० (सूत्र जोडली आहे) च्या अधिसूचनेमध्ये निर्धारित केलेल्या राष्ट्रपतींच्या आदेशातील परिच्छेद ४(३) नुसार केंद्र शासनाच्या स्थानिक कार्यालयातील अंतर्गत व्यवहारात इंग्रजीबरोबरच हिंदी भाषेचा तोंड जनतेशी व्यवहार करताना प्रादेशिक भाषेचा वापर करण्याचा पाठपुरावा आदेशित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या क्रमांक ७/९/६२-बी एल, दिनांक २५.२.१९८४ च्या ज्ञापनान्वये [सूत्र जोडली आहे] स्थानिक जनतेच्या सोयीसाठी लागणारे विविध नमुने व निवेदने साहित्य [उदा. मनीऑर्डर फॉर्म व इत्यादीचे इतर नमुने प्रादेशिक भाषेत मागून घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

३. त्याअनुषंगाने दिनांक १८.६.१९७७ व दिनांक २६.२.१९८४ च्या आदेशान्वये [सूत्र जोडली आहे] केंद्र शासनाच्या कार्यालयातून/प्राधिकरणामधून नामफलक, सूचनाफलक

[क्र. मरा. क.]

:: २ ::

[illegible] मराठीशिवाय प्रादेशिक भाषेचा वापर करण्याबाबत [illegible] केलेला आलेला आहेत. हेच शासनाच्या [illegible] [illegible] ७०,
[illegible] २५.२.९८, [illegible] १८.९.१९९७ व [illegible] [illegible] राज्यातील [illegible] हेच शासनाच्या कार्यालयात प्रादेशिक भाषा मराठीचा पूर्णपणे वापर करण्याबाबत काटेकोर कार्यक्रम आखून त्रोच हेच शासनाच्या सर्व कार्यालयांची कामकाज फक्त मराठी भाषेचा वापर करण्यात येत असल्याबाबतचा अहवाल दिनांक ३०.९.१९९८ पूर्वी पाठविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(वि.ज.बन्सोड)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी,
कोषागार संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
जिल्हा नगरी.

[illegible]

[illegible]

[illegible]

परिपत्रक

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

([illegible])
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य,

प्रति,
[illegible]

मुख्य मंत्री यांचे सचिव.
उप मुख्य मंत्री यांचे सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खासगी सचिव/वैयक्तिक सहायक.
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई शाखा, मुंबई.(सचिव)
प्रबंधक, उच्च न्यायालय, औरंगाबाद शाखा, मुंबई.(सचिव)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
प्रबंधक, प्रोव्हिडंट फंड व इतर लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व हक्कदारी), मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
संचालक, शिक्षण अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभागातील अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
महाराष्ट्र प्रशासन विभागातील सर्व कार्यालये.
निवड नस्ती.

[illegible]
[illegible] पाठवावे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन शुद्धिपत्रक क्रमांक: मशासा-२००६/१०१९/प्र.क्र.७३/०६/२००६,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: १४/३/२००७.

शुद्धीपत्रक

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: मशासा-२००६/१०१९/प्र.क्र.७३/०६/२००६, दिनांक २९/९/२००६ या परिपत्रकात [illegible] करण्यास येत [illegible] शासन मान्य [illegible] न्यायालयांचे [illegible] येणारे [illegible] मराठीतून दाखल करण्यात यावा या परिपत्रकाच्या [illegible] विषयाचे दुसऱ्या ओळीत कृष्ण न्यायालयांचे या ऐवजी "जिल्हा [illegible] दुय्यम न्यायालय" असे वाचावे.

वरील परिपत्रकातील मुद्दा क्र. परिच्छेदातील शब्दांचे दुसऱ्या ओळीत "शासनाकडून दुय्यम न्यायालयात दाखल करण्यात येणारे दावे हे मराठीतून दाखल करण्यात यावे" या ऐवजी "शासनाकडून जिल्हास्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्यात येणारे दावे हे मराठीतून दाखल करावयात यावेत." असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.ना. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

[illegible] सचिव,
[illegible] सचिव,
[illegible]

सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खासगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्यमंत्री यांचे सचिव, मुख्य सचिव/प्रधान सचिव सचिव,
प्रबंधक, मूल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (पत्राने)
प्रधान लोकआयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई (पत्राने),
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
अधिवक्ता व लेखा परीक्षक, मुंबई,
निवाडी समिती अधिकारी,
भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख,
कार्यालय प्रमुखांचे विभागातील सर्व कार्यालये,
निवड नस्ती (फाईल नस्ती).

मराठी भाषा भवनचे मुख्य केंद्र दक्षिण मुंबई
किंवा वांद्रा-कुर्ला दसाहत परिसरामध्ये व
उपकेंद्र ऐरोली, नवी मुंबई येथे बांधण्यास
परवानगी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांकः मभाम-२०१६/प्र.क्र.१२८/भाषा-१, (भाग-२)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५ मार्च, २०१८.

वाचा :

१) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक : मभाम-२०१३/प्र.क्र.४०/भाषा-२, दि. १६.०८.२०१३.
२) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक : मभाम-२०१३/प्र.क्र.४०/भाषा-२, दि. ३१.०१.२०१४.
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक : जमीन-२५१३/प्र.क्र.९२/ज-२, दि. २३.१०.२०१३.
४) महसूल व वन विभाग शासन शुध्दिपत्रक क्रमांक : जमीन-२५१३/प्र.क्र.९२/ज-२, दि. १५.०३.२०१४.
५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे पत्र क्र.सीएसएलआर/एसडीएलआर-१/टे-२/फोर्ट/२०१५/५५७७, दि.२४.०३.२०१५.
६) सिडको महामंडळाचे पत्र क्र. सिडको/सातेवि/२०१८/१२०४, दि.०८.०१.२०१८.

प्रस्तावना :

मराठी भाषेचा विकास व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाने २०११ पासून स्वतंत्र मराठी भाषा विभाग सुरू केला आहे. या विभागाच्या अखत्यारित (१) भाषा संचालनालय, मुंबई (२) राज्य मराठी विकास संस्था, मुंबई (३) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (४) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई ही चार कार्यालये कार्यरत आहेत. सध्या ही कार्यालये मुंबईत विविध ठिकाणी कार्यरत असून या कार्यालयांच्या उपक्रमांमध्ये व कामामध्ये समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये एका इमारतीत असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन दि. १०.०४.२०१३ च्या तत्कालीन मंत्रिमंडळाच्या बैठकीत रंगभवन, धोबीतलाव, मुंबई या जागेत इमारत बांधण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ मध्ये नमूद केलेल्या दि. १६.०८.२०१३ च्या शासन निर्णयानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. यासंदर्भात रंगभवन, धोबीतलाव, मुंबई येथील खुल्या नाट्यगृहाची जागा मराठी भाषा विभागास हस्तांतरित करून या जागेची ताबा पावती मराठी भाषा विभागाच्या नावे करण्यास जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी संदर्भ क्रमांक ५ च्या पत्रान्वये मान्यता दिली होती. तथापि, सदर जागेवर वारसा जपणूक समितीने (Heritage Committee) आक्षेप घेतल्याने मराठी भाषा भवनचे नियोजित बांधकाम करणे शक्य झाले नाही. त्यामुळे मराठी भाषा विभागाची क्षेत्रीय कार्यालये व त्याअंतर्गत सुरू असलेले विविध उपक्रम

याकरीता पर्यायी जागेची निवड करण्याकरीता पुढील मुद्यांवर धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

१) रंगभवन धोबीतलाव येथे "भाषा भवन" या उद्दिष्टाकरीता नियोजित इमारतीचे बांधकाम कार्यान्वित होऊ शकत नसल्याने यापूर्वी यासंबंधित घेतलेले धोरणात्मक निर्णय रद्द करणे व ही जागा महसूल व वन विभागाला प्रत्यार्पित करणे.

२) मुंबई परिसरात भाषा भवन मुख्य केंद्र उभारणी करण्याकरीता पर्यायी जागेचा शोध घेणे.

३) भाषा विभागाचे विविध कार्यक्रम / उपक्रम / संशोधन या कामांची तातडीची गरज विचारात घेता सिडको महामंडळाने मंजूर केलेल्या जागेत भाषा भवन उपकेंद्र उभारण्यास मंजूरी देणे.

उपरोक्त बाबींवर शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:

रंगभवन ही जागा वारसा जपणूक क्षेत्रातील असल्याने या जागेवर मराठी भाषा भवनाची इमारत बांधण्याचा नियोजित प्रस्ताव कार्यान्वित होऊ शकत नाही ही बाब आता स्पष्ट झाली असल्याने तत्कालीन मंत्रिमंडळाने दि. १०.०७.२०१३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला धोरणात्मक निर्णय रद्द करण्यात येत असून त्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश अधिक्रमित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. यापूर्वी महसूल व वन विभागाकडून मराठी भाषा विभागाच्या इमारत बांधकामाकरीता फोर्ट महसूल विभागातील भूकर क्रमांक १४६९, रंगभवन, धोबीतलाव, मुंबई येथील जागा हस्तांतरित करण्यात आली होती. तथापि, हा मुळ प्रस्ताव आता रद्द करण्यात येत असल्याने संदर्भ क्र. ३, ४ व ५ अन्वये या विभागास वाटप करण्यात आलेली जमीन महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

३. मराठी भाषा विकास, संवर्धनाकरीता विविध भाषिक कार्यक्रम /संशोधन / प्रकल्प या उपक्रमांची तातडीची गरज विचारात घेता मराठी भाषा विभागाकडून सिडको महामंडळाकडे पर्यायी जागेची विचारणा करण्यात आली होती. यासंदर्भात सिडको महामंडळाने ऐरोली, नवी मुंबई येथील भूखंड क्रमांक ६अ, क्षेत्रफळ २००० चौ.मी., सेक्टर-१३, हा भूखंड मराठी भाषा विभागाच्या उपकेंद्राकरीता वाटप करण्याच्या प्रस्तावास संचालक मंडळाने दि.२३.०९.२०१६ च्या सभेमध्ये मंजुरी दिली आहे. त्यानुसार सदर भूखंडक्षेत्र दिर्घकालीन भाडेपट्टीने सिडको महामंडळाकडून ताब्यात घेऊन त्याठिकाणी भाषा भवन उपकेंद्राचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. मराठी भाषा विकास व संवर्धनाकरीता दक्षिण मुंबई ते वांद्रा-कुर्ला संकुल या परिसरात मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय कार्यालयांची उभारणी करण्याच्या अनुषंगाने योग्य जागेची निवड करण्याकरीता मा. मंत्री, (मराठी भाषा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन याबाबतचा निर्णय घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. समितीची रचना व कार्यकक्षा याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. मराठी भाषा उपकेंद्राकरीता सिडको महामंडळाने मंजूर केलेल्या भूखंड क्र.६अ, अंदाजे क्षेत्रफळ २००० चौ. मी., सेक्टर १३, ऐरोली, नवी मुंबई येथील सदर भूखंड दिर्घकालीन भाडेपट्टी तत्त्वावर घेण्याकरीता विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

६. सिडको महामंडळाकडून करविण्यात आल्याप्रमाणे प्रचलित दरानुसार भूखंड भाडेपट्टीचे एकूण शुल्क रू. ३,६३,४८,९२०/- (अक्षरी रू. तीन कोटी त्रेसष्ट लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे वीस फक्त) इतकी रक्कम सिडको महामंडळाकडे अदा करावयाची आहे. या रकमेपैकी १०% इसारा रक्कम व भाडेपट्टी शुल्क मिळून एकूण रू. २,४०,००,०००/- (अक्षरी दोन कोटी चाळीस लाख फक्त) इतकी रक्कम सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात विभागाकडील मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात येत आहे. तसेच भाडेपट्टी शुल्काची उर्वरित रक्कम सन २०१८-१९ या आगामी वित्तीय वर्षात मंजूर होणाऱ्या वित्तीय अनुदानातून सिडको महामंडळास प्रदान करण्यास व भाषा भवन इमारतीच्या बांधकाम आराखड्यास मंजूरी दिल्यानंतर बांधकामाकरीता विहित रक्कम पुढील आर्थिक वर्षात टप्प्याटप्प्याने मंजूर करण्याकरीता आवश्यक तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. सदर खर्च मागणी क्रमांक डीएएफ -४, मुख्य लेखाशीर्ष ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, (०१), कार्यालयीन इमारती, (०५१) बांधकाम, (००) (०१) मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करणे, ५३ मोठी बांधकामे, (४०५९ २५३२) या अंतर्गत वेळोवेळी मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०५१४२४१८०२३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna
Arvind
Gawde

(अपर्णा अ. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर,
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई, नागपूर,
३) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०) सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११) विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,

१२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३) व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको), मुंबई,
१४) मुख्य सामाजिक सेवा अधिकारी, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४,
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६) मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई,
१७) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई,
१८) सर्व अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२१) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२२) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२३) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
२४) निवड नस्ती (भाषा - १)

शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक मभावा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०७ मे, २०१८

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा - १०७९ /२८, दि. २२.०१.१९७९
२) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०८०/प्र.क्र.५४/२०, दि. १८.०५.१९८२
३) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०८५/प्र.क्र.९५/२०, दि. ०४.०६.१९८५
४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मभावा-१०८६/४३२/प्र.क्र.१६१/८६/वीस-ब, दि. १८.०७.१९८६
५) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१०/प्र.क्र.७५/वीस-ब, दि. १४.०७.२०१०
६) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०११/प्र.क्र ७८/२०११/भाषा-२, दि. १०.०५.२०१२.
७) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभावा-१०१३/५७/८२/प्र.क्र. १/२०१३/भाषा-२, दि. २९.०१.२०१३
८) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभावा-२०१५/प्र.क्र३६/भाषा-२, दि. २८.०४.२०१५ .

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये दि. २६, जानेवारी, १९६५ पासून महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला. तसेच सदर अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम १९६६, दि. ३० एप्रिल, १९६६ च्या अधिसूचनेन्वये अंमलात आले आहेत. सदर नियमात नमूद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजनांकरिता मराठी भाषा वापरणे दि. ०१ मे, १९६६ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभाग/राज्य शासकीय कार्यालये / शासन अंगीकृत व्यवसाय (मंडळे/ महामंडळे/प्राधिकरणे) / शासकीय उपक्रम यांमधील व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांनी वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कामकाजासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके, शासन निर्णय, आदेश काढून शासनाच्या भाषाविषयक धोरणाबाबत निदेश देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षापर्यंत म्हणजेच दि. ०१ मे, १९८५ पर्यंत वर्जित प्रयोजने वगळता संपूर्ण शासकीय

कामकाज मराठी भाषेतून करावे, असे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. तथापि, अजूनही राज्य शासनाच्या सर्व कार्यालयात मराठी भाषेचा वापर १०० % केला जात नसल्याने, राज्य मंत्रिमंडळामध्ये याबाबत झालेल्या चर्चेमध्ये शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात शासनस्तरावरुन वेळोवेळी दिलेल्या सूचना सर्व विभागांना पुन:श्च देण्याबाबत निदेश दिले आहेत. शासकीय कामकाजातील मराठीच्या वापराबाबत विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये वारंवार प्रश्न, सूचना, चर्चा उपस्थित केल्या जातात. तसेच या संदर्भात वारंवार तक्रार अर्ज आपले सरकार, माहितीचे अधिकार इत्यादि माध्यमातून मोठया प्रमाणावर प्राप्त होत आहेत. त्यामुळे शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात आजतागायत शासन स्तरावरुन निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके, शासन निर्णय इत्यादिंतील तरतुदी सर्व विभागांच्या पुन:श्च निदर्शनास आणण्याच्या अनुषंगाने सदर तरतुदी एकत्रितरित्या सर्व विभागांच्या निदर्शनास आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय व राज्यशासनाची सर्व कार्यालये यांच्यामार्फत वर्जित प्रयोजने वगळता सर्वसामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठी भाषेतून करणे अनिवार्य आहे.याबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय,परिपत्रके याव्दारे यापूर्वीच सूचना दिल्या आहेत. तसेच आता राजभाषा मराठीतून कामकाज सक्षमपणे व अधिकाधिक परिणामकारकरित्या करण्याकरिता राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सन्माननीय सदस्यांचा समावेश असलेल्या "मराठी भाषा समिती" ची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या कामकाजाला प्रारंभ झाला असून, शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये राजभाषा मराठीच्या वापराचा आढावा घेऊन राज्य शासनाला सूचना देणे आणि उपाययोजना सुचविणे हा समितीचा मुख्य उद्देश आहे. यापुढे सदर समितीच्या कार्यक्षेत्रानुसार समितीकडून राज्यशासनाच्या कार्यालयांची पाहणी करण्यात येईल व समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल. समितीने विभागांतर्गत केलेल्या प्राथमिक तपासणीनंतर पुढील सूचना केल्या आहेत :-

अ) प्रत्येक विभागात एक "मराठी भाषा दक्षता अधिकारी" नेमावा. हा अधिकारी आपल्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर होतो किंवा कसे याची तपासणी करील. (सदर मराठी भाषा अधिकाऱ्याची नेमणूक विभागांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांमधून करुन त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवावी.)

ब) प्रत्येक विभागाने आपल्या विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची नावे मराठी भाषेत असल्याची दक्षता घ्यावी.

२. राज्य शासनांतर्गत सर्व कार्यालयांनी प्रशासनातील मराठी वापराच्या कामास गती देण्याच्या दृष्टीने विधानमंडळातील मराठी भाषा समितीच्या उपरोक्त सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करावी. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार राजभाषा मराठीचा प्रशासन स्तरावरील वापर वृद्धिंगत व्हावा याकरिता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने राज्यशासनांतर्गत सर्व कार्यालये/महामंडळे यांना प्रशासनिक व्यवहारात मराठीचा सक्षमपणे वापर करण्याकरिता पुढील सूचना पुन:श्च देण्यात येत आहेत.

सर्वसाधारण सूचना

१) शासनाकडून वेगवेगळया योजना राबविल्या जातात. सदर शासकीय योजनांची माहिती जनसामान्यांना देताना वा त्यासंदर्भात चर्चा करतांना तसेच दूरध्वनीवर बोलतांना सर्व संबंधित शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक आहे.

२) वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सभेत भाषण करतांना अथवा बैठकीत बोलतांना मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे.

३) मंत्रिमंडळ बैठक व वरिष्ठ स्तरावर होणाऱ्या तत्सम बैठकीत सादरीकरण (Presentation) करतांना दर्शविण्यात येणारी माहिती प्रामुख्याने मराठीतून असावी.

४) मंत्रालयीन विभागांनी व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय व इतर कार्यालयांनी सर्वसामान्य जनतेशी होणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज मराठीतून करण्याची खबरदारी घ्यावी. प्रत्येक विभागातून सर्व सामान्यांपर्यंत जाणारे सर्व नमुने, पत्रके, परवाने, इत्यादि तसेच, कार्यालयांतर्गत वापरल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या नोंदवह्या, प्रमाण नमुने, प्रपत्रे, विभागीय नियमपुस्तिका, सर्व प्रकारच्या टिप्पण्या, नस्त्या व पत्रव्यवहार यांवरील शेरे/अभिप्राय, शासनाची धोरणे, आदेश, अधिसूचना, प्रारुप नियम, शासन निर्णय, परिपत्रके, अहवाल, बैठकांची कार्यवृत्ते तसेच संकेतस्थळे, इत्यादि मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात संपूर्णपणे वापर होण्यासाठी मंत्रालयातील निरनिराळया विभागातील सचिव/मंत्री अशा वरिष्ठ स्तरावर दिले जाणारे शेरे, टिप्पण्या व आदेश जाणीवपूर्वक मराठी भाषेतून असावेत. मा. मंत्री/राज्यमंत्री यांनी आपल्याकडे येणारी सर्व प्रकरणे मराठीतून असावीत असा आग्रह धरावा.

५) कार्यालयातील नामफलकावर अथवा पत्रव्यवहारावर एखादी व्यक्ती/अधिकारी/कर्मचारी यांचे नाव मराठी भाषेत लिहिताना इंग्रजी आद्याक्षरांचे मराठीत भाषांतर न करता ती मराठीतूनच लिहावीत. (उदा :- एच.एन.आपटे असे न लिहिता ह.ना. आपटे असे लिहावे.) पदनामाचा उल्लेखही मराठी भाषेत असावा. तसेच, अधिकारी/कर्मचारी यांनी मराठी भाषेतील टिप्पणी, आदेश, शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना व इतर पत्रव्यवहार यांवर रोमन लिपीत इंग्रजीमध्ये सह्या न करता देवनागरी लिपीत मराठीत सह्या कराव्यात.

६) शासकीय कार्यालयातून लावलेल्या पाटया, फलक मराठीतून असावेत, तसेच शासकीय कामकाजात पत्रव्यवहारामध्ये/निमंत्रणपत्रिकेमध्ये आणि इतर बाबींसंदर्भात रेल्वे स्थानके, गावांची नावे यांच्या नावाचा उल्लेख करताना मराठी भाषेत देवनागरी लिपीत नावे लिहावीत. (उदा :- बांद्रा असे नाव न वापरता वांद्रे हे मूळ मराठी नाव वापरावे. सायन असे नाव न वापरता शीव हे मूळ मराठी नाव वापरावे.)

७) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्याअंतर्गत असलेली संचालनालये, महामंडळे, शासकीय उपक्रम यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या समारंभांची निमंत्रणे मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. क्वचित प्रसंगी आवश्यक असल्यास, मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेतून निमंत्रण पत्रिका असावी.

८) राज्य शासकीय कार्यालयातून दिल्या जाणाऱ्या जाहिराती व निविदा किमान दोन मराठी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच, मराठी वृत्तपत्रात दिल्या जाणाऱ्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांच्या आणि मंडळांच्या व महामंडळांच्या जाहिराती व निविदा मराठी भाषेत प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

९) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षा तसेच पदभरतीसाठी शासकीय व निमशासकीय कार्यालयांमार्फत आणि मंडळांमार्फत व महामंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा मराठीतून घेणे आवश्यक आहे. जर काही परीक्षार्थ्यांनी इंग्रजीतून उत्तर देण्याची परवानगी मागीतली असेल तर अशी परवानगी प्रत्येक बाबतीत गुणावगुणांचा विचार करुन विभागप्रमुखांना देता येईल.

१०) राज्य शासनाच्या वतीने नेमण्यात आलेल्या शासकीय समित्या व अभ्यासगट (वर्जित प्रयोजनांतर्गत येणाऱ्या समित्या व अभ्यासगट वगळून) यांनी त्यांचे कामकाज काटेकोरपणे मराठी भाषेतून करावे व आपला अहवाल मराठी भाषेत शासनास सादर करावा.

११) शासनाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाणारी माहिती मराठी भाषेतून असावी. तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर विभागाची माहिती सर्वांच्या निदर्शनास आणणे आवश्यक वाटत असल्यास संकेतस्थळावर ती केवळ इंग्रजी भाषेत न ठेवता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत माहिती प्रसिद्ध करावी.

१२) वर्जित प्रयोजने वगळता, अन्य सर्व प्रकरणी शासनातर्फे जिल्हास्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्यात येणारे दावे मराठी भाषेतून दाखल करण्यात यावेत.

१३) प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत वाहतुक पोलीस यांच्याकडून वाहतुकीचे नियम तोडल्यानंतर देण्यात येणाऱ्या दंड वसूलीच्या पावत्या, विविध परवाने तसेच शासकीय उद्याने /पर्यटन स्थळे इत्यादी ठिकाणी आकरण्यात येणाऱ्या प्रवेश शुल्काच्या पावत्या प्राथम्याने मराठी भाषेतून देण्याबाबत संबंधित विभागाने दक्षता घ्यावी.

अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत सूचना :-

१) टिप्पणी/पत्रलेखन याकरिता प्रमाणभाषेचा योग्य वापर करण्याच्या दृष्टीने, राज्य प्रशिक्षण धोरणानुसार अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या सेवाप्रवेशोत्तर पायाभूत/उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत भाषेबाबतच्या प्रशिक्षणाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात यावा.

२) प्रस्तुत कार्यालयीन प्रशिक्षणानंतर घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील प्रश्न मराठीतून असावेत. तसेच उत्तरेही मराठीतूनच लिहिली जातील याकडे प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची आखणी करावी.

माहिती आणि तंत्रज्ञान विभागाशी संबंधित सूचना :-

१) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन माहिती आणि तंत्रज्ञान विभागाने जनसामान्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहिती अधिकार, आपले सरकार, ई-निविदा इत्यादि ऑनलाईन सेवा/पोर्टल मराठी भाषेत उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२) शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ई-ऑफिस अंतर्गत रजा (ई-लिव्ह), हजेरीपत्रक (बायोमेट्रीक) इत्यादि संदर्भात उपलब्ध केलेल्या सुविधा मराठीतून उपलब्ध असाव्यात.

३) धारिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (फाईल मॅनेजमेंट सिस्टिम) धारिका अपलोड करताना तिचा विषय व क्रमांक इंग्रजीमध्ये करावा लागतो. सदर सुविधा मराठी भाषेत उपलब्ध असणे आवश्यक आहे.

३. शासन अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने दैनंदिन शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करणे सोपे जावे व मराठी भाषा शासन व्यवहाराची भाषा म्हणून प्रशासनात वापरण्याकरिता मराठी भाषा विभागांतर्गत कार्यालयांकडून प्रकाशित केलेल्या विविध शब्दकोश/परिभाषा कोश यासारख्या साधनसामुग्रीची सविस्तर माहिती व त्याच्या उपलब्धते बाबतचा तपशील सोबतच्या प्रपत्र १ ते २ मध्ये नमूद केला आहे. अभ्यासकांनी तसेच अधिकारी/कर्मचारी यांनी याचा यथायोग्य वापर करावा.

४. शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर सुरु होऊन ५० वर्षांहून अधिक कालावधी झाला असला तरी, अद्यापही काही विभागांकडून टिप्पण्या, शासन निर्णय, परिपत्रके इंग्रजीतून तयार केली जातात, अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षण काळातील व सेवाप्रवेशोत्तर परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांमध्येही इंग्रजीचा वापर करण्यात येतो असे निदर्शनास येत आहे. प्रत्येक विभागामार्फत १०० % कामकाज मराठीतच केले जाणे अपेक्षित आहे. भाषा संचालनालयाकडून वारंवार सूचना देऊनही वर्जित प्रयोजनात न मोडणाऱ्या कामकाजातही संयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यासंदर्भात जे अधिकारी / कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत यापूर्वीच दि. १८ जुलै, १९८६ च्या (प्रपत्र-३) शासन निर्णयान्वये सविस्तर आदेश देण्यात आले आहेत. (सुलभ संदर्भासाठी सोबत शासन निर्णयाची प्रत जोडण्यात येत आहे.) तरी सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०७१७३५०८६०३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Bhushan Ashok Gagrani
Date: 2018.05.10 15:43:24 +05'30'

(भूषण गगराणी)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, मराठी भाषा यांचे स्वीय सहायक

५) मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
६) सर्व सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ (विधानपरिषद/विधानसभा), मुंबई
७) समिती प्रमुख, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ , विधानभवन, मुंबई
८) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०) सर्व विभागीय आयुक्त
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व मंत्रालयीन विभाग, यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख, न्यायाधिकरणे, प्राधिकरणे, महामंडळे इ. यांच्या निदर्शनास आणावे.
१३) निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने)
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने)
१६) प्रबंधक, लोकायुक्त/उप लोकायुक्त, मुंबई (पत्राने)
१७) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई (पत्राने)
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/विधानपरिषद), मुंबई (पत्राने)
२०) राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई (पत्राने)
२१) सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई (पत्राने)
२२) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२३) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२७) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई
२८) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
२९) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
३०) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
३१) निवडनस्ती भाषा-२.

शासन परिपत्रक क्र. मभाषा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२, दि. ०७ मे, २०१८ सोबतचे सहपत्र

प्रपत्र १

मराठी भाषा विभागांतर्गत कार्यालयांनी मराठीच्या प्रशासनिक वापरासाठी प्रकाशित केलेले विविध शब्दकोश व परिभाषा कोश व अन्य प्रकाशने यांची यादी :-

अ) भाषा संचालनालय, मुंबई

अ.क्र.	प्रकाशनाचे नाव	वैशिष्ट्ये
१.	शासन व्यवहार शब्दावली (मराठी x इंग्रजी)	सोबतची सर्व प्रकाशने शासकीय मुद्रणालयात उपलब्ध आहेत. तसेच भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच अ.क्र. १ ते ४ येथील प्रकाशने ही दैनंदिन प्रशासनात वारंवार लागणारी प्रकाशने आता भ्रमणध्वनी उपयोजक (मोबाईल ॲप) च्या स्वरुपात उपलब्ध असून, हे उपयोजक https://play.google.stre/apps/details.id-gov.maharashtra.shabedkoshapp या दुव्यावर मोफत उपलब्ध आहे. हे उपयोजक आपल्या भ्रमणध्वनीवर स्थापित करुन आपल्याला प्रशासनिक वापरातील मराठी - इंग्रजी किंवा इंग्रजी - मराठी असे शब्द तात्काळ मिळू शकतात. विविध विषय/तांत्रिक संकल्पना याकरिता विविध विषयांच्या परिभाषा कोशाची मदत घेता येऊ शकते. सदर सर्व पुस्तके/कोश शासकीय मुद्रणालयांमध्ये उपलब्ध आहेत.
२.	प्रशासन वाक्प्रयोग	
३.	कार्यदर्शिका	
४.	न्याय व्यवहार कोश	
५.	प्रशासनिक लेखन	
६.	प्रमाणलेखन नियमावली	
७.	वित्तीय शब्दावली	
८.	पदनाम कोश	
९.	राजभाषा परिचय	
१०.	राजभाषा परिचय (कार्यरुप व्याकरण)	
११.	भारताचे संविधान (इंग्रजी/मराठीसह एकत्रित)	
१२.	मराठी लघुलेखन मार्गदर्शिका	
	विविध विषयांचे परिभाषाकोश	
१३.	ग्रंथालय परिभाषा कोश	
१४.	गणितशास्त्र परिभाषा कोश	
१५.	समाजशास्त्र परिभाषा कोश	
१६.	तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश	
१७.	वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश	
१८.	रसायनशास्त्र परिभाषा कोश	
१९.	भूशास्त्र परिभाषा कोश	
२०.	शारीर परिभाषा कोश	
२१.	शिक्षणशास्त्र परिभाषा कोश	
२२.	यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश	
२३.	स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश	
२४.	भौतिकशास्त्र परिभाषा कोश	
२५.	विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश	

२६.	कृषिशास्त्र परिभाषा कोश	
२७.	जीवशास्त्र परिभाषा कोश	
२८.	शरीरक्रीया शास्त्र परिभाषा कोश	
२९.	राज्यशास्त्र परिभाषा कोश	
३०.	साहित्य समीक्षा परिभाषा कोश	
३१.	लोकप्रशासन परिभाषा कोश	
३२.	अर्थशास्त्र परिभाषा कोश	
३३.	धातुशास्त्र परिभाषा कोश	
३४.	मानसशास्त्र परिभाषा कोश	
३५.	व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश	
३६.	संख्याशास्त्र परिभाषा कोश	
३७.	औषधशास्त्र परिभाषा कोश	
३८.	भाषा विज्ञान व वाङ्मयविद्या परिभाषा कोश	
३९.	भूगोलशास्त्र परिभाषा कोश	
४०.	विकृतिशास्त्र पारिभाषिक शब्दावली	
४१.	दृकश्रव्यविद्या परिभाषा कोश	
४२.	न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश	
४३.	भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली (मराठी x इंग्रजी)	
४४.	कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली (मराठी x इंग्रजी)	

ब) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ :-

अ.क्र.	प्रकाशनाचे नाव	वैशिष्ट्ये
१.	शासन शब्दकोश:- पहिला खंड (अ ते औ)	या कार्यालयाकडून प्रामुख्याने विविध विषयांचे वाङ्मयीन प्रकल्प हाती घेण्यात येतात. मंडळाने भाषाप्रेमी/ अभ्यासक यांच्या दैनंदिन वापरासाठी मराठी शब्दकोशाचे १ ते ६ खंड प्रसिध्द केले आहेत. हे खंड शासकीय मुद्रणालयात उपलब्ध आहेत.
२.	शासन शब्दकोश:- दुसरा खंड (क ते ङ)	
३.	शासन शब्दकोश:- तिसरा खंड (च ते ञ आणि ट ते ण)	
४.	शासन शब्दकोश:- चौथा खंड (त ते न)	
५.	शासन शब्दकोश:- पाचवा खंड (प ते म)	
६.	शासन शब्दकोश:- सहावा खंड (य ते ह)	

क) महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ :-

अ.क्र.	प्रकाशनाचे नाव	वैशिष्ट्ये
	मराठी विश्वकोश (मराठी वर्णमालेनुसार "अ ते ज्ञ" पर्यंत एकुण २० खंड)	एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकाप्रमाणे सर्व विषयातील ज्ञान मराठीत आणण्यासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २ जानेवारी, १९६२ पासून विश्वकोशाचे काम सुरु करण्यात आले. वाचकांसाठी हा उपयुक्त संदर्भग्रंथ असून याचे एकूण २० खंड प्रसिध्द करण्यात आले आहेत. लिखीत खंडाची विक्री शासकिय मुद्रणालयाव्दारे होत आहे. तसेच आता हे सर्व खंड संकेतस्थळ व भ्रमणध्वनी उपयोजकाच्या (मोबाईल ॲप) स्वरुपात मोफत उपलब्ध आहेत. हे उपयोजक गुगल प्ले स्टोअर वरुन विनामुल्य स्थापित (डाऊनलोड) करता येईल. हे उपयोजक ॲन्ड्रॉइड, आय फोन या मोबाईल प्रणालीमध्ये वापरता येते. हे उपयोजक (ॲप) सर्वसामान्य वाचक / प्रशासनातील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरीता उपयुक्त आहे.

ड) राज्य मराठी विकास संस्था:-

राज्य मराठी विकास संस्था या कार्यालयाकडुन सर्व राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्तरावरील भाषा विज्ञान विषयक उपक्रम हाताळण्यात येतात. या कार्यालयाने मराठी भाषेतून अनेक संशोधनात्मक लेखन प्रकल्प पूर्ण केले. भाषा विषयक पुढील पुस्तके संस्थेने प्रकाशित केली आहेत.

अ.क्र.	प्रकाशनाचे नाव	संपादन	वैशिष्ट्ये
१.	शालेय मराठी शब्दकोश	श्री. वसंत आबाजी डहाके व श्री. गिरीश पतके	भाषा लेखनासाठी संस्थेची प्रस्तुत प्रकाशने अतिशय उपयुक्त असल्याने याचा लाभ सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी घ्यावा. सदर पुस्तके संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. **संस्थेचा पत्ता** राज्य मराठी विकास संस्था, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय इमारत, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१
२.	मराठी लेखन मार्गदर्शिका	श्रीमती मासिन शेख	

प्रशासन परिपत्रक क्र. मपाशा-२०१८/प्र.क्र.४४/भाग-२, दि. ०७ मे, २०१८ सोबतचे सहपत्र क्रमांक-२

संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका

प्रशासनात वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून परिपत्रांत सहजपणे व वारंवार इंग्रजीमध्ये लिहिलेल्या जलद शेऱ्यांच्या मराठी पर्याय उपलब्ध करण्याच्या हेतूने मंत्र संचालनालयाने संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका तयार केली आहे. सदर शेरे पुस्तिकेमध्ये उपलब्ध करण्यात येत आहेत.

Action as at 'A' above	वरील 'अ' प्रमाणे कार्यवाही करावी	approved as per remarks in the margin	समासातील शेऱ्यांनुसार मान्य
action may be taken as proposed	प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी	approved as proposed	प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्य
action taken on	— वर कार्यवाही केली	approved sanctn (A.S.)	मान्य नमुना
additional charge	अतिरिक्त कार्यभार	arbitrary action	मनोधर्मानुसार कारवाई
adjustment by transfer	बदलीद्वारे समायोजन	area rectification	क्षेत्र दुरुस्ती
administrative approval	प्रशासकीय मान्यता (प्र. मा.)	as a matter of fact	वस्तुतः
administrative approval may be obtained	प्रशासकीय मान्यता मिळवण्यात यावी	as a special case	खास बाब म्हणून
administrative improvement, composition and procedure	प्रशासनीय सुधारणा, रचना व कार्यपद्धती	as a temporary measure	तात्पुरता उपाय म्हणून
administrative information	प्रशासकीय माहिती	as early as possible	शक्यतो लवकर
admissible under rule	नियमानुसार अनुज्ञेय	as far as possible & convenient	शक्य आणि सोयीस्कर असेल त्याप्रमाणे
admit an appeal	अपील दाखल करून घेणे	as far as practicable	व्यवहार्य असेल तितपत
after hearing the person concerned	संबंधित व्यक्तीचे म्हणणे ऐकल्यानंतर	as proposed	प्रस्तावित केल्याप्रमाणे
annual industrial survey	वार्षिक उद्योग पाहणी	as revised	सुधारल्याप्रमाणे
annual property return	वार्षिक मालमत्ता विवरण	as soon as	लवकरात लवकर
annual scheme	वार्षिक योजना (निधीचा विचार)	at any rate	कसेही करून
appear in person	व्यक्तीने हजर राहणे	at the earliest	लवकरात लवकर
appointment by nomination	नामनिर्देशनद्वारे नियुक्ती	at the latest	उशिरात उशिरा
appointment by promotion	बढतीद्वारे नियुक्ती	at your earliest convenience	आपल्या सोयीप्रमाणे लवकरात लवकर
appointment by selection	निवडीद्वारे नियुक्ती	audit objection	लेखापरीक्षा आक्षेप
appropriation accounts	विनियोजन लेखे	avail cases' papers	प्रलंबित प्रकरणे/ कागदपत्रे
Before due date	नियत तारखेपूर्वी	budget estimation allocation & monitoring system	अर्थसंकल्प अंदाज नियतवाटप व संनियंत्रण पद्धत
boundary rectification	हद्द दुरुस्ती	budget speech cell (B.S.C.)	अर्थसंकल्प भाषण कक्ष (अ.भा.क.)
budget estimates	कार्यक्रम अंदाजपत्रक		
Calculation register number	मोजणी नोंदवही क्रमांक	conciliation	सामंजस्य
call information & confidential	माहिती मागवून घेतलेला कागदी	confidential remarks	गोपनीय शेरे/ अभिप्राय
calling attention notice	लक्षवेधी सूचना	confidential report	गोपनीय अहवाल
case file	प्रकरण फाईल	conservative estimate	सोयीस्कर अंदाज
case number	प्रकरण क्रमांक	consider on merit	गुणवत्तेवरून विचार करणे
certification sought	प्रमाणीकरण मागितले आहे	contention is untenable	म्हणणे ग्राह्यमानीय आहे
Chief Minister Charitable Fund (C.M.C.F.))	मुख्यमंत्री सहायता निधी (मु.स.नि.)	copy forwarded for information & guidance	हा माहितीकरीता व मार्गदर्शनासाठी पाठविण्यात येत आहे

Chief Minister Secretariat (C.M.S.)	मुख्यमंत्री सचिवालय	corrected copy	सुधारलेली प्रत
circumstantial evidence	परिस्थितीजन्य पुरावा	count and survey	गणना व पाहणी
compliance report (C.R.)	अनुपालनाचे प्रतिवेदन	counter foil	खोड प्रत
compulsory retirement	सक्तीची सेवानिवृत्ति		
Date of joining	रुजू झाल्याचा दिनांक	dispense with services	सेवेतून कमी करणे
demi official letter	अर्ध शासकीय पत्र	dispense with the provision	तरतूद अमान्यपत्र नाही असे ठरवणे
Democratic Day	लोकशाही दिन	dispose of	निकालात काढणे
Departmental enquiry	विभागीय चौकशी	documentary evidence should be called for	कागदोपत्री पुरावा मागवावा
Deposit Link Insurance Scheme	ठेव संलग्न विमा योजना	done	पूर्ण झाले
derogatory statement	कमीपणा आणणारे विधान	draft for approval	मान्यतेसाठी मसुदा
detailed contingent bill	तपशीलवार आकस्मिकता देयक	draft may issue subject to approval	मान्य झाल्यास मसुदा पाठवावा
discuss by required documents	आवश्यक त्या कागदपत्रांसह चर्चा करणे	draft notification is in order	अधिसूचनेचा मसुदा नियमानुसार आहे
discuss immediately	तात्काळ चर्चा करणे	draft put up for approval	मसुदा मान्यतेसाठी प्रस्तुत
dispatch	रवाना करणे,निर्गमित करणे		
Electronic Statistical Processing Centre	इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण केंद्र	explanation be called for	खुलासा मागितल्यास बरा
elucidate the reasons	कारणे विशद करणे	explanatory note	स्पष्टीकरणात्मक टिप्पणी / टीप
entertain an application	अर्ज स्वीकारणे	ex-post facto approval/sanction	कार्यास मान्यता / मंजुरी
ephemeral roll	कायमे टिपण	expressly made know	स्पष्टपणे कळविलेले
exercise due discretion	तारतम्यबुद्धीचा वापर करणे	extension of service	सेवामुदत वाढविणे
exercise jurisdiction	क्षेत्राधिकाराचा वापर करणे	extra work	अतिरिक्त काम / कामे
Fair and equitable treatment	रास्त आणि न्याय्य वागणूक	for further action	पुढील कार्यवाहीसाठी
faulty action	सदोष कार्यवाही	for immediate effect	तात्काळ परिणामक करण्यासाठी
file closed	नस्ती बंद करण्यात यावी	for information and necessary action	नस्तीतील व आवश्यक कार्यवाहीसाठी
file in play	चालू नस्ती	for necessary action	आवश्यक कार्यवाहीसाठी
file not traceable	फाईल सापडत नाही	for onward transmission	पुढे पाठविण्यासाठी
final	शेवटचे शासन	for prompt action	सत्वर कार्यवाहीसाठी
fit and proper	योग्य व उचित	for proper action	उचित कार्यवाहीसाठी
floor space index (F.S.I.)	चटईक्षेत्र निर्देशांक	for ready reference	तात्काळ संदर्भासाठी
follow-up action	पाठपुराव्याची कार्यवाही , पाठपुराव्याची कार्यवाही	for record	अभिलेखासाठी, नोंदीसाठी
for approval	मान्यतेकरिता	for remarks	अभिप्रायासाठी
for comments	टीकाटिप्पणीसाठी	for service and return	(नोटीस) बजावून परत पाठविण्यासाठी
for consideration	विचारार्थ	for signature	स्वाक्षरीसाठी, स्वाक्षरीसाठी
for disposal	निकालात काढणे	for spot enquiry	घटनास्थळ चौकशीसाठी
for early compliance	शीघ्र अनुपालनार्थ	for such action as may be necessary	आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
for expression of opinion	मत व्यक्त करण्यासाठी , मत प्रदर्शनासाठी	for sufficient reasons	पुरेशा कारणास्तव

for favour of due consideration	योग्य विचारासाठी सादर	for suggestions	सूचना करण्यासाठी
for favour of orders	आदेशासाठी सादर	for sympathetic consideration	सहानुभूतीपूर्वक विचारासाठी
for favour of remarks	अभिप्रायासाठी सादर	forwarded for immediate compliance	तात्काळ अनुपालनाकरता रवाना
General work clerk	सर्वसाधारण कार्य लिपिक	Government Circular No. (G.C.N.)	शासन परिपत्रक क्रमांक (शा.प.क्र.)
glaring mistake	ठळकपणे चूक	Government Resolution (G.R.)	शासन निर्णय (श.नि.)
good and sufficient reason	उचित आणि पुरेसे कारण	Government Resolution No. (G.R.N.)	शासन निर्णय क्रमांक (श.नि.क्र.)
Government are pleased to order	शासनाचा आदेश आहे की		
having regard to the merits of the case	प्रकरणाचे गुणदोष लक्षात घेता	hold in abeyance	आस्थगित ठेवणे
High level Monitoring Committee	उच्चस्तरीय संनियंत्रण समिती	how the matter stands	प्रकरण कोठपर्यंत आले आहे
highly irregular	अत्यंत अनियमित		
I agree	माझी संमती आहे, मी सहमत आहे	in the near future	नजीकच्या भविष्यकाळात
I am directed to state that	आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की	in view of the above	वरील गोष्टी लक्षात घेता
I am to state that	मला असे सांगावयाचे आहे की	inconsistent statement	विसंगत कथन / निवेदन
I have satisfied myself	माझे स्वतःचे समाधान झाले आहे	inconsistent with the facts	वस्तुस्थितीशी विसंगत
I reiterate my former comments	मी आपले पूर्वीचेच मत पुन्हा नोंदवितो	increment stopped	वेतनवाढ रोखून ठेवणे
immediate action	तात्काळ कार्यवाही	in the interest of administrative convenience	प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने
immediate slip	तात्काळ पत्रक	information and public relation (I.P.R.)	माहिती व जनसंपर्क (मा. व ज.)
Implementation Officer	अंमलबजावणी अधिकारी	initial enquiry	प्राथमिक चौकशी
in a summary manner	संक्षिप्त रीतीने	inordinate delay	अवाजवी विलंब
in amplification of the orders contained in the Government Resolution	शासन निर्णयातील आदेश स्पष्ट करण्यास्तव आदेशाने	impartial modification	अंशतः फेरफार करणे
in detail	खुलासेवार, सविस्तर, विस्तारानें, तपशीलवार	inspection note	निरीक्षण टिपणी
in person	प्रत्यक्षे, व्यक्तिशः	interim reply is put up	अंतिम उत्तर प्रस्तुत केले आहे
in private	खाजगी, खाजगीरित्या	issue as amended	दुरुस्ती स्वीकारून / दुरुस्तीसह फेरसादर पाठवा
in the absence of information	माहितीच्या अभावी	issue as modified	फेरफार केलेला स्वीकारून पाठवा
in the absence of proof	पुराव्याच्या अभावी	issue as redrafted	पुन्हा टिपणीतील मसुद्याप्रमाणे पाठवा
in the due course of law	रीतसर विधिक्रमानुसार	issue today	आज पाठवा
in the first instance	सुरुवातीला, प्रथमतः, पहिल्यांदाच	it is quite evident	हे अगदी स्पष्ट/ उघड आहे
Joining date	रुजू होण्याची तारीख	judicial enquiry	न्यायिक चौकशी
joining report	रुजू झाल्याचे प्रतिवेदन	just and reasonable	न्याय्य आणि वाजवी

judgment in this case has been reserved	या प्रकरणातील न्यायनिर्णय राखून ठेवला आहे	justification for the proposal	प्रस्तावाचे समर्थन, प्रस्तावाचे औचित्य
Keep in abeyance	आस्थगित ठेवणे	keep with the file	नस्तीस जोडावे
keep in mind	बांधकून ठेवणे, प्रतिक्षाधीन ठेवणे	kindly acknowledge receipt	कृपया पोच द्यावी
keep in record	संग्रही ठेवणे	kindly confirm	कृपया पुष्टी द्यावी
keep letter draft	पत्र मसुदा ठेवा	kindly let me know	कृपया कळवा म्हणजे कळवावे
keep pending	प्रलंबित ठेवणे, अनिर्णित ठेवणे, बांधकून ठेवणे	kindly permit	कृपया करून परवानगी द्यावी
Law & order (L & O)	कायदा व सुव्यवस्था (का. व सु.)	less & more card	कमी जास्त पत्रक
lay on the table of the house	सभागृहासमोर ठेवणे	letter section	पत्र विभाग
legislature secretariate	विधानमंडळ सचिवालय	literal translation	शब्दश: अनुवाद
Maharashtra Civil Service Rules (M.C.S.R.)	महाराष्ट्र नागरी सेवा नियम	may be reconsidered	नव्याने कारवाई करावी
Maharashtra Plan Scheme System (M.P.S.S.)	महाराष्ट्र योजनांतर्गत योजना	may be rejected	फेटाळण्यात यावे
mark a file to	नस्तीवर नजरेने अंकित करणे	may please see	कृपया पहावे
matter is under active consideration	प्रकरणावर तत्परतेने विचार चालू आहे	message from department	विभागाचा संदेश
matter is under consideration	प्रकरणावर विचार चालू आहे	misleading statement	दिशाभूल करणारे कथन / निवेदन
may be considered	विचार करण्यात यावा	mistake is regretted	चूकीबद्दल खेद
may be filed	नस्ती करण्यात यावे, दप्तरबंद करण्यात यावे	model code of conduct (M.C.C.)	आदर्श आचारसंहिता
may be informed accordingly	त्याप्रमाणे कळवण्यात यावे		
National Sample Survey	राष्ट्रीय नमूना पाहणी	no objection certificate (N.O.C.)	ना हरकत प्रमाणपत्र
necessary action	आवश्यक कार्यवाही	not sufficient funds	अपुरी जमा
no action is necessary	कोणतीच कार्यवाही आवश्यक नाही	not traceable	शोध लागत नाही, सापडत नाही
no comments to make	कोणतीही टीकाटिप्पणी करावयाची नाही	notice of cut motion	कपात सूचना
no departmental enquiry	न विभागीय चौकशी	notice of discharge (N.O.D.)	सेवामुक्ती सूचना (से.मु.)
no exact procedure is available	नेमके पूर्वोदाहरण उपलब्ध नाही	notice of termination (N.O.T.)	समाप्तीची सूचना (क.सू.)
no further action is necessary, file	पुढील आणखी कार्यवाही आवश्यक नाही, नस्ती दप्तरबंद करावी	noting section	टिपणी विभाग
Obtain signature	सही घ्यावी	on public grounds	सार्वजनिक हितास्तव सुट्टीचे
office copy (O.C.)	कार्यालयीन प्रत (का.प्र.)	open the case	खटला / प्रकरण सुरू करणे
Office of Chief Secretariat	मुख्य सचिव कार्यालय (मु.स.का.)	organization and method	रचना व कार्यपद्धती
office to examine	कार्यालयाने तपासावे	original file	मूळ नस्ती (मु.न.)
office to take action	कार्यालयाने कार्यवाही करावी	out today	आजच्या आज पाठवा
Paper under consideration (P.U.C.)	विचाराधीन कागद (वि.का.)	please put up case file	प्रकरणाची नस्ती प्रस्तुत करावी
personal file	वैयक्तिक नस्तिका (वै.न.)	please quote the authority	कृपया प्राधिकार उद्धृत करा

place under suspension	निलंबनाधीन ठेवणे	please see	पहावे
plan information system	योजना माहिती प्रणाली (यो.मा.प्र.)	please send reply	कृपा करून उत्तर पाठवावे
please acknowledge receipt	पोच द्यावी	please speak	दयाळ बोलावे, कृपया बोला
please check	कृपया तपासावे	please take action	कृपया कार्यवाही करावी
please consider & put up	कृपया विचार करा आणि सादर करा	preliminary enquiry	प्राथमिक चौकशी
please diaries	दैनिकीत नोंद घ्या	Principal Secretary & Chief Protocol Officer	प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी
please discuss	चर्चा करावी	Public Account Committee (P.A.C.)	लोकलेखा समिती (लो.ले.स.)
please examine & put up	कृपया तपासावे व सादर करावे	public participation	जनतेचा सहभाग
please expedite compliance	लवकरे अनुपालन करावे	put up for signature	सहीसाठी प्रस्तुत
please put up	कृपया सादर करावे (कृ.स.स.)	put up new draft	नवीन मसुदा प्रस्तुत करावा
please put up alternative proposals	पर्यायी प्रस्ताव प्रस्तुत करावे	put up requisition	मागणी प्रस्तुत करावी
Rehabilitation & relief work	पुनर्वसन व दुर्भिक्षसाह्य कार्य (पु.दु.का.)	return of file may be awaited	फाईल परत येण्याची वाट पहावी
relevant papers be put up	संबंधित कागदपत्र प्रस्तुत करावे	return of file may kindly be expedited	कृपया फाईल परत पाठवण्याचे त्वरा करावी
reliable evidence	विश्वसनीय पुरावा	returned after doing the needful	आवश्यक कार्यवाहीनंतर परत
reminder may be sent	स्मरणपत्र पाठवण्यात यावे	returned for further consideration	अधिक विचारासाठी परत
reply may be sent as per draft	मसुद्याप्रमाणे उत्तर पाठवावे	revised estimates	सुधारित अंदाज
reply not yet received	अद्याप उत्तर आले नाही	revised memo is put up desired	आदेशानुसार सुधारलेला ज्ञाप प्रस्तुत
return in original	मूळ ज्ञाप परत पाठवावे	right to information Act (R.T.I.)	माहितीचा अधिकार अधिनियम (मा.अ.अ.)
Sample Registration Survey	नमुना नोंदणी पाहणी	starred question	तारांकित प्रश्न
security measures	सुरक्षा उपाय	state finance report	राज्य वित्त आयोगाचा अहवाल
seen ; file	पाहिले ; फाईल करावे	state income	राज्य उत्पन्न
seen ; file with previous papers	पाहिले ; मागील कागदपत्रांसह फाईल करावे	stop gap arrangement	तात्पुरती व्यवस्था
seen and passed on to department	पाहून विभागाकडे पाठवावे	subject matter of motion	प्रस्तावाचा विषय
seen and returned	पाहून परत	subject to approval	मान्यतेच्या अधीन, मान्य झाल्यास
self lined file	स्वयंमूदी फाईल	submit file	नस्ती सादर करा
set aside	रद्द करणे, बाजूस काढून ठेवणे (रद्दबाद)	submit integrated proposal	एकत्रित प्रस्ताव सादर करावा
should be ignored	दुर्लक्ष करावे	submit report	अहवाल सादर करावा
sitting over the papers	कागदपत्र कार्यवाहीशिवाय ठेवून देणे	submit with action taken report (ATR)	कृती अहवालासह सादर करावे
Slum Area Rehabilitation Authority (S.R.A.)	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झो.पु.प्रा.)	submitted according to discussion	चर्चेनुसार सादर करावे
so far as practicable	व्यवहार्य असेल तोपर्यंत	submitted after checking	तपासून सादर करावे
Special Backward Class (S.B.C.)	विशेष मागास वर्ग (वि.मा.व.)	submitted for consideration	विचारार्थ सादर
special desk	विशेष कार्यकक्ष	submitted for perusal	अवलोकनासाठी सादर
Special Economic Zone	विशेष आर्थिक क्षेत्र (वि.आ.क्षे.)	submitted to	- ला सादर करावे

Special Factor Scheme	विशेष घटक योजना	sympathetic consideration	सहानुभूतीपूर्वक विचार करणे
Take appropriate action	योग्य ती कार्यवाही करावी	the application may be rejected	अर्ज नाकारला/ अर्जावरचा फेटाळावे
take congizance	दखल घेणे	there is no case	कसोटी उरत नाही
take due action	उचित कार्यवाही करावी	this may kindly be condoned	हे कृपया क्षमापित करावे, याबाबत कृपया मूट करावी
take opinion of finance department	वित्त विभागाचे अभिप्राय घ्यावेत	this may please be clarified	कृपया याचे स्पष्टीकरण करावे
take opinion of General Administration Department	सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घ्यावेत	this may please be given top priority	या प्रकरणास सर्वोच्चक्रम देण्यात यावे
take the chair	अध्यक्षपद स्वीकारणे	thoroughly satisfied	पूर्ण समाधान झाले
target	लक्ष्य	timely completion	वेळेत समाप्ती, परिपूर्ती
terms of reference	विचारार्थ विषय	tribal sub-plan	आदिवासी उपयोजना
Under consideration	विचाराधीन	unstarred question	अतारांकित प्रश्न
under the hand	सहीने, सहीनिशी	until further orders	पुढील आदेश मिळेपर्यंत
Union Territory	संघ राज्यक्षेत्र	urgently required	तातडीने हवे असलेले
unofficial letter	अनौपचारिक पत्र (अ.नौ.प.)	Utilisation Certificate	उपयोगिता प्रमाणपत्र
unofficial reference (U.O.R.)	अनौपचारिक संदर्भ (अ.नौ.सं.)		
Verified and found correct	पडताळले व बरोबर आढळले	voluntary grant	स्वेच्छा अनुदान
very urgent	अत्यंत तातडीचे		
Whichever is earlier	अगोदर असेल, पहिले ते	working plan	कार्ययोजना, कामाचा आराखडा
with due regard to	लक्षात घेऊन	workabest	कार्यविवरण
with respect to	— च्या संदर्भात	workshop	कार्यशाळा, कृतिसत्र
without fail	न चुकता	write off	निरलेखन करणे, निर्लेखित करणे
work in progress	चालू (असलेले) काम	written order	लेखी आदेश
working majority	कार्यकारी बहुमत		
Your assumption is correct	आपली कल्पना बरोबर आहे	yours faithfully	आपला विश्वासू
your presumption is correct	आपली कल्पना बरोबर आहे	yours truly	आपला
your reply is awaited	आपल्या उत्तराची वाट पाहण्यात येत आहे		

[illegible]

परिपत्रक

शासन व्यवहारात संगणकाचा वापर
न्यायालय मराठीचा वापर करण्यास
टाळाटाळ करणाऱ्या विरुद्ध कारवाई
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:[illegible]
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १८ जून, १९९८.

संदर्भ :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक [illegible]-१०८७/ पु-५६-२०, दिनांक १८ मे, १९८८.
२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक [illegible]-१०८२/ १३५८/२०, दिनांक २८.१२.१९८२.

परिपत्रक

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार कार्यालयीन प्रयोजने करताना, सर्व शासकीय कामकाज मराठीतून करावे असे आदेश शासनाने वेळोवेळी दिलेले आहेत. असे असूनही सदर प्रयोजनात न मोडणाऱ्या कामकाजासाठी संगणकाचा वापर करताना राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात वे अधिकारी/कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्या गोपनीय अभिलेखात नोंद घेण्यात यावी व वारंवार असा प्रकार घडल्यास वे अधिकारी वा कर्मचारी नियमानुसार राजभाषेचा वापर करत नाहीत, त्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी असेही आदेश दिलेले आहेत. तसेच राजभाषा मराठीचा वापर करण्या संदर्भातील शासन आदेशांचे, शासकीय कार्यालये व विभाग यांनी, काटेकोरपणे पालन न केल्यास विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल असेही आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात संपूर्ण वापर होण्यासाठी खंबीर धोरण निश्चितच शासन उपाययोजना करण्याचा शासनाने निर्धार केला आहे.

२. तुम्हा प्रत्येकाला मराठीचा वापर करण्याबाबत जर शासकीय अधिकाऱ्यांकडून, कर्मचाऱ्यांकडून सुधारणा होत नाही, असा शासकीय अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या कामाविषयी निम्नलिखित कारवाई केली जाईल.

प्रशासकीय कारवाई

१] मेमो ताकीद
२] गोपनीय अभिलेखात नोंद

शिस्तभंगविषयक कारवाई

४] एक वर्षाकरिता बढती रोखी किंवा एक वर्षाकरिता पुढील वेतनवाढ रोखणे.

वरीलप्रमाणे कारवाया क्रमाने वाचण्यात याव्यात म्हणजे अनुक्रमांक १ ची तारीख देऊनही सुधारणा न झाल्यास अनुक्रमांक २ या प्रमाणे करावा. त्याचाही उपयोग न झाल्यास अनुक्रमांक ३ मधील क्रमाने घेणे, या क्रमाने कारवाया करण्यात. तसेच क्रमाने घेणे, वेतनवाढ रोखणे किंवा बढती रोखणे या शिक्षा महाराष्ट्र नागरी सेवा [शिस्त व अपील] नियम, १९७९ नुसार दाखविण्याच्या अस्तित्वामुळे त्या सौम्य शिक्षा त्या नियमांच्या नियम १० प्रमाणे कार्यपद्धती अनुसरून म्हणजे प्रथम नोटीस देऊन त्यांचे उत्तर लक्षात घेऊन मग शिक्षा देणे ही कार्यपद्धती अवलंबावी.

२. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी मराठीचा वापर पूर्णपणे होतो की नाही हे पाहण्यात, काही शैथिल्य दाखविल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल असे वरीलप्रमाणे दिनांक २८.१२.१९८३ च्या शासन परिपत्रकामध्ये पूर्वीच नमूद केले आहे. शासनाने असा असे ठरविले आहे की, विभाग प्रमुखांनी/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी शासन व्यवहारात मराठीचा वापर करतात की नाही हे पहावे व ते करत नसतील त्यांचे विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्याबद्दलची योग्य ती कार्यवाही करावे या दोन्ही बाबतीत त्यांच्याकडून काही कसूर दिसून आल्यास "पर्यवेक्षीय शैथिल्य" [सुपरव्हायझरी लॅपसेस] म्हणून त्यांचे विरुद्ध शिस्तभंग कारवाई केली जावी.

४. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी परिच्छेद ३ मधील आदेशांची स्वतः नोंद ठेवावी व परिच्छेद २ मधील आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[वि. ति. पारी]
शासनाचे अवर मुख्य सचिव.

प्रति,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई,
सर्वमंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुख्य न्यायालय शाखा, मुंबई, [पत्राने],
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],

सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, नवीन विधान भवन, मुंबई [पत्राने].
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने].
महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल, [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल, [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवाली लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
शासनाचे सर्व सचिव,
आश्रा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्रा धिकरणे.
महानगरपालिका, नगरपरिषदा.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख.
निवड फाईल [२ प्रती].
सर्वसाधारण फाईल.

परिशिष्ट "दोन"

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

मराठी भाषा समितीची बैठक दिनांक ०८ नोव्हेंबर २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, रविंद्र नाट्यमंदिर, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

(२) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.,

(३) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.,

(४) प्रा. अनिल सोले, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(३) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती).

विभागीय अधिकारी व प्रतिनिधींची उपस्थिती :

(१) श्रीमती अपर्णा गावडे, उप सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. हषवर्धन जाधव, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्रीमती राजश्री बापट, कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) श्री. दिलीप दा. करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,

(५) डॉ. जगतानंद भटकर, सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,

(६) श्रीमती सुवर्णा पवार, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,

(७) श्रीमती मिनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

सदर बैठकीत समितीने मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांचे अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांसमवेत चर्चा केली.

दुसरी बैठक

मराठी भाषा समितीने दिनांक १ फेब्रुवारी २०१८ रोजी सातारा जिल्ह्यातील "पुस्तकांचे गाव - भिलार" येथे भेट देऊन पाहणी केली व संबंधित अधिका-यांसमवेत चर्चा केली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती :

(१) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स तथा समिती प्रमुख,

(२) श्री. रमेश लटके, वि.स.स.,

(३) ॲड. गौतम चाबुकस्वार, वि.स.स.,

(४) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(२) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती).

विभागीय अधिकारी व प्रतिनिधींची उपस्थिती :

(१) श्री. आनंद काटीकर, संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,

(२) श्रीमती अस्मिता मोरे, उप विभागीय अधिकारी, वाई,

(३) श्री. बाळासाहेब भिलारे, माजी जिल्हा परिषद सदस्य,

(४) श्री. अतुल म्हेत्रे, तहसीलदार, वाई,

(५) श्री. बालाजी हाळदे, प्रकल्प सहायक, पुस्तकांचे गाव,

सदर बैठकीत समितीने सातारा जिल्ह्यातील "पुस्तकांचे गाव - भिलार" येथील संबंधित अधिका-यांसमवेत चर्चा केली.

तिसरी बैठक

मराठी भाषा समितीची बैठक दिनांक २ फेब्रुवारी २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई, जि. सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती :

(१) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स तथा समिती प्रमुख,

(२) श्री. रमेश लटके, वि.स.स.,

(३) ॲड. गौतम चाबुकस्वार, वि.स.स.,

(४) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(२) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती).

विभागीय अधिकारी व प्रतिनिधींची उपस्थिती :

(१) श्रीमती सुवर्णा पवार, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

(२) डॉ. प्रतिभा शिंदे, नगराध्यक्ष, वाई, जि. सातारा.

(३) श्री. अ. प्र. म्हेत्रे, तहसीलदार, वाई.

(४) श्री. अशोक भवारी, गट शिक्षण अधिकारी, वाई.

(५) श्री. क. व. म्हेत्रे, गट शिक्षण अधिकारी, वाई.

(६) श्री. वि. ल. जाधव, केंद्र समन्वय, वाई.

(७) श्रीमती प्रिती साळुंके, विद्याव्यासंगी सहायक, म.रा.मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई.

(८) श्री. रविन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, म.रा.मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई.

(९) श्रीमती. वर्षा देवरुखकर, संपादकीय सहायक, म.रा.मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई.

(१०) श्रीमती शिल्पा भारस्कर, संपादकीय सहायक, म.रा.मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई.

(११) श्रीमती पल्लवी गायकवाड, संपादकीय सहायक, म.रा.मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई.

(१२) डॉ. जगतानंद भटकर, सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

(१३) श्री. मिलींद शिंदे, व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई .

(१४) श्री. यशवंत कळमकर, सह सचिव, प्राज्ञपाठ शाळा मंडळ, वाई.

(१५) श्रीमती प्रिती उपाध्ये, मुख्याध्यापिका, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद कार्यालय, वाई.

सदर बैठकीत समितीने महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई, शासकीय मुद्रणालय व प्राज्ञपाठ शाळा, वाई येथील अधिका-यांसमवेत चर्चा केली.

चौथी बैठक

मराठी भाषा समितीची बैठक दिनांक ९ मे २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

उपस्थिती :

(१) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स तथा समिती प्रमुख.

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.,

(३) श्री. हेमंत टकले. वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(३) श्रीमती अलका पराडकर, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी व प्रतिनिधींची उपस्थिती :

(१) श्री. भूषण गगराणी, प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्रीमती अपर्णा गावडे, सह सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्री. हर्षवर्धन जाधव, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) श्री. क. प्र. पाटील, अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग), मंत्रालय, मुंबई.

(५) श्रीमती राजश्री बापट, कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(६) श्री. म. प. कुडतरकर, कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(७) श्रीमती वर्षा जोशी, कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

(८) श्री. प. ज. गोसावी, संचालक, शासकीय मुद्रणालय, वाई, जि. सातारा.

(९) श्री. अरुण गिते, प्रभारी भाषा उपसंचालक, भाषा संचालनालय, मुंबई.

(१०) श्री. रामेश्वर रोकडे, प्रपाठक , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रभादेवी, मुंबई,

(११) डॉ. जगतानंद भटकर, सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

(१२) श्री. आनंद काटीकर, संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

(१३) श्रीमती सायली सावंत, सहायक लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,

उक्त बैठकीत समितीने दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई आणि दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत सातारा जिल्ह्यातील "पुस्तकांचे गाव-भिलार" व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई येथे दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची घेतली.

पाचवी बैठक

मराठी भाषा समितीची बैठक दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

उपस्थिती :

(१) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.
(३) श्री. रमेश लटके, वि.स.स.
(४) श्री. हेमंत टकले, वि.प.स.,
(५) आर्कि. अनंतराव गाडगीळ, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

समितीने सदर बैठकीत प्रारुप अहवालावर विचारविनिमय करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर